म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. १७३४
५९६

...जलि
...ला

# समीपदर्शन

REFBK-0015134
REFBK-0015134

काव्य आणि तत्वज्ञान यांचा मनोरम
संगम असलेला व विश्वविख्यात
कवि डॉक्टर रविन्द्रनाथ ठाकूर
यांच्या गीतांजलि या सुप्रसिद्ध
ग्रंथसदृश्य प्रार्थनासंग्रह

भावपुष्पांजलि भाग १ ला

# समीप दर्शन

लेखक :– सखाराम यादवराव पाटील

माझे थोरले बंधू व मराठवाड्यांतील सहकार महर्षि
**कै. ति. रामचंद्र चिंतामणराव पाटील**
माजी एम्. एल्. सी. व माज अध्यक्ष
औरंगाबाद जिल्हा म. सहकारी बँक लि.,

यांचे पवित्र चरणी सप्रेम समर्पण

–स. या. पाटील

१५१३४

मूल्य रु. २=५०

पसायदान.

प्रकाशक :

डॉ. टी. जे. पाटील.
एल्.सी.पी.एस्.
एम्.बी.बी.एस्.
डी.ओ.आर.एल्.
ज्योति भुवन, चाळीसगांव

लेखक :

स. या. पाटील
मु. पो. नागद
ता. कन्नड,
जिल्हा औरंगाबाद.

सर्व हक्क लेखकाकडे.

मुद्रक :

दोधू भिकाजी पाटील.
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
टिळक रोड-औरंगाबाद.

## अनुक्रमणिका


१. गीतांजलि
२. स्वागत
३. सुकाणू
४. अपेक्षा
५. विरह व्यथा
६. ओढ
७. ज्योति
८. महाप्रयाण
९. जीवनज्योति
१०. भ्रमंति
११. शोध
१२. मनीषा
१३. अश्रू
१४. करूणा
१५. सहोदर
१६. द्वंद्वपरिहार
१७. भवसागर
१८. शिदोरी
१९. अिप्सित
२०. आसरा
२१. कसोटी
२२. आशीर्वाद
२३. रूणनिर्देश
२४. आनंदी आनंद
२५. आगमन
२६. वेडेचार
२७. वाटचाल
२८. याचक
२९. विनवणं
३०. पादुका
३१. बोध
३२. शरण
३३. प्रणाम
३४ आभार
३५. सीमा
३६. अेकरूपता
३७. सारथि
३८. अतर्ज्योत
३९. नमस्कार
४०. अनुभूति
४१. प्रकाश
४२. निर्धार
४३. अतीत
४४. मागणी
४५. कोडे
४६. याचना
४७. धावा
४८. दिक्षा
४९. प्रश्न
५०. सवेदना
५१. प्रवास
५२. प्रसाद
५३. शल्य
५४. साध्य
५५. प्रवेश
५६. मार्गक्रमण
५७. प्रतिक्षा
५८. स्वीकार
५९. मीलन
ंतर्मीलन
यत्न
द्धार
र्वस्व
निरोप
६५. भावपुष्पांजलि
पसायदान.



REFBK-0015134
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
८००२३

**मराठींतील थोर नामवंत समीक्षक प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचा अभिप्राय**

औरंगाबाद जिल्ह्यांतील नागद या गांवचे श्री. सखाराम यादवराव पाटील यांची टंकलिखीत 'भावपुष्पांजलि' मी वाचली कविवर्य रविंद्रनाथ ठाकूर यांच्या गीतांजलीनें आपणांस स्फूर्ति मिळाली असें श्री. पाटील म्हणतात तथापि यांतील गद्य–काव्यें वाचल्यावर हा संग्रह म्हणजे केवळ पुस्तकें वाचून झालेले पुस्तक नव्हे हे लक्षांत येते. श्री. पाटील हे भाविक, भावनाशील, चिंतनशील असल्यामुळेंच त्यांच्यावर गीतांजलीचा खोल परिणाम होऊं शकला असें दिसून येते. या खेरीज त्यांचे वाचनहि–इतर वाचनहि – बरेच असले पाहिजे कारण आजकालच्या नविन लेखकांच्या मानानें त्यांची भाषा शुद्ध, सरळ आणि काव्यमय आहे.

मुख्य गोष्टी ही कीं, ज्या अंतर्मूख आणि समर्पणशील भावनेंतून 'गीतांजली' निघाली, तिच्याशीं जिचें लांबचें का होईना कांहीं नातें आहे, अशा भावड्या भावनेंतूनच ही काव्यें पुष्पें उगवली आहेत. ती भाविकांना व रसिकांनाहि प्रिय होतील, असा मला विश्वास आहे.

पुणें
३०–७–१९६६

**श्री. के. क्षीरसागर**

## प्रास्ताविक

श्री. सखाराम यादव पाटील यांची ही भावपुष्पांजलि कविश्रेष्ठ रविंद्रनाथ ठाकूर यांच्या गीतांजलीची छाया आहे. गीतांजलीच्या प्रभावानें प्रभावित होऊन लिहिलेला असाच एक काव्यमय संग्रह अमरावती येथील प्रसिद्ध कवि खापर्डे यांनी 'धर्म जागृति' या मासिकांतून क्रमानें प्रसिद्ध झाला होता. प्रस्तुत लेखकानें गीतांजलीचे ऋण आंतील मुखपृष्ठावर स्पष्टपणें निर्दिष्ट केलें आहे. हे एक प्रकारचें आत्मनिवेदन आहे. या आत्मनिवेदनांत अंतर्विरोध आहेच ओढ ज्याची लागलीं आहे, त्यांचे अज्ञान मनाला बेचैन करते. निर्विषय आनंदाचा अनुभव येतो, तो आनंद अनाद्यनंत आहे. असाहि अनुभव येतो परंतु वाटचाल संपत नाहीं भ्रमंती सुटत नाहीं कोंडें उलगडत नाहीं. प्रश्नांचे उत्तर मिळत नाहीं.

प्रश्नांचे उत्तर मिळत नसले तरी कांहीं प्रश्नांची उत्तरें मिळाल्याचे समाधान ठिकठिकाणी व्यक्त झालेले दिसते. जगाचा मोक्ष हाच आपला मोक्ष असा प्रत्यय आला आहे. म्हणून व्यक्तिगत प्रार्थना संपली आहे असे वाटूं लागले परंतु व्यक्तित्वाचा समष्टींत व अनंतांत विलय होऊं शकला नाहीं. यांचे प्रत्यंतर या भावपुष्पांजलीमध्यें पदोपदीं मिळते. देवाचे शब्द ऐकूं येतात. स्वतःच्या अंतर्ज्योतिमध्यें देवाची ज्योत एकरुप झाली आहें. असाहि प्रत्यय येतो. परंतु शल्य कायम रहाते. याचना संपत नाहीं.

रविंद्रनाथांचे साहित्य सुशिक्षित भाविक मनांवर किती चांगला प्रभाव निर्माण करते याचेंहि भावपुष्पांजली उत्कृष्ठ उदाहरण होय. या जगाची आस्था निर्माण करणारा, या भौतिक जीवनावर आध्यात्मिक पवित्र्याचे सिंचन करणारा, विश्वबंधुत्वाच्या जाणिवेंत चैतन्य ओतणारा आणि स्थूल लोकभ्रमांतून मुक्त करणारा अध्यात्मवाद रविंद्रनाथांनी भारतीयांना दिला आहे. हीन भोळचा समजुतींना उत्तेजन देणाऱ्या धार्मिक सांप्रदायांचे भयंकर खूळ अजूनहि माजलेले दिसते. रविंद्रनाथांच्या अध्यात्म–

वादाचा जितका प्रभाव वाढेल तितकी भारतांतील हीन दर्जाची धार्मिक खुळें नष्ट होऊं लागतील, श्री. पाटील यानीं आपल्या या प्रसन्न, सुबोध व मांगल्यपूर्ण गद्यप्रार्थना लिहुन या थोर सांस्कृतिक कार्याला चांगला हातभार लावला आहे.

**वांई** 
दिनांक १५ ऑगस्ट १९६६ } **लक्ष्मण शास्त्री जोशी**

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम .............. दि: ...............

# प्राक्कथन

बालपणी तो मला भेटला. त्यावेळीं मला कोण आनंद झाला. आणि त्या आनंदांतच मी त्यांचे स्वागत केले. मला वाटले, आपल्या जन्मजन्मातरीचाच सोबती आपणांस भेटला. त्याचा हा सहवास आपणांस सुखाचा, आनंदाचा नि कल्याणप्रद जाईल.

परंतु हाय ! कांही कालांतच तो माझा सोबती अंतर्धान पावला मला माझे जीवन निरस झाले.माझे आयुष्य भकास वाटूं लागले. राहून-राहून मला त्याची आठवण येई आणि मी माझ्या परीनें त्याचा शोध घेई. अशा आवस्थेत माझ्या आयुष्याचे दिवस जाऊं लागले. त्याच्या प्रतिक्षेत मला कांहीं सुचेना. इतर कशांतच मन लागेना आशादायी मन म्हणें, येईल लवकरच आपला तो मित्र येईल नि आपल्याला भेटेल.

त्याची वाट बघतांबघतां माझे बालपण संपले. मी युवावस्थेंत प्रवेश केला. आणि अचानक एक दिवस माझ्या दारासमोर येऊन तो उभा राहिला आणि मला म्हणाला, “ ओळखलंस मला? ”

मी चमकून त्याच्याकडे पाहिलें. चमत्कार नि आनंद यांची संमिश्र छटा माझ्या चेहेऱ्यावर चमकली. त्याला प्रथम चांगले न्याहाळून पाहिलं. तोंड भरुन हंसलो आणि घट्ट मिठी मारीत मी त्याला म्हणालो, “ मित्रा माझ्या जन्मजन्मातरीच्या मित्राला कधी विसरेन का मी ? आतां मला मात्र कधींच सोडून तूं जाऊं नकोस. तुझ्या गैरहजेरीत मला फार वेदना दिल्यास तूं ! ”

माझ्या पाठींवर हात फिरवीत तो मला म्हणाला, ” नाही रे सोबत्या, मी आतां तुला सोडून कधींच जाणार नाहीं. मी नेहमीसाठीं तुझ्या समीप राहीन. ”

माझ्या हाताच बोट धरुन तो मला म्हणाला. “ चल सारी सृष्टी दाखवितो मी तुला “ आणि खरेंच, सारी सृष्टी दाखविली त्यानें मला. ते निर्झर, ती झाडें, ते आकाश, तो सागर, त्या वनस्पति, डोंगर, दऱ्या, खंडे नि उपखंडे नि तीतील इतर प्राणी नि माणसें.

त्या सृष्टिचा इतिहास, भौगौलिक परिस्थिती, तत्वज्ञान हे सारे मीं त्याच्या तोंडून ऐकले, तो बोलला खूप पण मी ऐकलें. थोडेसेच. शेवटी मी थकलो. नि हात जोडून त्याला म्हणालो, “ देवा आतां पुरें झाले हे पहाणें नि ऐकणें. ”

त्याक्षणीं तो हंसला. त्यानें मला जवळ बसवून खूप खूप ज्ञान दिले, परंतु हाय, मी कोरडा तो कोरडाच राहिलो, मला त्याचा उपदेश तो काय समजणार? माझी ही दशा त्यानें पाहिली कीं काय कोण जाणें? तो अतर्धान पावला. – माझ्या समोर गुप्त झाला.

मी रडरडलो. मला वाटले माझे धन हरवले. माझी विद्या नष्ट झाली. माझ्या आशा आकांक्षा असफल झाल्या. माझे जीवन बरबाद झाले. कारण तोच माझा प्राण, माझी विद्या, माझे आशेचे स्थान, जीवन सारे काहीं होता. आतां तो माझ्या समीप नाहीं. माझ्या सहवासांत नाहीं. त्या वाचून जगण्यांत अर्थं तो काय ? आपणांस जगतां येणेच अशक्य आहे. त्यापेक्षां दूर कोठेरी जावे आणि आत्महत्येने जीवनाचा शेवट करावा.

वरील विचरांचे चिंतन करण्यांत माझ्या जीवनाचे बरेचसे दिवस गेले आणि तो विचार दृढ होण्याआधींच माझ्या हृदयांत प्रकाश उदयमान झाला. आपण ज्याला पाहिले, ज्यानें आपल्याला बहुरत्ना वसुंधरा दाखविली, ज्ञानमृत पाजिले त्याचा आपण उतराई व्हावे त्यानें दाखविलेली सृष्टि, त्या सृष्टिचे, ज्ञान, त्यानें पाजिलेले बोधामृत, त्याचे झालेले समीप दर्शन, आणि तो गुप्त झाल्यावर त्याच्या दर्शनासाठीं सहवासासाठीं तळमळणाऱ्या माझ्या मनाच्या भावछटा सारे सारे आपण आपल्या शब्दात कां लिहुं नयें ? परंतु वाटे, लिहायला शब्द तोडके पडतील. मनाचे भाव पूर्णपणे व्यक्त करायला आपली लेखणी असमर्थ होईल. परंतु सारा भार त्या सर्व समर्थ परमात्म्यावर ठेवून मी लेखणी हाती घेतली.

आणि माझ्या हातून भावपुष्पांजलितील समीपदर्शनाचे लिखाण लिहुन झाले, त्यांतील एकेका पानांत, अेकेका ओळींत मी माझे सर्वस्व ओतलें आहे. त्यानें माझ्या मनाला शांतता लाभली. भावपुष्पांजलिच्या या समीपदर्शनांत आळवणीयुक्त लिखाण आहे तर दुसऱ्या भागांत उपासनेत रुपकात्मक भावकथा आहेत.

या माझ्या लिखाणांत बरेचसे दोष असतीलही. परंतु परमात्म्याविषयींच्या लिहिलेल्या लिखाणांतील हे दोष देवाचे देवाला आर्पण करुन मी भावपुष्पांजलीचे हे प्राक्कथन पूर्ण करतो.

ग्रंथालय ठाणे
क्र. क्र. 74938
(स्थळ प्रत)

# गीतांजलि

गीतांजलि तुला प्रणाम
जीवनांतील अेकां विशिष्ट भावस्थितींत
तूं माझ्या समोर प्रगट झालीस.

शिक्षण, अर्थ, अि. जीवनविषयक आघाड्यांवर मी पराभव पावत असतां व त्या पराभवांनी खचून जात असतां - जीवनांत अंधःकार नि नैराश्य पसरले असतां गीतांजले, तूं माझ्यासमोर प्रगट झालीस.

क्षुधितानं पाण्यावर झडप घालावी, भुकेलेल्या माणसानं अन्नावर ताव मारण्यास धावावं, भर दुपारी अुन्हातान्हांत बराच लांब पल्ला मारणाऱ्या प्रवाशानं अचानक दिसणाऱ्या गर्द सांवलीकडे धांव घ्यावी. कडक थंडीत कांकडणाऱ्या माणसानं शकोटीकडे मजल मारांवी तद्वत मी तुझ्याकडे धांव घेतली. तुझं मी आकंठपान केलं. तुझ्या पानापानांत माझे डोळे निवले. तुझ्या मजकुरांतील आशयानं माझं मन प्रफुल्लित केलं. लंगड्याला काठीचा आसरा मिळावा तद्वत माझ्या लंगड्या जीवनांत तूं मला काठीचा आसरा दिलास. माझ्या जीवनातील अधू दृष्टीला तुझ्या तत्वाचा चष्मा मला लाभला. आणि त्या चष्म्यांतील दृष्टीनं मी जगांत वावरूं लागलों.

आधींच पराभूत झालेलं माझं मन अध्यात्माकडे वळले. देवाकडे झुकले गेले. त्याने माझ्या पराभूत मनाला स्वस्थता लाभली. त्या देवाला मी सर्वस्वी शरण गेलो. माझी पराभूत वृत्ती मी त्याला निवेदिली. मूकावस्थेंत असलेली माझी प्रतिभा गीतांजलीच्या वाचन मनन नि चिंतनानें वाचाळ झाली. या गीतांजलीनें माझ्या मुक्या शद्बांना वाट

करून दिली. लंगड्यां शद्बांना पाय दिले. देवाची मी प्रार्थना केली. त्या प्रार्थनेत ते विचार मी समीपदर्शन व भावपुष्पांजली या माझ्या ग्रंथांत संकलित केले आहे.

माझ्या या लिखाणांत देवाविषयींची सर्वस्वी शरणता प्रगट झाली आहे. देवाजवळ स्वतःची पराभूत वृती निवेदन करूत - त्याची करूणा भाकून जीवन यशस्वी करण्याची प्रेरणा आहे. परंतु ती निर्जीव नाहीं. - जीवंत आहे.

देवा, तूं माझ्या अंतर्यामी बैस. माझ्या अंतर्यामीच्या व्यवहाराचा रथ तूं हाकल पण तो हाकारतांना मला स्वतःला माझ्या प्रापंचिक कार्यापासून विचलित करूं नकोस. मला सुखी ठेव. माझ्या मुलाबाळांना. आई वडिलांना, भावा बहिणीना सुखी ठेव. माझे काका, मामा, मावशी, आत्या अि. जवळचे नातलग, अिष्टमित्र नि शेजारी पाजारी या सर्वांना सुखी ठेव. त्यांच्या विषयींचे माझे कर्तव्य बजाविण्यास मला प्रेरणा दे. माझी भाषा समृद्ध होअूं दे. त्या आर्थिक औद्योगिक नि आध्यात्मिक दृष्टचा वैभव संपन्न होअूं दे. त्याबरोबर जगांतील अितर देश, त्या देशांतील लोक यांच्याबद्दलची भावना वरील सारखी असूंदे. माझ्या देशांबरोर अितर देशहि सुखी नि समृद्ध होअूं दे. त्यांचा औद्योगिक दृष्टचा अुत्कर्ष होअूंदे व त्याबरोवर अध्यात्मिक दृष्टचा ते देशहि भरभराटीला येऊंदेत. जगांत सध्या पसरलेला वैरभाव संपवून जगांत चिरसौख्य व चिरशांति नांदू दे.

अशा या माझ्या प्रार्थनेंत मी माझा व्यक्तिगत परिवार, भाषा देश, खंड नि पृथ्वी नि पृथ्वीवरील अितर प्राणी या साऱ्यांबद्दलच्या माझ्या भावना प्रगल्भ आहेत. ह्या माझ्या भावना नि हे माझे आचार विचार या साऱ्यांवर गीतांजलीनें विलक्षण परिणाम केला. ते मी माझ्या लेखणीनें शद्बबद्ध करूं शकलो तें गीतांजलीमुळेंच.

हे गीतांजलीचे ऋण नव्हे का ? गीतांजलीचे अुपकार नव्हेत काय ? हे ऋण फेडतां येण्यासारखे नाहीं. आणि म्हणून गीतांजलीला मी धन्यवाद देतो. गीतांजलि, तुला आणखी प्रणाम.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४०००२३ दि: ...
९८३ ... ११।१।६६

## स्वागत :

मृत्यू माझा समीप आला तर त्याचे स्वागत कसें करावें बरें? त्याला आपळा प्रियकर मानून त्याच्या बहुपाशांत पडावें. त्याला जिवाचा सखा समजून आनंद मानावा. जीवनांत आपण जी कांहीं सुख-दु:खें भोगली, बरेंबाईट अनुभव घेतले, विचार केला, त्याप्रमाणे अुच्चार व व्यवहार केला - त्याची माला करून ती त्याला अर्पण करावी. अेका जन्मीचा अेक प्रवास संपून दुसऱ्या जन्मीचा दुसरा प्रवास सुरूं होईल म्हणून आनंद मानावा, दुसऱ्या प्रवासाचा तो नूतन सांगाती असें समजून त्याला सामोरें जावें. ह्याजन्मीं ज्यांच्यावर आपण प्रेम केलें व ज्यांनी आमल्यावर प्रेम केले ते आपले आईवडिल, बहिणभाऊ, पत्नी, मुलें मित्र नि नातलग यांना सोडून आपण कायमचे जाणार या जाणिवेनें होणारे दु:ख आवरून ज्यांनी आपल्या जीवनांत हेवा दावा केला, वैर मांडलें व आपल्या जीवनमार्गावर कांटे अुधळले त्यांचे हे वर संपून होणारे सुख आवरावें व ह्या पुढील कर्ता, हर्ता कुणी नसून आपल्याला आईबाप बंधू सखा, पत्नी, मुले ही सारी नातीगोतीं त्या मृत्यूदेवतेंतच सामावली आहेत असें समजून कोणत्याहि प्रकारें वैषम्य न बाळगता त्या मृत्यू-देवतेला शरण जावें.

## सुकाणू :

क्षणोक्षणीं माझे मन बुद्धि नि चित्त चंचलता धारण करते. त्यामुळे मनाला अशांतता वाटते. मनाची धारणशक्ति नष्ट होते. व जीवन अेका भयानक नाटकाच्या दृश्यांत समाप्त होते की काय असें वाटूं लागते. आणि हा विचार मनांत आला की माझे जीवत मला भेसूर वाटते. पलायनवादाचा आश्रय घेतो. आतांच आत्महत्या करून जीवनाचा शेवट करावा आणि मुक्त व्हावे असे वाटूं लागते. आणि आत्महत्येस मी सर्वस्वी सिद्ध होतो.

अशावेळीं देवा, तूंच माझ्या जीवननौकेचा सुकाणू आपल्या हातीं घेतोस व माझी जीवननौका हाकारतोस. माझी भावना, मन, बुद्धि नि चित्त यांवर तूंच आपला अधिकार गाजवून माझ्यांतील माझे पण नष्ट

करतोस. माझी काया, वाचा, हात, पाय, कान, डोळे नाक अि. अिंद्रियांवर व त्यांच्या निवास्थानांवर तुझी सत्ता गाजवितोस आणि तूं नि मी व मी तूं हा द्वैतभाव लोप पावून मी तन्रूप होतो.

## अपेक्षा

माझ्या परमेश्वरा, जन्मोजन्मी माझ्या हृदयांचे कवाड मी तुझ्यासाठीं सदैव अुघडे ठेविले आहेत, मला वाटत होते तूं ह्या माझ्या दारापुढे केव्हाही निष्ठशील त्यांत तुझा विना सायास प्रवेष होअील. तुझे मला दर्शन घडेल व तूं माझा अुद्धार करशील.

परंतू छे! माझ्या परमेश्वरा, तूं अद्याप माझ्याकडे फिरकला नाहींस. तुझी कृपा माझ्यावर अद्याप झाली नाहीं. यायोगें हा जीव प्रत्येक जन्मीं दुःखी नि कष्टी असतो. परोपरीं तो तुझीच अेकनिष्ठपणे विनवणी करतो.करूणा भाकतो. माझ्या देवा, तूं मला दर्शन दे आणि माझा अुद्धार कर. तुझ्या दर्शनावांचून माझा अेकेक जन्म फुकट जात आहे. या तुझ्या विरहा मुळें प्रत्येक जन्मी मी दुःखी नि कष्टी मनानं माझं कशांतच चित्त लागत नाहीं. मला कशातच राम वाटत नाहीं. यामुळें माझ्या प्राप्त कर्तव्यात अनेक चुका होतात. देवा रे, अशावेळीं मी काय करू ?

" माझ्या जिवा शांत हो, अितका अुद्वेगु नकोस. परोपरी तूं देव प्रसन्न होण्याच्या व त्याच्या करवीं अुद्धार होण्याच्या आशेनें-अपेक्षेने तुझ्या परमेश्वराची तूं प्रार्थना करतोस, भक्ति करतोस, तेणे करून तुझी प्रार्थना निरपेक्ष नाहीं. ती सदोष आहे. व्यभिचारी आहे. देवाला प्रसन्न करून घ्यावयाचे असेल तर त्या तुझ्या परमेश्वराला-हृदयेश्वराला अनन्यभावे शरण जा. निरपेक्षपणाने तूं त्याची प्रार्थना कर. निरलसपणे त्याची भक्ति कर. म्हणजे तुला तो परमेश्वर तुझ्या हृदयाच्या दारीं तिष्ठत राहील. तुला दर्शन देअील आणि तुझा अुद्धार करील."

## विरहव्यथा

माझ्या हृदयींच्या परमेश्यरा, दीर्घकालपर्यन्त मी तुझी वाट बघत आहे. वाटते तूं आता येशील आणि माझा अुद्धार करशील.

बालपण संपले. युवावस्था आली. ती ही आता संपत झाली असून कांहीं वर्षांनी वृद्धावस्था प्राप्त होईल. माझे आयुष्य संपून जाईल नि मला ह्या जगाचा नि शरीराचा त्याग करावा लागेल. तुझ्यावांचून मला एकट्याला रहावें लागत आहे त्यामुळें हे जीवन मला नकोसे झाले आहे.

माझ्या जगज्जीवना, ही पहा पळे चालली, ह्या घटीका, हे तास चालले दिवसामागून दिवस चालले नि सप्ताहामागून सप्ताह चालले. मासामागून मास नि वर्षामागून वर्षे चालली तरी मला माझ्या डोळ्यांनी तुझे दर्शन घडत नाहींत कीं माझ्या कानांना तुझ्या आगमनाचें शद्ब अैकूं येत नाहींत.

आयुष्यांतील ही विरह अवस्था आतां पुरे झाली. ती व्यथा आतां माझ्यानें सहन होत नाही. हे दयाधना, माझी दया येऊं दे. नि तूं मला भेट दे.

## ओढ

मी कितीबरें त्याची वाट बघावी ? – – – सकाळ झाली. दुपार होऊन गेली. सायंकाळ आतां संपून आतां अर्ध रात्रीचा समय होत आलेला आहे. तरी अजून कसा बरे तो आला नाही? त्याची वाट बघून बघून मी थकून गेलो आहे. आतां तों कधी बरे येईल? मला भेटेल नि माझा जीव शांत करील ?

मन बेचैन झालं आहे. त्याला भेटण्याची अुर्मी मला स्वस्थ बसू देत नाही. आणि त्यासाठीं असे वाटते कीं स्वतःचे स्थान सोडावे नि आणि त्याला शोधावे.

शोधावे हा विचार ठरला खरा. परंतु त्याला शोधायचे तरी कुठे ? ज्याची मला ओढ आहे. ज्याला भेटण्याची उर्मी माझ्या अंतरंगात आहे. त्याचे ज्ञान मला नाही. त्याचे नांव, गांव, रहाण्याच स्थान ह्या कशाचेच मला ज्ञान नाहीं त्यामुळें मला मार्ग दिसत नाहीं. किती बरें मी अनभिज्ञ? कांय म्हणावे या अनभिज्ञतेला?

माझ्या परमेश्वरा, आतां तूंच मला ज्ञान दे. तुजजवळ येण्याचा मार्ग दाखव आणि तु मला कायमच भेट.

## ज्योत

धगधगणारी ज्योत ------- प्रज्वलित ज्योत -- कां कोण जाणे, त्या ज्योतीनं मला कसं आकर्षित करुन ठेवलं आहे आशि त्यामुळें असं वाटतं कीं तिला धरावं परंतु धरावयाला जावे तों तों ज्योत ती दूर पळत त्या पळत्या ज्योतीला धरायला पळत जावे तों ती आणखी पळत सुटते. असा हा लपंडाव कुठपर्यंत खेळावा मी? बरीच धांवपळ करुनहीं तीमाझ्या हातीं येत नाहीं. माझ्या देवा, मी आतां काय करूं? कसं करूं? ते मला सांग.

ती हाती येत नाहीं म्हणूण मी बेचैन होतो. अशा बेचैन अवस्थेत मी किती राहूं? ---- या बेचैन व्यवस्थेत असतांनाही मी माझ्या प्रापंचिक कार्यात मन लावण्याचा प्रामाणिक पणें प्रयत्न करतो. तों तों ती ज्योत माझ्या डोळ्यापुढें मुद्दाम येते. ती प्रज्वलीत झालेली तेजस्वी ज्योत माझं मन आकर्षित करुन घेते आणि माझ्याकडे पाहून जणू ती मिस्किलपणें हंसते. मला जवळ बोलावते आणि म्हणते, "बा मानवा, मला पकड, मला पकड."

आणि मग माझी बेचैनी अधिकच वाढते. हातांतील काम सोडून मी तीला पकडण्याचा आणखी निष्फळ प्रयत्न करतो. लोक मला हंसतात. वेडा म्हणतात व निंदा करतात. मनाला झोंबेल असेही बोलतात. त्यांचे ते तिखट शद्ब कानी पडले कीं मला हे सारे असह्य होते, व मी व्यवहारापासून तरढळलो नाहीं ना? या शंकेन मी व्यथीत होतो. माझ्या देवा, मी आतां काय करूं?

त्या ज्योतीच्या प्राप्तीवाचून माझ्या मनाला अस्वस्थता लाभणार नाही. माझ्या जीवाला विश्रांती मिळणार नाहीं. ती ज्योत माझी जीवन ज्योत झाली आहे. तिला प्राप्त करून घेतल्या शिवाय मी राहणार नाही. त्यासाठीं (लोंक व्यवहारांत निमग्न असता) आयुष्यांत जे मोल लागेल ते मी द्यावयास तयार आहे.

माझ्या देवा तुझ्या आशिर्वादा शिवाय मला हे अशक्य आहे. यास्तव ती ज्योत प्राप्त होण्यास मला आशिर्वाद दे.

## महाप्रयाण

माझ्या मृत्यूदेवा, सर्व तयारी करुन मी माझ्या दारीं तुझी वाट गघत आहे. या माझ्या जीवन क्षितिजावर तांबडेपणा येईल. नि हे माझे कामरुपीं धरणीतल त्याने आरक्त होईल. प्रभात समयीं पूर्वाचलावर सूर्यनारायण जसा प्रवेश करतो तद्वतच तूं प्रवेश करशील नि माझ्या डोळ्यासमोर तिष्ठत राहशील माझ्या खांद्यावर हात ठेवून तूं मला म्हणशील, " मित्रा, चल, दुरच्या देशीं, प्रयाणाची सर्व तयारी केलीस ना ?

मग या माझ्या डोळ्यांनीं मी तुला न्याहाळून तुझं तेजस्वी रुप दृष्टी अधू झालेल्या माझ्या डोळ्यांत साठवीत तुझ्या आगमनानं अननूभूत आनंद मला होईल. आनंदाचे रोमांच माझ्या शरीरी उठतील. नि भक्ति भावानं माझ्या डोळ्यांत आसवं आणीत मी माझं गलितगात्र झालेले हे शरीर तुझ्यापुढें वाकवीन तुला. साष्टांग वंदन करीन आणि तुला म्हणेन, " माझ्या प्रियमित्रा. तुझीच वाट बघत होतो मी. आतां तुझ्या बरोबर महानिर्याणाप्रत येतो मी. "

माझ्या देवा बराच काळ वाट पाहूनही तूं अद्याप आलेला नाहींस. केव्हां येशील ? --- म्या बापुड्यानं किती वेळ तुझी वाट पहावी बरें? माझा किती वेळ अंत पहात आहेस तूं अद्याप तूं कां आला आला नाहीस याबाबत नाना शंका कुशंका माझ्या मनांत येताहेत. आणि त्यानें माझ्या जिवाला शांतता नाही. तुझ्या आगमनावाचुन न जाणारी पळे, घटिका, तास नि दिवस मला भेसूर वाटताहेत.

माझ्या मृत्यूदेवा, लवकर ये. तूं आलास कीं मी तुझं चरण घट्ट धरून ठेवीन. तूला आळवीन. आई वडिलांचं स्मरण करीन. ऋषि मुनी गुरुं आदिना नमन करीन. मातृभूमिला वंदन करीन आणि मग हे माझे शरीर तुझ्या चरणारविंदीं वांहुन मी तुझ्या बरोबर महानिर्याणप्रत येईन.

## जीवनज्योती

त्या दिवशीं ती पणती पेटविण्याचा – तिची ती ज्योत पेट-विण्याचा मीं महत्प्रायास केला परंतु ती पेटच घेओना. – तिची ज्योतच प्रज्वलीत होओना.

अनेक जन्मांच्या पुण्याईन मी ती पणती निर्माण केली. प्रभु-कृपेनं मिळालेल्या भक्तीनं मी त्यांत तेल ओतलं आणि सत्कर्माच्या राशीनं मी वात तयार केलीं.

सभोंवती शांतवातावरण होतं. हवा कुंद झालेलीं होती. वारा नाहीं की कांहीं नाहीं. अशा शांत वातावरणांत मी काडी ओढली. आणि ती पणती – तिची ती ज्योत पेटविण्याचा प्रयत्न केला. परंतु छे ती पणतीच पेटेना. तिची ज्योतच लागेना. कधी काडी विझे तर कधीं तिचीं वातच तडतड करुन ती ज्योत तावडतोब विझे. आणि सभोंवती अंधार पसरे.

परंतु आज – त्यानंतरच्या बऱ्याच वर्षानी – सोसाटचाचा वारा सुरूं झालेला आहे. झंझावातानें वृक्षे मुळासकट उन्मळून पडले आहेत. आकाश काळचाकुट ढगांनी भरून आल्यानें चौफेर अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. मुसळधार पावसानें नद्यानाले एक झाले आहेत. विजांच्या कडकडाने निवाऱ्याच्या नि पावसाच्या तडाख्यानें सृष्टी कशी भयभीत झाली आहे. थंड नि बोचऱ्या वाऱ्यानेही वातावरण कसं बदलून गेलं आहे. अशा वेळीं तीं पणती – तीची ती ज्योत कशी पेटलेली आहे बघा तिचा शांत नि सौम्य प्रकाश चौफेर पसरला असून ती ज्योत कशी निष्कंप नि ताठ उभी राहीली आहे.

देवा, हीं माझी जीवनज्योति अशीच सदैव पेटत राहूं दे – प्रतिकूल परिस्थितीतही विष्कंप नि ताठ राहूं दे.

**भ्रमंति :**

प्रभो, तुझ्या मंदिराचे दरवाजे उघडे ठेव मला आंत प्रवेश दे आणि तुझे दर्शन घडव.

असे म्हणत मी प्रभुच्या दर्शनासाठीं प्रत्येक मंदिरात जातो. परंतु तेथे मला देवाचे दर्शन घडत नाही. हातीं कमडलू नि जपमाळ घेत मी एका मंदिरात जातो. देवाच्या मूर्तिसमोर ध्यानस्थ बसून जप करतो. परंतु छे ! तो देव मला दर्शन देत नाहीं. मला भेटत नाही. आणि प्रभुच्या दर्शनावाचूनच मला ते मंदिर सोडून दुसऱ्या मंदिरांत जावें लागते. पहिल्या मंदिरात प्रभुचे दर्शन घडले नाही. आतां दुसऱ्या मंदि-

अनुक्रम ९ दि: स्थळप्रत

रात खचितच त्याचे दर्शन घडेल ही आशा पल्लवीत होऊन मी आनंदानें दुसऱ्या मंदिरात प्रवेश करतो. जपजाप्य करून मी ध्यानस्थ बसतो. परंतु पहिल्या मंदिरातील अनुभव दुसऱ्या मंदिरातहि येतो. देवदर्शन न घड–ल्यामुळें मन अतिशय निराश होऊन जाते. प्रत्येक मंदिरात हाच अनुभव येत राहिल्यानें मी आतां निराश झालो आहे. देवाच्या दर्शना–साठीं मला अशी सारखी भ्रमंति करावी लागत आहे.

माझ्या परमेश्वरा, ही माझी भ्रमंति मी कुठवर करुं? तुझ्या दर्शनाचा ध्यास माझ्या मनीं अितका ठसला आहे कीं, तो माझ्या मनां–तून नष्ट होणें शक्य नाहीं. यास्तव ही भ्रमंति सारखीच चालूं रहाणार आहे. ह्याला कांहीं शेवट आहे. ह्याला कांहीं शेवट आहे कीं नाहीं हेंच मला कळत नाहीं.

माझ्या जगज्जीवना, मला एकदाचा दर्शन देऊन माझा उद्धार कर आणि माझी भ्रमंति संपव.

## शोध

देवा, अखंड त्रिखंडात मी तुझा शोध घेतला, अनेक तीर्थ-पर्यटने केली, धर्मग्रंथ धुंडाळले, व्रतवैकल्यें केलीं, संत समागम केला, योग साधनें केली, उपवासादिक करुन शरीरास व्यर्थ कष्ट दिलें. परंतु तुझा शोध लागला नाही.

आणि हे सारें केल्यावरहि तूं मला सांपडत नाहींस. हें पाहून मी निराश झालों. कांहीं काळ विसावा घेतला. खूप विचार केला पण मन मला स्वस्थ बसू देअीना. मला राहुन राहून वाटे कीं तूं मला कां सांपडत नाहींस? माझ्यापुढें साक्षात येऊन मला का दर्शन देत नाहीस? तुझे रूप मला कां दिसत नाही? तुझे शब्दही माझ्या कानी पडत नाही ? शेवटी तूं प्राप्त नहोण्याचे न दिसल्यानें माझे मन अधिक बेचैन झाले, अस्वस्थ झाले या अवस्थेंत मी मनशी निश्चय केला, कांही झाले तरी तुला प्राप्त केल्याशिवाय रहावयाचे नाहीं.

आणि मग मला तूझा ध्यास लागला माझे मन तंद्रूप झाले. माझ्या चित्तवृत्ती मी तुला अर्पण केल्या होणारी कर्मे माझी नसून ती

तुझी आहेत. तूंच त्या कर्माचा कर्ताकरविता आहेस. मी केवळ नामधारी आहें असे मी मानूं लागलों. माझे मन, चित्त, बुद्धी, ज्ञानेंद्रियें हीं सारीं तद्रुप – देवरुप होऊन मी अकर्ता झ.लो. त्यांतच मला तुझा ध्यास लागला माझा सारा मूळचा स्वभावच बदलून गेला माझे आचार-विचार आमूलाग्र बदलून गेले. माझी यापूर्वीची जीवनदृष्टी बदलली. व सर्व जग, देवा मला प्रभुमय भासूं लागलें.

मग मला वाटूं लागले, प्रभो, तूं माझ्या समीप आलेला आहेंस. तुझा शोध मी त्रिखंडात घेतला. परंतु तूं मला अंतरंगांत सांपडलास. तुझा शोध घ्यावयास अंतरंग तपासायला हवें. प्रभु पहायला प्रभुमय व्हावे लागतें. तो केवळ बाह्यात्कारी तीर्थपर्यटनांत, व्रतवैकल्यांत अथवा योगयागादि कृत्त्यांत नसून आपल्या अंतरंगात आहें. हें अंतरंग प्रभुमय झाले कीं तो प्रभु आपोआप दर्शन देतों.

आणि आज प्रभुसानिध्याचं सुख मला लाभत आहे आणि असें वाटते कीं लवकरच तो मला दर्शन देईल आणि माझा उद्धार करील.

**मनीषा :**

देवा, क्षणभर देखील तूं माझ्यापासून दूर जाऊ नये यासाठीं मी वाचेनें तुझें नाम घेतो. कानानें तुझे स्तवन ऐकतो. डोळ्यांनी तुझे रुप मनांत साठवितो. मनानें तुझा महिमा मनन करतो. चित्तानें तुझं चिंतन करतो आणि असें तुझे सानिध्य मी नेहमी अनुभवितो. क्षणाचीहि तुझी नि माझी ताटातूट होऊं नये यासाठीं सारखी माझी धडपड चालू असतें. ती धडपड नेंहमी करता फलद्रुप होऊं दे.

तुझें गुण गांता गांता मला मरण येतो. तुझे कीर्तन श्रवण करितां करितांच मी या इहलोहाची यात्रा संपवावी. तुझे रुप या नेत्रांनीं बघतां बघतांच मी या आयुष्यांत डोळे मिटावेत व तद्रूप होऊन जावें. मन, बुद्धि नि चित्त यांचा तुझ्याकडें ध्यास असतोंच देवा, मला तुझी आज्ञा व्हावी. ही माझ्या मनींची अिच्छा पूर्ण कर.

या संसारात मी जन्मण्यापूर्वीही तूं माझा होतास. जन्मल्यानंतर सध्या आयुष्य कंठीत असताही तुझे सानिध्य मला लाभले आहे. आणि हें माझें जींवन संपल्यावरही तुझी सोबत मला करावी लागणार.

आहे मला हे स्पष्ट दिसत असल्यानें मी तुझ्या सोबतीची आशा धरुन तुला आळवीत आहे. ती माझी आशा पूर्ण कर.

या जगांतील सर्व पदार्थ नातीगोतीं आईवडिल, बंधूभगिनी मित्र, पत्नी नि पोटची मुलें ही या जन्मी मला दिसणार, त्यांचा सुखद सहवास मला लाभणार. त्यांच्यावर मी व माझ्यावर ते प्रेम करणार. परंतु एक दिवस त्यांचा व या सा-या दिसणाऱ्या दृश्य विश्वाचा मला त्याग करावा लागणार आहे. येथील त्याग केल्यावर मी जेथे जाईन तेथे तुझेच निवासस्थान मला दिसूं लागले. देवा ह्या सध्यां दिसणाऱ्या व पुढें एक दिवस अंतरणाऱ्या अश्वाशत अशा विश्वाला मी अंतरलो तरी तूं मला अंतर देऊं नकोस ही माझ्या मनींची अिच्छा आहे.

देवा, मी पापी आहे. सर्व जगांतले दुष्ट भाव माझ्यात भरले आहेत. आणि यामुळेंच मी मला नको नकोसा झालों आहे. तूं मला सन्मार्ग दाखव. माझे आचार विचार नि उच्चार हे शुद्ध होऊन मला तुझा ध्यास लागावा व मी त्यांतच तन्मय होऊन या विश्वाचा निरोप घ्यावा व तुझ्या निवासस्थानीं सुखानें परतावे यासाठीं मला मार्ग दाखव माझ्या मनीची ही मनीषा तूं शेवटास नेशील ना?

## अश्रू :

देवा, माझे अश्रू फार मोलाचे आहेत असें मला वाटतें. कारण त्यानीच मला तुझ्या निकट आणलें. असें सामर्थ्यवान अश्रू माझ्या जवळ असतां मला त्यांचा अभिमान कां वांटू नये? ज्यावेळीं मला तुझी आठवण येई तूं मला हवास, अगदी सन्निध हवास. तुझा आशीर्वाद आपल्यावर असावा तुझी कृपादृष्टी माझ्यावर असावी असें मला वाटें. परंतु अशावेळीं तुझी मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें दिसेना. तुझे बोल कानांना अैकूं येईनात, तुझा स्पर्श माझ्या शरींराला जाणवेना. मनानें मनन, चित्तानें चिंतन करून तुझें अस्तित्व मला कळेना. त्या वेळीं मला तुझ्या गैरहजेरीमुळें निरतिशय वाअीट वाटे, पश्चाताप होअी आणि माझ्या या कमलनयनांतून मोत्यांचे अश्रू ओघळत.

मी प्रार्थना करी देवा, हे असं का होतें? – – – तूं माझ्या

दृष्टीआड का ? – – – तूं माझ्याशी असा फुरंगटून कां वागतोस? अशा वेळीं माझें मन तुझ्याकडे झेप घेअी. पश्चातापानें ते विव्हळ होअी.

तोंच झाडांच्या पानांआड फुलाचीं कळी चमकावी तशीं तुझी अस्पष्ट मूर्ति माझ्या हृदय पटलावर चमके. ढगांतून चंद्रकलेची कोर अगर काळ्याकुट ढगांतून सूर्याची थोडी बाजू चमकावी तसा तूं माझ्या हृदयांत चमकावयास आणि मग तुझ्याबद्दल मला नितांत आदर वाटे. श्रद्धा, भक्ति, प्रेम यांनी तुझ्याबद्दल माझे मन भरून जाई व कळी फुलून फूल व्हावं तशी तुझी अस्पष्ट प्रतिमा पूर्ण रूपानं माझ्या हृदयांत विराजे व मग मला धन्य धन्य वाटे.

तुझी एक लहानशी स्मृती मोठा आकार घेऊं लागे हृदयांतली छोटीशी प्रतिमा स्पष्ट रुपाने मला दिसूं लागे. निवड काळ्याकुट्ट मेघांनी भरलेल्या पृथ्वीवर पाऊस पडून सृष्टीं जशी धुवूंन व फुलून उठते त्या प्रमाणें माझ्या निराशेनें भरलेल्या अंतः करणांत – देवा, तुझ्या विरहानें क्लांत झालेल्या या माझ्या मनांत डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूबिंदुनी माझी मनोंभूमी धुवून जाई नि ती स्वच्छ होअी. तुजविषयींच्या माझ्या आशा पल्लवित होअी आणि मला वाटे कीं आपला परमेश्वर आपल्यापासून दूर नाही तो अगदी समीप आहे. आणि मग मला वाटे, हे आपले अश्रू फार मूल्यवान आहेत त्यांनीच मला तुझ्या सन्निध आणले.

**करुणा :**

देवा, मनुष्याचा जन्म तूं मला दिलास आणि ज्या उद्देशानें तूं मला मानव योनींत जन्मला घातलेस तो उद्देश मी सफल करूं शकलो नाहीं याची मला लाज वाटते.

लहानाचा मोठा मीं झालो. आणि शाळेंत जाऊ लागलो. विद्यार्थीदशेंत अभ्यासाच्या क्रमिक पुस्तकाखेरीज मी अवांतर ज्ञानाची पुस्तके वांचली नाहींत. आणि बुद्धी विशाल केली नाहीं. शिक्षण संपले आणि मी नौकरीस लागलो. प्रपंचात मग्न झालों. परंतु या प्रपंचात मी माझ्या व्यक्तिच्या स्वार्थाखेरीज दुसऱ्या कशाचाच विचार केला नाही. माझ्या व्यक्तीच्या जीवनातहि खाणें पिणें नि मजा मारणें हेंच माझ्या जीवनाचे तत्त्व झाले. स्वतः संबंधीच्या मोठेपणाच्या कल्पनेनें मला घेर–

अनुक्रम ८५४२२३ दि: ...
१५३४ ... २९।१।५८

त्यामुळें मी अहंमन्य झालों. माझे नातेवाईक, मित्रमंडळी, शेजारी पाजारी माझे वरिष्ठ अधिकारी नि कनिष्ठ नौकर वर्ग यांच्याशी माझे जिथे जिथे संबंध आले तिथे तिथे मी मनमानी करीत गेलो. व त्या सर्वां वर शेखी मिरवत गेलो. परंतु माझी ही शेखी कोण मिरवूं देणार ? प्रथम प्रथम मीं मनमानीत यशस्वी झालों खरा. परंतु कांही दिस–सांनी माझी शेखी मलाच भोंवली. अहंमन्य, स्वार्थी एकांड्या, मूर्ख अशी शेंलकी विशेषणें मला मिळत गेलीं. व समाज, माझे मित्रमंडळ माझे गांव गावांतील परीसर आणि माझे अधिकार क्षेत्र यांत माझें वजन घटले. मला सर्वजण नांवें ठेंवू लागले. तेव्हां माझे डोळे साफ उघडले. मी स्वतःचा टीकाकार झालो. मला माझ्या वागण्याची, आचार विचारांची व लोकांशी होणाऱ्या माझ्या व्यवहाराची मला चिड येऊं लागली.

आपले आपल्या आईवडिलांशीं, अिष्ट मित्राशी, गांवातील व माझ्या अधिकार क्षेत्रांत ल वरिष्ठ व कनिष्ठ मंडळींशी आपलें नातें काय ? त्यांच्या विषयींचे आपलें कर्तव्य काय ? याची मला जागृति झाली. स्वतःच्या व्यक्तिगत परिसर सोडून आपला देश, धर्म व भाषा यांच्यातील आपली कर्तव्यें यांचे स्मरण मला झालें. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्या बाबतची निष्ठा ठेंवून आपण त्यांचे ऋणी आहोत. ही भावना आता मनांत बळावू लागली आहे. त्यांच्या विषयीची कर्तव्यें पारपाडण्यासाठीं मी दैनंदिन त्या जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं करुणा भाकीत आहें.

आताशा तर स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्यापलिकडे जाऊन आपण रहातो. ते सबंध जग आणि त्या जगांतील आपल्या बांधवाबद्दल आपण कांही तरी करावें असें वाटूं लागले आहे आज जगांतील प्रत्येंक राष्ट्रांत वाढलेली बेंसुमार लोकसंख्या, उपासमारी, बेंकारी यांनी भेंसूर रुप धारण केलेले पाहून मन अस्वस्थ होते. अण्वस्त्रांचे भरमसाट उत्पादन आणि एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध युद्धासाठीं होणारी तयारी मनाला अस्वस्थ करते. जिकडें तिकडें द्वेषाचा भेंसूर अंधःकार माजला आहे. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रा विरुद्ध गरळ ओकीत आहें. एक राष्ट्रगट दुसऱ्या राष्ट्रगटाविरूद्ध युद्धांसाठीं सिद्ध झालेला आहे. आणि

सबंध जगात विद्वेश धुमाकुळ घालीत आहे. त्यानें एक दिवस हे जग युद्धाच्या खाईंत पडून बेंचिराख होणार कीं काय? या भेसूर विचारानें मनाला पछाडले आहे. अशा या जगाबाबतचे आपलें कर्तव्य म्हणून या जगांतील विद्वेश नाहीसा करावा व जगात शांतता नांदावी यासाठीं आपापल्या परी प्रयत्न करावा असें मला वाटूं लागले आहे. आणि त्या साठीं त्या विश्वकर्त्या नि विघ्नहर्त्या परमेश्वराला सर्वस्वी शरण जाऊन मी त्याचीं करूणा भाकूं लागतो.

"हे देवा, या माझ्या आप्तस्वकीय मित्रमंडळ, अधिकार-क्षेत्रांतील वरिष्ठ नि कनिष्ठ मंडळ व माझ्या कुटूंबातील मंडळी यांच्या विषयींचे माझे कर्तव्य उत्कृष्टपणें बजावण्याची मला संधि दे. माझी भाषा, देश व धर्म यांच्यावरील कर्तव्य करण्यास मला उदंड आयुष्य दे. या जगांतींल माझ्या बांधवांची सेवा करण्यास मला तुझ्या आशीर्वादाची आवश्यकता आहे. तो दे. जगांतील राष्ट्राराष्ट्रांत पसरत चाललेला विद्वेश नाहींसा करण्यासाठीं माझ्या हांतून तुझ्या प्रेरणेनें प्रयत्न घडावेत. कारण आज धुमसणाऱ्या द्वेषाग्निनें एकदा युद्धाची ठिणगी पडली तर त्यांत जगाचा विध्वंस होईल. यास्तव ही युद्धाची ठिणगी न पडण्यासाठीं आज जगांत जे थोडें महाभाग प्रयत्न करीत आहेत त्यांना या प्रयत्नांत यश दे.

अशा रीतीनें कुटुंबापासून तो जगापर्यन्त व स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्या सेवेत तुझीच सेवा घडण्याचे सत्कार्य माझ्या हातून घड-विण्यास मला सामर्थ्य दे.

## सहोदर :

लहानपणीं मला स्वदेशाबद्दलचा अभिमान, स्वधर्माबद्दल आदर, स्वभाषेबद्दल जिव्हाळा नि स्वसंस्कृतिबद्दल आस्था वाटे. तो अभिमान आदर, जिव्हाळा नि आस्था मी सदैव मनांत ठेवीला जोपासला; आणि त्यांतच माझे बालपण गेलें. परंतु पुढे जसजसें माझे वय वाढत गेलें. मी वाचन करीत गेलो, जगाचा अभ्यास करीत गेलो, मानवी भावना जाणित गेलो तसतशी मला त्यांत दोन अभ्यसनीय वस्तु आढळल्या त्यांतील एक वस्तु परमेश्वर आणि दुसरी वस्तु त्यानें निर्माण केलेलें विश्व. आणि या दोन अभ्यसनीय वस्तुं मुळें माझ्या विचाराच्या

मर्यादा वाढल्या. अभिमानाची स्थानें रुंदावली. आदराची कक्षा वाढली आणि माझें हृदय विश्वाशीं समरुप झालें. त्यामुळें माझे विचार वाढले व त्यानुसार मी वृत्ति नि कृति ठेंविली आहे.

म्हणूनच लहाणपणी मी मनांतून ज्यांच्यावर निरतिशय प्रेम केलें, आदर बाळगला, अभिमान ठेविला तो माझा देश, धर्म, भाषा, लोक नि संस्कृति या साऱ्या लोप पावून विश्वाचा विचार करूं लागलो आहे. कारण या विश्वांत विश्वाचा विचार केल्याशिवाय गत्यंतर उरलेलें नाहीं. हें सर्व विश्व आतां जवळ आले असून 'वसुधैव कुटुंबकम' या नात्यानें प्रत्येकानें वागावे. कुठल्याहि एका खंडाच्या अगर देशाच्या माणसानें दुसऱ्या खंडातील अगर देशांतींल माणसाशी आपण एकाच कुटूंबातील घटक आहोत असे समजून सहोदर भावानें वागावें. अशी माझी मनोधारणा झाली आहे. व या माझ्या मनोधारणेवरच मी माझे विचार बनविले आहेत. तसा आचार नि उच्चार ठेविला आहे. व या पुढेंहि ठेवीन.

माझ्या या नव्या तत्वांत माझा देश म्हणजे हे विश्व, माझा धर्म हा मानवी धर्म – विश्व धर्म, माझे लोक ते या विश्वाचे लोक, माझी भाषा ही विश्वाची भाषा व माझी संस्कृति ही विश्वाचीं संस्कृति अशी माझीं विचारधारा बनून गेली आहे. म्हणून या जगावर जगांतील वैचित्र नष्ट करून आपल्या विचारधारेची छटा असलेली राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतील ते या विश्वाचे शत्रू होत असें मी मानीन व त्या लोकांच्या विरुद्ध मी बंड उभारीन. जो माझ्या म्हणजे मानवी धर्मास नख लावील तो माझ्या नरड्याला नख लावीत आहे असे मी मानीन व त्यांचे विरुद्ध मी माझा आवाज उठवीन. जे लोक मानवीसंस्कृतिवर वार करतील ते ते माझे शत्रू समजून त्यांना मी धारातीर्थी पतन पाडील, ही माझी सहोदराची भावना आपल्या मनी सदैव बाळगून त्या प्रमाणें मी आचरण करीन.

" हे प्रभो, ही सहोदराची भावना सदैव माझ्या मनीं असूं दे. व ती पुर्ण आचरणांत आणण्यास मला सामर्थ्य दे.

## द्वंद्वपरिहार :

देवा, माझ्यावर तुझे अनंत उपकार आहेत. माय माउलीच्या रुपानें तूं मला जन्म दिलास. लहानाचे मोठें केलेंस. माझ्या आयुष्याच्या महत्वाच्या काली तूं मला सावरलेस. ज्या वेळीं माझे जीवन बहरले होतें व ते बहरलेले जीवन उध्वस्थ करण्यास द्वंदानें सुरवात केली. त्या वेळीं तूं अमौलिक असें अध्यात्मिक ज्ञान मला पाजलेंस आणि ते द्वंद पचवून मी माझें आयुष्य सार्थकीं लावूं शकलों.

त्या अध्यात्मिक ज्ञानामृतानें देवा, मी तुझ्या समीप आलो, तुझे महत्व मला कळलें. नि तूं माझा जीवनाधार-जीवाचा सखा झालास. आतां तुझ्या वाचून माझें आयुष्य फुकट होय. तुझे चरण धरल्यानेंच मी हा अफाट नि भयंकर असा जीवनसागर तरुन जाऊं शकेन. ही कल्पना मला आल्यानें मी तुझे चरण आतां घट्ट आवरून धरीले आहेत. ते मी कांहीं केल्या सोडणार नाही.

मी तुझ्या समीप येईपर्यंत जीवनांतील द्वंद नि मोहाचा पाश यांनीं मला घट्ट पिळून काढले होते. परंतु ते पाश तोडायला मला तूं अध्यात्मिक ज्ञानाचे अमृत पाजिलेंस आणि ते ज्ञानाच्या पाठाचे पहिले पाठ म्हणून तूंच ' अभंग गीतांजलि ' नि ' गीता प्रवचने ' हे दोन महान ग्रंथ माझ्याकडून वांचून घेतलेस. हे ग्रंथ मी कसे विसरुं ? या ग्रंथामुळेंच मी तुझ्या समीप आलो गीताप्रवचनें नि रविंद्रनाथांची गीतांजलि या ग्रंथवाचनामुळेंच माझी अध्यात्मिक ज्ञानाची गोडी वाढली. सतरा वर्षे होऊन गेली तरी या ग्रंथाचे मी वाचन, मनन, चिंतन नि निदिध्यास करतोच आहें. माझ्या लहानशा स्वाध्याय ग्रथ संग्रहालयातील हे दोन ग्रंथ मला अद्यापही प्रेरकच वाटतात. या ग्रंथाची छाया माझ्या विचारावर नि या माझ्या लिखाणावर – भावपुष्पांजलितील समीप दर्शन या पुस्तकावर पडली आहे. आणि ही 'भावपुष्पांजलि ' म्हणजे ' अभंग गीतांजली ' नि ' गीता प्रवचने ' याची एक पुरवणीच झाली आहे.

## भवसागर :

भवसागराच्या किनारीं मी उभा राहिलों. आणि चौफेर दृष्टी फिरवली. जिकडे तिकडे पाणीच पाणीं मला दिसले. लाटांचा धीरगंभीर

आवाज माझ्या कानी येत होतें. असंख्य जीव त्या सागरांत उतरले होते. त्यांतील कोणीं खोलशा पाण्यांत निवांतपणें केवळ मजा म्हणून पोहत होते व पोहून त्याच किनारी येत होते. कुणी किनाऱ्यावरच थोड्याश्या पाण्यांत चुबडूब करीत होते. कुणी पाण्यात पोहतां येत नसल्यानें गुचक्या घेत बुडणाच्या मार्गावर होते. तर कुणी बुडूं लागलेल्यांना वांचविण्यासाठीं प्रयत्न करीत होते. कुणी पट्टीचे पोहोणारे पलीकडील किनाऱ्यांवर जाण्यासाठीं जोराचे हातमारुन पलीकडील किनारा गांठीत होते. तर कुणी पलीकडील किनारा गांठून विजयी मुद्रेनें आपणामागे येणाऱ्या सवंगड्यांना हात ऊंचावून बोलावित होते व त्यांना किनारा गांठण्यासाठीं प्रोत्साहन देत होते.

दूर पलिकडील किनाऱ्यावर देवाचे एक महान मंदिर असून त्या मंदिराच्या घंटेचा आवाज माझ्या कांनीं येत होता. मंदिरांतील कळसावरील ध्वज वाऱ्याबरोबर फडकत होता. मी नम्रभावे त्या परमेश्वराला वंदन केले.

आणि मग मला वाटले, किनांऱ्यावर उभा राहून कुठवर आपण ही शोभा बघावी? कुठवर या किनारी तिष्ठत राहुन बघ्याची भूमिका स्वीकारावी ? कपडे काढून आपणहि भवसागरांत – या सागरांत उतरावें. थंडगार पाण्यांत दोन हात मारावेत, पर्वतप्राय लाटांशी झुंज घ्यावी. आणि पलिकडील किनारा गाठावा. विजयी मुद्रेनें तेथील मंदिरात प्रवेश करावा, मंदिराची घंटा वाजवून प्रभुचे दर्शन घ्यावे.

मी खरेंच कपडे काढले. दंड थोपटले आणि त्या भवसागरांत स्वतःला झोकणार तोंच माझ्या एकां मनानें आपला विचार प्रकट केला. – संशय व्यक्त केला, ते म्हणाले, या भवसागरांत तुझी धडगत लागणार नाहीं तुला त्यांत यश लाभणार नाहीं. तूं बुडून जाशील, समोरचा किनारा तुझ्या हाती येणार नाहीं. पलीकडील देवाचे दर्शन तुला लाभणार नाहीं. तुला मध्येंच जलसमाधि घ्यावी लागेल. यापेक्षा तूं येथेंच बसून सागराची जी शोभा पाहायला मिळेल ती बघ. कशाला सुखाचा जीव दुखात घालतोस.

मी क्षणभर गांगरलों. मनाला तो विचार कांहींसा पटलाहि. आणि माझा त्यामुळें विश्वास डळमळला. तोंच दुसऱ्या मनानें उचल

खाल्ली. ते म्हणाले काय वाटेल तें होवो, परमेश्वराच नांव घे आणि या अफाट महासागरांत उडी घे. अेऱ्हवी किती दिवस किनारीं बसून ही बघ्याची भूमिका करणार आहेस तूं ? आयुष्यांत एक दिवस तुला या भवसागरांत उतरावेच लागणार आहे. पर्वतप्राय लाटांशी झुंज घ्यावी लागणार आहे. मग आतांच कच खातोस कशाला ? थंडगार पाण्याला नि लाटांना भितोस कशाला? एकदां परमेश्वराचे नांव घेऊन या महासागरांत उतरलास कीं, तूं हातपाय हलवूं लागशील. परमेश्वर तुझा पाठीराखा होअील. तो तुला निर्विघ्नपणें पैलतीरी आणून पोहोंचविल. तुझा प्रयत्न आणि प्रभुचा आशिर्वाद यानेच तूं यश निश्चित गाठशील आणि पैलतीरावर जाऊन तूं आपल्या प्रभुचे दर्शन घेशील.

या विचारासरशीं मीं उठलों मला उत्साह आला प्रभुची प्रार्थना केली. प्रभो, या अनंत नि अथांग भवसागरांत पोहून यश मिळ–विण्याची व तुझे दर्शन घेण्याची माझी अिच्छा आहे. ती सफल होण्यास मला तुझ्या कृपेची आवशकता आहे. तुझा आशिर्वाद माझ्या पाठीशी असूं दे.

आणि त्यानंतर त्या भवसागरांत मी स्वत:ला लोटून घेतले.

## शिदोरी :

जीवनांचा मध्यान काळ तो, या जीवन मार्गात मी आणि माझ्या मित्रांनी जीं वाटचाल केली, त्या वाटेत आम्ही थकून गेलो. डोक्यावर सहस्त्रा रश्मींचा उन्हाचा मारा आणि डोळ्यासमोर रखरखीत ओसाड रस्ता. तहानेने घशाला कोरड पडली आणि भूकेने आम्ही विव्हळ झालो. वाटेंत विहिर अथवा पाण्याचा झरा नि त्याजवळ गर्दशी छाया दिसलीं कीं, तिथे आपण जेवायला बसावयाचे आम्हीं ठरविलें बऱ्याचशा वाटचाली नंतर एक झुळ झुळ वाहणारा ओढा व ओढ्याच्या कांठीं एक गर्दशी आंबरांअी आम्हास दिसली. मध्यान्ह काळाच्या उन्हानें आधीच जीव तगमगला होता. ओढ्याच्या थंडपाण्यानें तोंड व हातपाय धुतल्यावर कसें मोकळे वाटले. आंबराईतील शितल छायेंत मी आणि माझ्या मित्रानीं जेवण्यासाठीं आपापल्या शिदोऱ्या सोडल्या. जीवनांतील आपापल्या वकूबा प्रमाणें व रुचिप्रमाणें प्रत्येकाने आपापल्या शिदोरींत

पदार्थ आणले होते आणि कोणाच्या शिदोरींत कोणता पदार्थ आहे हें उत्सुकतेने पहाण्यासाठीं प्रत्येंकाचे लक्ष इतरांच्या शिशोरीकडे होते.

अखेंरीस सगळयांच्या शिदोऱ्या सोडल्या गेंल्या. तो काय आश्चर्य? माझ्या मित्रांनी आणलेले पदार्थ मात्र त्याहून सर्वस्वीं भिन्न होते. माझ्या मित्रांचे पदार्थ तेलगट, गोड, लज्जतदार नि भडक रंगाचे होते. या उलट मी आणलेल्या पदार्थात एकहि पदार्थ भडक रंगाचा तेलकट नि अतिगोड नव्हता. माझ्या मित्रांचे पदार्थ निःसत्व होते तर माझे सर्व पदार्थ सत्वशील होते. मित्रांच्या पदार्थाहून माझे पदार्थ सर्वस्वी भिन्न असल्यामुळें माझे मित्र मला हंसले. माझ्या रुचिभिन्नत्वामुळें माझ्या कांहीं मित्रानी मला नांवें ठेविलीं, निर्भत्सना केलीं. माझी रुचिभिन्नता पालटून मी त्यांच्या रुचिपंक्तिचा होण्यासाठी कांहींनी मला उपदेशहि केला. मी तो उपदेश केवळ अैकला व त्यांना अैकूं न येईल अशा स्वरांत म्हणालो.

“ माझ्या मित्रांनो, तुमची नि मांझी रुचिभिन्नता आहे. म्हणून तुम्ही मला नांवें ठेविता निर्भत्सना करिता आणि उपदेशही करतां परंतु तुमच्यासाठीं म्हणून मी माझी रुचि बदलविणार नाही. कारण माणसाची जशी रुचि तसा त्याचा आहार असतो आणि आहार तसे त्याचे आचार विचार असतात. सात्विक माणसाची वृत्ति सात्विक असल्याने त्याचा आहारही सात्विकच असतो. तद्वत त्याचे आचार नि विचारही सात्विकच रहातात. या उलट तामसी माणसाची बृत्ति तामसी असल्यानें त्याचा आहारही तामसींच असतो. व आचारही तामसीच असतात. मी बालपणापासून माझी वृत्ति सात्विक ठेविली आहे नि तद्वतच माझे आहार, आचार नि विचारही सात्विक ठेंविले आहेत. यापुढेही ते तसेच राहतील. कुणाच्या उपदेशानें अगर नावे ठेविल्यानें माणूस बदलत नाही. मला कितीही उपदेशाचे डोस पाजा माझ्या खाण्याच्या पदार्थात कधीही अतिगोड, तेलकट, उत्तेजक नि भडक रंगाचे पदार्थ असणार नाहीत.

मित्रांनो, तुम्ही माझ्या रुचिभिन्नतेला मनसोक्त हंसा मी माझी रुचि बदलविणार नाही. तुम्ही निसत्व नि तामसी आहाराचे अस-

ल्यानें देव, देश, धर्म भाषा समाज अि. विषयक तुमचे विचार संकुचित पणाचे आहेत. ते प्रगत नाहींत. तुमच्या आचार विचारांत सहिष्णुता नाही. सहोदराची भावना तुमच्यात नाही विश्वबंधुत्वाची कल्पना तुम्हास सहन होत नाही. आपल्या मनात असंख्य भिंती तुम्ही उभारल्या आहेंत. यामुळे आपपर भावानें तुम्ही कोणाशीही वागतां आणि या आपपर भावाच्या कल्पनेनें विचाराने तुम्ही देश, धर्म, वंश, भाषा यांची कृत्रिम विभागणी तुम्ही केली आहें. माझा धर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ, माझा वंश सर्व वंशात मोठा, माझा देश मोठा, माझी भाषाच तेवढी चांगली अशा रितीनें आपल्या विचारांची धारा तुमची असल्यानें तुमच्यांत संघर्ष निर्माण होंतात. वैर आरंभले जाते या वैरांतून शस्त्र सज्जता वाढीस लागतें व एक देश दुसऱ्या देशाविरुद्ध, एक धर्म दुसऱ्या धर्मा विरुद्ध लढावयास रक्तपात करावयास सिद्ध होतात. याचा परिणाम एक दिवस सवंध जग विनाशाच्या खाईत तर जाणार नाही ना ? त्यांचा नाश तर होणार नाही ना अशी भयंकर शंका निर्माण होते.

माझ्या मित्रांनो, आपण जसे खाऊं – जसा आहार ठेवू तद्वत आपले विचार बनतील तसेंच आचरणहि आपल्याकडून घडेल. यास्तव आहाराला फार प्राधान्य आहें. आहारावर, विचार, आचार नि उच्चार अवलंबून आहेत. तामसी आहार करणाऱ्याचे आचार विचार नि उच्चार हे तामसीच असतात. नि सात्विक आहार करणाऱ्यांचे आचार विचार नि उच्चार हे सात्विकच असतात. म्हणूनच सात्विक पुरुषाचे, देव धर्म, देश नि भाषा या बाबतचे दृष्टिकोन नेहमी विशालच असतात. मानवी मूल्यावर ते जगाकडे पहात असतात. त्यांच्या विचारांत विश्व हेच एक राष्ट्र आहे. मानवी धर्म हाच खरा धर्म, नि मानवाची भाषा हीच खरी भाषा होय. त्यांचा लौकिक देश, धर्म, देव नि भाषा कोणतींही असली तरी अंतीम मूल्य ते मानवाला देतात. मानवाला कल्याणकारक होईल असे ते विचार करतात. आचार ठेवतात नि वाणी उच्चारतात यासर्वा मागें त्यांचा आहार सात्विक असतो हे विसरून कसे चालेल ?

माझ्या मित्रांनो, माझी रुचि बदलविण्यासाठीं तुम्हां पैकी कांहींनी माझी निर्भत्सना केली. कांहीनी उपदेशाचे डोस पाजले तद्वत मी

तुम्हास हासणार नाही नांवे ठेवणार नाहीं अगर तुमच्यासारखे उपदेशही करणार नाही. माझ्या सात्विक आहाराचे कारण काय तेवढेंच मी आपणास निवेदिले या निवेदनावर आपण विचार करा व योग्य वाटेल तो निर्णय घेऊन आपण आपला आहार, आचार, विचार नि उच्चार ठेवा. केवळ उपदेशानें माणसाची वृत्ति, आहार विचार नि उच्चार बदलत नाहीं. ते संस्कारानें बदलतात.

दा. क्र.

## अिप्सित :

अिप्सिताकडें जाण्याचा मी मार्ग अनुसरला. आणि त्यांत बरीच वाटचाल केली. मला वाटलें, आतां वाट थोडी राहिली. ही वाट आक्रमिली गेलीं कीं, आपला मार्ग संपला आणि जिथें आपला मार्ग संपला तिथेच आपलें अिप्सित आपणांस मिळेल. या अिप्सितानंतर आपला मार्गही संपेल नि आपले भटकणेही संपेल.

यास्तव मी त्या मार्गाक्रमणांच्या दिशेने दूरवर पाहिले. कांहीं अंतरावर क्षितिज आकाशाला टेंकले होते. मनाशी निश्चय केला ह्या क्षितिजा पर्यन्त वाटेल ते होवो जावयाचे आणि तिथपर्यन्त गेलो कीं तेथेंच आपले अिप्सित आपणांस मिळेल. मी मनाची तयारी केली. माझा उत्साह वाढला. आणि मार्गाक्रमण सुरु केले. पायाची गति वाढविली. एकेक पावलाच्या गतिबरोबर ते अिप्सित एक एक पाऊल जवळ येत आहेंसे वाटत होते. मिनिटामागून मिनीटे जात होती. पावलांगणिक मागे पडत होती आणि पुढील प्रदेश पावलांगणिक मागे पडत होंते. मला काळाचें भान नव्हते. डोळ्यासमोर एकच साध्य होते अन् ते म्हणजे अिप्सित गाठण्याचे. मार्गात मी अनेक अनेक नद्या ओलांडल्या. कांटे नि खांचखळगे मागें टाकलें होते. गांव नि नगरे ओलांडली नि मी पुढें गेलो.

परंतु छे : आकाशाला टेकलेले क्षितिज जवळ येअीना आणि मी जो जो मार्ग आक्रमु लागलो तो तो ते क्षितिज आणखी विशाल होत गेले. मार्ग सरेना नि अिप्सित गांठता येईना.

शेवटी मी निराशेने थकून गेलो. जवळ शीतल छाया नाही की प्यायला गार पाणी नाही, माझा धीर सुटला दुपारचा समय तो

डोक्यावर प्रखर उन्हाचा मारा चालूच होता. चालून चालून पाय थकले. होते. नि घामानें अंग ओलेचिंब झाले होते. अंगात त्राण नव्हता. नि जिभेला कोरड पडली मीं धाडकन जमिनीवर पडलो. कोरड पडलेल्या जिभेनें मी ओरडलो, "पाणी पाणी" आणि थोडयाच वेळांत मी मुर्छित झालो.

ज्या वेळीं मी शुद्धींवर आलों त्यावेळीं मला जाणवलें कीं मी कुणाच्या तरी मांडीवर असून तो मला कुरवाळीत आहे. निश्चित माझा देवच होता तो. अंतरीची ईच्छा साकार होऊन तिनें मला प्रगाढ अलिंगण दिलं होतं. तो परमात्मा माझ्या डोक्यावर हात ठेवून मला कुरवाळीत म्हणाला, " बा! देवाचा मार्ग हा बिकट आहे. कांटयाकुटयाचा आहे. खांचखळग्याचा आहे. तो मार्ग पूर्ण करावयास पूर्व संचित लागते. ते तुजपाशी भरपूर आहे. ज्या मार्गानें तूं जातो आहेस त्याचा शेवट केव्हां होईल असा विचार तुझ्या अधिऱ्या मनांत येवूं देऊ नकोस. असें अधीरे मन कामाचे नाही. जो मार्ग तू अवलंबिलास त्याला शेवट आहे. निश्चित शेवट आहे. आणि त्याच्या शेवटींच तुला तुझे अिप्सित मिळणार आहे. तो परमात्मा तुला प्राप्त होणार आहे. परमात्म्याचे अिप्सित तुझ्या दैवात आहे. परंतु ते साध्य करण्यासाठी तूं निरिच्छ मनानें हळूं हळूं कां होअींना, मार्ग क्रमण कर तुला त्या मार्गाच्या शेवटीं परमेश्वर प्राप्तीचे अिप्सित लवकरच मिळेल माझा आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहे.

माझी तहान भागली गेलीं. भूक शमलीं गेली. कारण मी अमृत प्राशन केले होते. मला नवजीवन मिळाले होते डोळें चोळून मी माझ्या मार्गाकिडे दृष्टिक्षेप केला. तों ती कांटेरी वाट मला फुलासारखी वाटली. नि सूर्याचं प्रखर उन चंद्राचं शीतल चांदणं भासलं, माझ्या अंगात नवा उत्साह निर्माण झाला. मन ताजे तवाने झाले. आणि मी एकदम उठलो नि मार्गक्रमणांस सुरुवात केली.

मार्ग? .. ज्या मार्गाच्या शेवटीं माझे अिप्सित होते.

## आसरा :

देवा, न कळत मला एकदम आनंद होतो. आणि या आनंदात तुज विषयींची कृतज्ञ भावना जागी होते. या कृतज्ञतेने माझें डोळे भक्ति-

भावानें भरुन येतात. त्यांतून गंगा यमुना वाहूं लागतात. विनम्रभावे हात जोडून मीं तुला सर्वस्वी शरण जातो. आणि मग माझें अंत:करण त्यावेळीं तुझ्याशीं बोलूं लागते.

" माझ्यां देवा, केवळ तुझ्या कृपा प्रसादानें मी तुझा भक्त झालो. माझें मन तुझ्याकडे आत्कृष्ट झालें. माझ्यात सद्ग्रंथाचीं अध्यात्मिक वाचनाची गोडी निर्माण झाली. मला सत्संग घडला. तुजविषयींची भजने मी ऐकली, गायिलीं कीर्तन, श्रवण केलीत तुझा महिमा ऐकला आणि त्यानं तुझ श्रेष्ठत्व मला पटलं. जीवनांतील पराभूत जीव मी सर्वस्वी तुला शरण आलो. तुझ्या समीप अगदीं समीप आलों आणि हें सारे घडले हे केवळ तुझ्या कृपेमुळेंच – केवळ तुझ्या कृपेमुळेच.

" माझ्या देवा, ही दृष्टि तूं माझ्यावर ठेविली नसतीस तर तर माझी किती अधोगती झाली असती? जीवन पथावरून मी मार्ग भ्रष्ट झालो असतो. अध:पतित झालो असतो. हा केवळ विचारच माझ्या मनाला अस्वस्थ करतो आणि म्हणून कृतज्ञेतेने मी तुला सर्वस्वी शरण जातो. परोपकारीं विनवणी करितो कीं, 'देवा, मला हेंच अध्यात्मिक जीवन दे. आतां मला तुझ्यांत विलीन कर. माझं जीवन आतां तुझ्यांत सम्मीलित कर. हींच एक आशा माझ्या मनीं उग्ली आहे. ती सफल कर."

## कसोटी :

माझ्या देवा, ज्यावेळीं तूं माझी भक्त म्हणून कसोटी पाहतोस, त्यावेळी माझ्या शरीराला नि मनाला फार वेदना होतात. मला हें जीवन नकोसे होते. मनाला उद्वेग येतो. नको हा देह, नको हा माणसाचा जन्म, नको तुझी ओढ. आणि त्या तुझ्या ओंढीमुळें माझी होणारी कसोटी अशा वेळीं रात्रंदिवस मी शोक करूं लागतो. आणि तुला आळवतो " देवा, मला या कसोटीच्या यातनांतून सोडव एकदाचा. या कसोटीपेक्षां मला मृत्यू दे."

मानसिक दु:खाचा आवेग ओसरल्यामूळें देवा, माझ्या मनसागराच्या पैलतीरावर उभाराहून तूं मला हांक मारतोस, " भक्ता ये पैलतीरावरून ऐल तीरावर यें."

सागराच्या पैलतीरावरील तुझे ध्वनितरंग माझ्या कर्णपटलावर यतात. पलिकडील थंडगार वाऱ्यानं अंग पुलकित व्हावं तसं माझं सर्वांग नि हृदय पुलक्ति होतं. मला आनंद होतो. आणि मग मला वाटतं कुणीतरी मायेचं माणूस मला जवळ घेतयं, मला आपल्या पोटाशी लावतयं आणि मग मला वाटतं प्रभू मंदिरांतील चढाव्या लागणाऱ्या सोपानाची एक पायरी आपण चढलोय, प्रभू दर्शन एक पायरी खालीं आली आहे, मला दुप्पट उत्साह येतो. माझे मन आशादायी बनते. माझ्या देवा. माझ्या मनांतील तुजविषयींचा भक्तिभाव दाटून येतो. तूं मला आवडूं लागतोस. भक्तिभावानें माझ्या नेंत्रातून अश्रूबिंदू ओघळतात. आणि मी नम्र भावें तुला शरण जातो. व तुझी प्रार्थना करतो.

" माझ्या प्रभो, तुझ्या दर्शनासाठीं तुजविषयींची माझी ओढ जन्मोजन्मी कायम ठेव. चिरंतन ठेव. तुझ्या प्राप्तिस्तव मला हजारो जन्में घ्यावी लागलीत तरी ती मी आनंदानें घेईन त्यालाठीं तूं कितिहि कठोर कसोटया लाविल्यास तरी त्या कसोटयांना मी भिणार नाहीं. आणि अशा अनेक कसोटयानंतर मात्र माझ्या प्रभो, मी तुला प्राप्त करुन घेईन.

## आशिर्वाद :

देवी शारदे,तुझं बोट धरुन हा बालक आतांशीं चालूं लागला आहे त्याचं बोट मजबूत धर आणि त्याला आणखी चालव, त्याच्या चालण्याची गति वाढव. तुझ्या बोटाच्या संगतीनं तो जे आताशीं चालायचं शिकला. त्या गोष्टिनंच त्याला अभिमान वाटतो.त्या साहायाच्या सामर्थ्यानंच त्यांच्यांत आत्मविश्वास दुणावला आहे. आणि त्याला वाटतं ह्या देवी शारदेच्या कृपा प्रसादानेंच-तिच्या साहायानंच आपण हा दुर्लंघ्य पर्वत ओलांडून जाऊं. अन्य सागर तरुन जाऊं.

मनी फार मोठी आशा घेऊन देवी, तो तुझ्या मंदिरी आला आहे. ती त्याची आशा सफल कर देवी, तुझं लेकरु तो. तुझा बालक तो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
२५ निबंध
१८०३४ ९८।७।६८

तुझ्या उदरींच तो जन्माला आला आहे. तुझ्या नांवाचाच अभिमान त्याला आहे. तुझ्या त्या लेकराच्या पाठींशीच तूं उभी रहा. सदैवासाठीं उभी रहा.

रात्र असो कीं दिवस असो, तो तुझी उपासना करतो. तुझं नांव घेतो, स्तवन गातो,तुझा महिमा वर्णन करितो. तुझ्या भक्ति शिवाय एक पळ देखील त्याचा व्यर्थ जात नाहीं. देवी शारदे, तूं त्याला आशिर्वाद दे.

तुझ्या कृपाप्रसादानेंच तो सारीं सृष्टी डोळसपणानें पाहील अभ्यासील आणि तुझ्या आशिर्वादानेंच तो आपली लेखणी उचलील. परमेश्वराच्या महिमेचं वर्णन करील. राष्ट्रभक्तिचे पोवाडे लिहिल. मानवता धर्म पालनाचं आवाहन करील. जगांतील सुखाचें संवर्धन व दुःखाचे परिमार्जन आपल्या लेखणीच्या फटकाऱ्यानं तो करील जगांतील हुकुमशाहीच्या नि लष्करांच्या जुलमी नि अन्यायी राजवटीवर तो टिकास्त्र चालविल व तो लोकशाहीचा पुरस्कार करील. वर्ग लढे, स्त्री दास्य गुलामगिरी, स्पृश्यास्पृश्यता नि वर्ण विव्देष यांवर आपले उत्कृष्ट विचार मांडून समतेचा, सत्येचा नि न्यायाचा पुरस्कार करील व त्याचे साहित्य म्हणजे सत्यं शिवं सुंदरमचा अविष्कार होईल.

यासाठीं देवीं शारदे, तुझा वरदहस्त त्याच्यावर असूं दे.

## ऋणनिर्देश :

माझ्या आयुष्यांत मी सर्वांचे ऋण फेडीन परंतु ईश्वर, जन्मभूमि, गुरु ( ऋषि ), आई नि वडील यांचे ऋण माझ्याकडून फिटले जाणार नाहीं, कारण त्यांचे अनंत उपकार माझ्यावर झालेले आहेत. ते ऋण डोक्यावर ठेवूनच मी मरेन व मरतां मरतां धन्य होईन.

पवित्र परमेश्वरानें ही सृष्टि निर्माण केली. जड नि अजड सृष्टीतील जीव जिवाणू, वनस्पति, जलचरप्राणी, मानवप्राणी ई. त्यानेच निर्माण केलेत.त्यांतील मी एक क्षुल्लक जीव आहे. त्या पवित्र परमेश्वरानें मला मानव योनींत जन्माला घातले व त्याची सेवा करण्यास ही मला संधी दिली हा माझ्या व्यक्तिवर त्याचा केवढा तरी उपकार आहे. उपकार, हे ऋण माझ्याकडून फेडवले जाणार नाहीं.

भारत ही माझी जन्मभूमि पितृभूमि, मातृभूमि, कर्मभूमि नि धर्मभूमि आहे. भारताचा इतिहास ओजस्वी, संस्कृति विशाल नि तत्वज्ञान महान आहे. अशा पवित्र भूमींत माझा जन्म झाला मी वाढलो नि शिक्षण घेतले. या शिक्षणांत त्या माझ्या भूमिचा इतिहास संस्कृति नि तत्वज्ञान वाचल्यावर मला तिचा अभिमान वाटला. भारत भूमिवर जन्मलेले रणघुरंधर, विचारक, तत्वचिंतक,साधुसंत, कवि लेखक नि संशोधक यांचेबद्दल मला अभिमान नि आदर वाटला, अशा थोर सुपुत्रांना जन्म देणाऱ्या भारतमातेस मी वंदन केले आणि मग मला वाटलें जननिजन्मभूमिश्च स्वर्गादपिगिरियसि अशा स्वर्गाहुन थोर असलेल्या जन्म–भूमिचे–भारतमातेचे उपकार आपल्याकडून कसे फिटले जातील.

गीता, उपनिषदें ब्रम्हसूत्रें ही प्रस्थान त्रयी पातंजलयोग दर्शन ई. षडदर्शनें, ऋग्वेदोदी वेद, श्री. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाची गाथा, दासबोध, ई. ग्रंथाचे वाचन, मनन चिंतन नि–दिध्यासनानें उपरिनिर्दिष्ट ग्रंथाचे कर्ते माझे गुरु बनले आहेत. माझ्या जीवनांत ते माझे जीवन पथ प्रदर्शक बनले आहेत. त्यांच्या विचारानें माझा मनोपिंड पोसला गेला आहे. त्यांच्या विचारानुसार माझे आचार विचार नि उच्चार मी ठेवीले आहेत. ते माझे मानीव गुरु झाले आहेत या माझ्या मानवी गुरुंचे उपकार ऋण फेडण्याची कल्पना मला स्वप्ना तहिं शक्य होणार नाहीं.

नि ते माझे आई, वडिल, काका, काकु, आजोवा, भाऊ नि बहिणी ज्यांच्या सहवासांत मी बालपणीचे दिवस घालविले, ज्यांनी मला लहानाचे मोठे केले योग्य असें शिक्षण दिले. सदाचरणाचे नि सदविचां–राचे प्राथमिक धडे या माझ्या बालपणींच मला दिले गेले. सदाचरणाचे नि सदविचाराचें प्राथमिक धडे माझ्या बालपणींच एकत्र कुटंबात मला दिलेले होते. त्या सर्व कुटुंबधारकाचें केवढे उपकार माझ्यावर झाले आहेत. अशा या समृद्ध, संपन्न नि विशाल अंतःकरण्याच्या कुटुंबात माझा जन्म झाला याचा मला अभिमान वाटतो. बालपणापासूनच ह्या कुटुंबा–तील सहवासांत माझ्या अंतःकरणांत खोटा नि उच्च प्रतीचें संस्कार

उमटले गेले. नि मी जेणें करुन या अवस्थेत आलो. या कुटुंबातील प्रत्येक घटकाचा नि विषत: माझ्या नि वडिलांचे माझ्यावर मोठे उपकार झाले आहेत. अशा या थोर माता पित्यांचे नि कुटुंबातील सर्व अन्य मंडळीचे ऋण सदैव मी माझ्या मनों मानसीं वागवीन आपले उर्वरित आयुष्य कठीण आणि त्यांतच सुखानें मरेन.

## आनंदी आनंद :

न कळत मला एकदम आनंद होतो. या आनंदात मी पूर्णपणे लीन झालो असून जिकडे तिकडे हाच आनंद भरल्या असल्याचे मला भासू लागते.

आनंद माझ्यासमोर आनंद माझ्या मागे, आनंद खाली, नि आनंद वर, आनंद पूर्वेला,आनंद पश्चिमेला,तो उत्तरेला नि तो दक्षिणेंला तो माझ्यांत, त्यांच्यांत दऱ्या खोऱ्यांत, तो सागरात, डोंगरात, किंबहूना साऱ्या ब्रम्हांडांत भरुन उरला आहे. त्याला आदि नाहीं, अंत नाहीं. अशा रीतीनें तो आनंद चोंहिकडे ब्रह्मांडांत भरलेला पाहुन माझ्यांतील सारेभान हरपून जावे. जीवनाची सुरुवात येथूनच आहे व शेवटीहि याच्यातच आहे. किबहुंना जीवन स्वंस्व हेच आहे असे वाटून सर्वाच्या शेंवटी त्या आनंदातच माझ्या आनंदमय परमात्म्याच्या पादुका मला दिसूं लागतात. आणि त्यावरच मी माझे मस्तक ठेवून त्याला सर्वस्वी शरण जातो.

## आगमन :

आर्ये बऱ्याच वर्षापासून अंतरलेला तुझा प्रियकर तुझ्याकडे येणार आहे. तुला भेटण्यासाठीं–तुझ्यांत कायमचे वास्तव्य करण्यासाठीं येत आहे. बहुता दिवसांचं हे सकृत फळा येत आहे. फार दिवसांची तुझी अिच्छा आतां सफल होत आहे. म्हणून आर्ये, तुला मोठा आनंद झाला असेल. चित्तवृत्ति प्रफूल्लित झाल्या असतील आणि अशा वेळीं तूं आपल्या प्रियकाराच्या स्वागताची तयारी करीत आहेत.

प्रमदे, मनीं झालेल्या त्यानंदानें-आनंदातिशयानें तुझा तुझ्या वरील ताबा सुटून जाईल व आपल्या प्रियकरासमोर त्याचे स्वागत करतांना

तुझ्या हातुन अपराध-प्रमाद घडतील, या प्रमादानें कदाचित तुझा प्रियकर तुला अंतरेल- कायमचा अंतरेल यास्तव भामिनी तूं आपले मन आपल्या ताब्यांत ठेव आपल्या चितवृति आपल्या कह्यांत ठेव स्थितप्रज्ञाची वृति धारण करुन तूं आपल्या प्रियकराच्या स्वागताची तयारी कर.

थोड्याच दिवसांत तो तुझ्यासमोर प्रगट होईल त्यांचे आगमन तुझ्या दारीं होईल. तूं त्यावेळीं हंसतमुखानें त्यासमोर जा. पूजा पात्र हातांत घेऊन त्यातील कुंकुमतिलक त्याच्या भाळी लाव, अक्षदा त्याच्या डोक्यावरुन वहा, वदनानें शुभ नामोच्चार करीत त्याच्या मस्तकावरुन हातांतील पंचारति ओवाळ. अश्रुनीं डब डडलेल्या नेंत्रानी त्याच आकंरु-प्राशन कर आणि सर्व भावें तूं त्याला शरण जा.

तो तुझा प्रियकर सर्वस्वी तुझा स्विकार करील.

## वेडेचार

काय हा माझा वेडेचार पहा !

मी माझ्याशींच बोलतो. माझ्यावरच रागवतो. आरडतो. ओरडतो. स्वतःच स्वतःला दूषणें देतो. आणि या माझ्या जीवनांत मी पूर्णपणें अपेशी झालो असें समजून स्वःच स्वतःच्या दैवाला दोष देतो, एवढ्यानेंही माझ्या मनाचे समाधान होत नाहीं म्हणून कीं काय मी स्वतःच स्वतःला बडवून घेतो आणि मोठयानें रडतो.

लोक माझे हे वेडेचार पाहुन मला हंसतात, माझी निंदा करतात, कुचेष्ठा करतात,काय माझी ही अशी केविलवाणी परिस्थितीत?

माझ्या देवा, मला वाटतं केवळ तुझ्यासाठींच मी हा वेडेचार पत्करला आहे. तुझ्या वाचून माझे जीवन शुन्य आहे, भकास आहे, अरण्यावत् आहे ही माझी जीवन विषयक भूमिका आहें. तुझ्या दर्शना-साठीं माझे डोळे आसुसले आहेंत. तुझा उद्धार झाला हे तुझ्या तोंडाचे उदगार ऐकण्यासाठीं आतूर झालेले माझे कर्ण आणि तुझ्या दर्शनानें कृतार्थ होणारे माझे डोळे नि आशिर्वादानें स्वतःला धन्य समजणारे माझे हृदय या सर्वांची संभावना केलीस तूं तुझं दुर्लभ दर्शन मला अद्याप

घडलं नाहीं, एकदांही तुझे शब्द माझ्या कर्णपटलावर आले नाहींत. या मुळेच मी संपूर्णपणें निराश झालो आहे. माझे हृदय खिन्न झालं आहे. दु:खी नि विषण्ण झालं आहे.या विषयातूनच माझ्या मनाचा तोल सुटला आहे नि मी हा वेडेचार पत्करला आहे.

या जीवनांत मी पूर्णपणें अपेशी झालो आहे. जीवन भकास झाले आहे. ही जाणीव शल्यासारखी माझ्या मनाला बोचते आहे. ती मला स्वस्थ बसूं देत नाहीं. आणि या मुळेंच माझ्या मनावरील ताबा सुटला आहे. मीच स्वत:चा शुत्र झालों आहे. स्वत:च स्वत:ला दोष दे स्वत:च स्वत:ला शिव्या दे, स्वत:च स्वत:ला बडवून घेण्याचा वेडेचार मी आरंभिला आहे.

माझ्या देवा,माझी ही स्थिती आणखी किती दिवस चालणार आहे? की याला अंतच नाही ? मी मरेपर्यन्त जर ही अशीच स्थिति राहिली तर पुढील जन्मी देखील मी असाच वेडा राहीन की काय? जन्म जन्मांतरी मी हे वेडेचार आचारावे काय ? अरेरे, काय माझ्या दैवात तरी हे ?

मला कांहींच सुचत नाही. मला कांहींच समजत नाही. माझं मन नि बुद्धी कांहींच काम करीत नाही. मी आता करावे तरी काय ? माझ्या परमेश्वरा, मी आता काय करू ? कुठे जाऊ ? जिथे जाईन तिथे हा वेडेचारहि मी तुला अर्पण करतो. तूं मला तार कीं मार तुझ्या चरणाशीच मी आश्रयाला येतो. या शरणागताला पदरी घे. या वेडेचारापासून मला वाचव व माझा उद्धार कर.

**वाटचाल :**

माझ्या देवा, माझं सारं व्यक्तिमहत्व मी तुला दिलं आहे. माझं सारं सर्वस्व मी तुला अर्पिलं आहे. आणि मी त्यानं भिकारी बनलो आहे.

हातीं झोळी घेत, माझ्या देवा मी माझं स्थान सोडून तुझ्या स्थानाप्रत निघालो आहे. तुझा मार्ग अवलंबिला आहे. तुझ्या मार्गा-वरून तुझं स्थान मिळेपर्यंन्त मला किती सायास घ्यावे लागतील त्याची

गणती आहे काय? त्या मार्गावरील दुर्लंघ्य पर्वत मला ओलांडावा लागेल. अजय सागर तरावा लागेल. दुर्गम मार्गावरील कांटेकुटे तुडवित जावे लागेल. लहानमोठ्या खड्डयांतून जावे लागेल. जिथे विसाव्यासाठीं घनदाट छाया नाही कीं पिण्यासाठीं पाण्याची विहिर नि ओढा नाही अशा बैराण मार्गावरून जावे लागेल. आणि लोक निंदेची टिका सहन करावी लागेल.

दिवस असो कीं रात्र असो मार्गात खंड पडूं द्यावा लागणार नाही. अमावस्येची काळी किर्र रात्र असो कीं पौर्णिमेचें पिठासारखे शुभ्र चांदणे असो मार्ग भ्रष्ट होऊन कसे चालेल? दिवसामागून दिवस सप्ताहामागून सप्ताह, मासामागून मास, वर्षामागून वर्षे, नि जन्मामागून जन्मे हीच वाटचाल मला करावी लागेल. हरिनामाची माला जपत, हरिचा नामोच्चार मुखानें गात, हरिचा मार्ग धरावा लागेल. आणि अशा या मार्गात कोणत्याहि प्रकारचा लोभ,मोह, मद, मत्सर अि. विकारापासून फटकून वागावे लागेल. असा हा भगवद्मार्ग सदैव मला अवलंबावा लागेल.

माझ्या देवा, तुझ्या आशिर्वादावाचून मला हे कसे बरे शक्य होणार ? यास्तव तुझी कृपा माझ्या पाठीशी असूं दे म्हणजे मी या तुझ्या मार्गानें परत येईन.

**याचक :**

माझ्या याचका, आता तुला मी काय देऊ रे ?

लीनतेनें आता माझ्याजवळ येऊन तूं कसली याचना करतो आहेस बरे ? माझ्या घराच्या उंबरठ्यावर येऊन तूं कशासाठीं घुटमळतो आहेस रे ?

माझं जीवन सर्वस्वीं मी तुला अर्पण केलं आहे. माझी काया, वाचा,नि मन मी तुझ्या चरणी वाहिले आहेत.माझ्या जिविताच्या आशा आकांक्षा मी तुला समर्पित केल्या आहेत. माझी पंचेन्द्रिये मी तुझ्या प्राप्तिसाठी राबविली आहेंत. माझ्या ध्यानीं मनीं नि स्वप्नी तुझ्या शिवाय दुसरा विचार येत नाहीं. जागृतावस्थेत तूं मला दिसतोस. निद्रितावस्थेतहि तूं माझ्या सोबतीला असतोस असं मला वाटतं. रात्री

संबंध रात्रभर तुझ्या विषयींची स्वप्नेंच मला पडतात. मी मनानें तुझं मनन करतो नि चित्तानें चिंतन करतो. माझ्या आयुष्यांतील एकेका क्षणांत नि पळां पळात मला तुझं अस्तित्व निकटत्व जाणवत आहे. माझ्या प्रत्येक श्वासोश्वासांत नि स्पंदनांत सूंच सामावलेला आहेस. माझ्या जिविताचे गोठोडे, पंचेन्द्रिये, मन नि बुद्धि तुझ्या चरणी वाहिल्यावर तुला समर्पित केल्यावर आता तुला देण्यासाठीं माझे म्हणून माझेजवळ कांहींच शिल्लक नाही. आणि वेडचा, तूं तर येथे माझ्या कुटिराशी माझ्या घरच्या अंगणांत-उंबरठ्यावर उभा राहून "माझ्यासाठी घुटमळतो आहेस आणि मला म्हणतो आहे, " मला कांही तरी दे".

आता माझ्या याचका, मी आता तुला काय देऊं? आणि कोणत्या प्रकारे गोड बोलून तुला परत करूं? परंतु छे ! आतां तूं विन्मुख होऊन परत जाऊ नकोस. मी आता सर्वस्वी तुझाच होतो. माझें स्थान सोडून मीच तुझ्या पाठीमागे तुझ्या स्थानाप्रत मुकाटचानें येतो. मग तूं मला कुठेंही ने श्रीरामामागे सीतादेवी वनवासाला गेली तद्वत तुझ्या बरोबर मी वनवासाला गेलो तरी चालेल. किंवा बिंबामागे प्रतिबिंब अथवा प्रकाशामागे छाया जाते तद्वत मी तुझ्या मागे येतो. यासाठीं याचका, तूं पुढे हो मी तुझ्या मागे मागे येतो.

## विनवणी :

माझ्या देवा, तूं कां बरे अजून माझ्या समीप आला नाहीस? मला दर्शन देऊन कृतार्थ केले नाहीस ? तुला का माझा कंटाळा आला ? कीं, माझ्या दैवांतच तुझे दर्शन नाहीं. अनेक जन्माच्या तुटीनें विरहानें मी दुःखी नि कष्टी झालो आहे. या दुःखी नि कष्टी अवस्थेत मी किती वेळ राहूं रे ?

माझं जीवन मी तुला अर्पण केलं आहे. माझं मन, चित्त नि अंतःकरण तुझ्याकडे लागलं आहे. इंद्रियांची धांव तुझ्याकडे लागली आहे. वाचेनें मी तुझेच नांव घेतो. कर्णानी मी तुझाच महिमा ऐकतो. डोळ्यांनी मी तुझ्याच दर्शनाचा ध्यास घेतला आहें. तुझ्या भजनांत नि

किर्तनांत मी इतका रंगून जातो, तल्लीन होतो कीं त्या नांदातच मी नाचूं लागतो. गाउं लागतो. नि टाळचा वाजवितो. या माझ्या कृतीनें माझे हात नि पाय थकून जातात.

प्राणप्रिया माझ्या हृदयाच्या वीणेने मी तुझाच राग छेडला आहे. माझ्या मनांत मी तुझेंच मनन करतो नि चित्ताने चिंतन करतो. माझ्या ध्यानीं नि मनीं तूंच सामावलेला आहेस. असं असता कठोरा, तू मला कां दर्शन देत नाहीस ? तुझे मधूर शब्द माझ्या कानी पाडीत नाहीस. तुझे दर्शन घेण्यासाठीं माझे नेत्र अधीर झाले आहेत. व तुझा उद्धार केला आहे हे तुझ्या मुखाचे उद्गार ऐकण्यासाठीं मी कासावीस झालो आहे.

ये, कठोरा, तुझ्या हृदयांतील माझे वरील काठिण्य कमी कर. दयाघना, माझ्यावर दया कर. कृपा सागरा, माझ्यावर कृपेचा एक कटाक्ष टाक नि उद्धार कर, माझा उद्धार कर.

पादूका :

ज्यावेळेस माझे विचार त्या माझ्या देवाकडे धाव घेतात कल्पना देवाकडे विहार करते. त्यावेळीं त्या विचारांचा नि कल्पनेचा प्रदेश मला चिर परिचित वाटतो. त्या प्रदेशाचे नि आपले नाते फार पूर्वीपासूनचे आहे असे मला वाटते. आणि बऱ्याच दिवसांनी तो प्रशदे मला पहावयास मिळाला म्हणून मला अननुभुत आनंद होतो.

हा प्रदेश ओलांडला गेला कीं त्याच्या शेवटी मला एक प्रशस्त नि भव्य मन्दिर दिसते. मला वाटते माझे 'मानस मन्दिर' तर नसावे ना ते ? या मन्दिरांत मला माझ्या प्रिय देवाच्या पादूका दिसतात. जन्म जन्मातरी मी त्या पादूकांची अविरत नि अखंडित सेवा केली आहे. मनोभावे, बुद्धीने, कल्पनेने, विचाराने एक चित्तें-देहेन्द्रिये मी त्या पादूकांची सेवा करीत आहे. पूजा करीत आहे. ध्यान मनन नि चिंतन करीत आहे. माझ्या पंचेंद्रियांच्या प्रत्येक विषयावर त्या पादुकाच विराजीत आहेत. आणि बाह्य सृष्टीतहि त्याच विराजीत आहेत.

माझ्या मनांतील विचारांची, तर्काची, कल्पनेची नि बुद्धीची झेंप संपल्याकर दिसणाऱ्या माझ्या मानस मंदिरांत जेव्हा मला त्या पादुका दिसतात तेव्हा मला धन्यता वाटते आणि मी त्या पादुकांना सर्वभावे शरण जाऊन त्यांची षोडशोपचारे पूजा करितो. माझ्या जीवनाची प्रेरणा आता त्या पादुका बनल्या आहेत.

असं वाटतं, त्या पादुकांची सेवा माझ्या हातून निरंतर घडो. पादुकांचं ध्यान, धारणा, पूजा नि सेवा अखंड माझ्या हातून होवो. त्या पादुकांतून माझा ईश्वर प्रगट होवो. त्याला सर्वभावे शरण जाऊन मी त्यांस प्रगाढ आलिंगन द्यावे व माझी अंतर्ज्योति त्या देवाच्या महान ज्योतीशीं विलीन व्हावी.

**बोध :**

"मानवा, खिन्न मनानं तूं आपल्या कुटिरांत कशाला बसला आहेस? यें, आपले कुटिर सोड. आणि त्या बाहेरील निसर्गाचा कोश तर पहा. तुम्हा मानवांसाठीं त्याने आपला कोश उघडा ठेविला आहे. तो तर बघ.

" हा बघ, हंसरा चंद्रमा, हें निळेभोर आकाश. आकाशाच्या गालिचावरील ही तारकांची वेलबुट्टी. पिठासारखे पांढरेशुभ्र चांदणे. ही फु ललेली टपोरी फुलें. सौम्य नि शीतल वहाणारा वारा, वाऱ्याने आपल्याबरोबर फुलाचा सुगंध नेल्याने सभोवती बनलेंले सुगंधी वातावरण, पश्चिमेला शांत नि विशाल सागर. खळखळा वाहणारी नि मग सागराला मिळणारी नदी. क्षितीजाच्या पूर्व टोकाला असलेला निश्चल असा पर्वत ।

" किती मनोहर दृश्य आहे पहा. कुटि बाहेर ये. डोळे उघड. नि त्या उघडचा डोळयांनी या निसर्गाने उघडलेल्या कोशाची मजा तर पहा. त्यांची गोडी तर चाख. मनावरील खिन्नतेचे पटल हटव. मुखावरींल विषादाचे आवरण सोड. आणि प्रफुल्ल मनाने या निसर्गाचे स्वागत कर.

" बा मानवा, या निसर्गाचे स्वागत करुन तूं या निसर्गापासून कोणता बरे बोध घेशील ?"

" माझ्या देवा, प्रसन्न मनाने मी माझे कुटिर सोडतो. मनावरील विषाद नि दु:खाचे आवरण दूर हटवून मी निसर्गाचे प्रसन्न मनाने स्वागत करतो. नि या निसर्गात पूर्णपणे समरस होतो.

"माझ्या देवा, आकाशासारखा अगाध नि अनंत विचाराचा मी होईन. माझं चित्त मी निश्चल ठेवीन. चंद्रासारखा हसतमुख राहीन. दु:खाचे काटे मी माझ्या हृदयी लपवून फुलासारखें प्रफुल्लित अं:तकरण ठेवीन. फुलांचा संपूर्ण सुगंध निसर्गांकरिता असतो तद्वत मी माझी कर्मे जनता जनार्दना करिताच करीन. सागरासारखा मी मर्यादशील राहीन. अनेंक नद्या मिळून देखील सागर मर्यादा सोडीत नाही. बरेवाईट सर्व जलचर-प्राण्यांना तो आपल्या पोटांत सामावून घेतो. तदवत संसारांत अनेक दु:खे सहन करून, सर्व बरेवाईट विकारांवर नियंत्रण ठेवून मी मनाचा तोल सुटणार नाहीं. खळखळा वहाणारी नदी अखेर सागरालाच येऊन मिळते. सागराच्या बाहुपाशांत शिरून आपलं जीवन त्याला सर्मपित करते. तद्वत् मी प्रपंचांतील सर्व कामे यथासांग करून प्रभूमय होईन."

## शरण :

ज्यावेळीं मला अत्यानंद होतो. अतिशय दु:ख होते, राग द्वेष, अिर्षा, असूया अि. विकार माझ्या अंत:करणांत डोकावतात त्यावेळीं मला माझी मर्यादा सोडल्याचा भास होतो. मी माझे स्थान सोडून नरकाप्रत चाललो तर नाहीं ना ? अशी शंका मनाला चाटून जाते. एकादा राक्षस मला आपल्या गुहेंत घेऊन चालला आहे की काय.सभों-वतालची पृथ्वी आगीच्या खाईनें पेटली असून त्या खाईत माझे घरहि पेटले जात आहे व आपण गृहहीन होत आहोत असे मला भासते. पृथ्वी-वर झंझावात सुरुं झाला असून त्या झंझावातांत आपलं रोपटं उपटून पडल्याचं भयानक दृश्य मला दिसतं.सभोवतालच्या अवकाशांत काळचा-कुट्ट ढगांची दाटी झाली आहे. राक्षसासारखे काळेकुट्ट ढग सैरावैरा धांवताहेत व त्यांच्या झालेल्या गडगडाटानें व विजांच्या चमकारानें वातावरश भीषण झालं आहे. काळया ढगांतील पृथ्वीवर अंधार माजला

आहे. आणि नंतर झालेल्या मुसळधार पावसानं पृथ्वी कशी धुवून निघाली आहे. त्या पुराच्या पाण्यांत आपलं घरकुलहि वाहून गेलं आहे आणि आपण उघडयावर पावसांत ओलेचिंब झालो आहोत. थंडीने काकडत आहोत अस मला वाटते.

आपण सर्व जीवन सर्वस्व गमावलं. मनुष्य जन्मांत मिळविविलेली कमाई स्थितप्रज्ञता गमाऊन बसलो आहोत असं वाटून माझं अंत:करण दु:खाने चूर होऊन जाते. दुर्दैवाला दोष देत मी पश्चाताप करू लागतो. माझ्या डोळयातुन अश्रूधारा वाहू लागतात. देवाला मी शरण जातो व त्याचा धांवा करू लागतो.

माझ्या देवा, माझ्यावर कृपा कर आणि मला वाचव. विकाररुपी दैत्याच्या तावडीतून तू माझी सुटका कर.त्याच्या मोबदल्यांत मी माझं सारं जीवन सर्वस्व तुला समर्पित करतो.

त्या क्षणीं माझा प्रभू माझ्यासमोर उभे ठाकतात. प्रेमळ दृष्टी माझ्यावर टाकतात. त्या कृपाळू देवाच्या नुसत्या कटाक्षाने माझेवरील अरिष्ट नाहीसे होते. संकट नष्ट होते. आणि मी माझ्या परमेश्वराच्या चरणी लीन होतो.

**प्रणाम :**

ज्यावेळीं मला देवाविषयी नितांत प्रेम वाटते. त्यावेळीं माझ्या मनांतील त्याच्या विषयींच्या भावना मला व्यक्त करव्याशा वाटतात. त्याचे गुणानुवाद गावे. त्याचा महिमा वर्णन करावा. त्याच्याविषयी एखादे भक्तिगीत निर्माण करावे ही उर्मी माझ्या मनांत निर्माण होते. भावनांचे काहूर अशावेळी माझ्या डोक्यात थैमान घालतात. त्याच्या विषयींच्या माझ्या भावना मनातल्या गनांत अितस्तत: सैरावैरा धांवतात. आता लेखणी हातीं धरावी आणि माझ्या मनीं आलेले देवा विषयीचे विचार, भावना, भक्तिभाव हे सारे लिहुन काढावे व डोके हलके करून घ्यावे अशी अिच्छा माझ्या मनांत डोकावते.

मनाच्या विश्वाचे अशावेळी जेव्हा मी त्रयस्थपणे निरीक्षण करतो. तेव्हां मला असें वाटते कीं, बाह्य सृष्टीत व अंत:सृष्टीत केवढे

तरी साम्य आहे. माझ्या दृष्टीपुढे अशावेळी पावसाळ्यांतील एक दिवस दिसूं लागतो. सूर्य नारायणाला झाकून मेघराजांनी सारी दृष्टी व्यापलेली आहे आणि त्यामुळे सृष्टीवर अंधारच अंधार पसरलेला आहे. काळेकुट्ट मेघराज अितस्ततः भटकत आहेत. त्यांचा गडगडाट होत आहे. विजा चमकत आहेत. विजांच्या चमचमाटानें व मेघांच्या गडगडाटानें पृथ्वीवरील पशु पक्षी नि माणसांनी आपआपली आश्रयस्थानें संभाळली आहेत. थंडगार वारा वहात असून असें वाटते की, आतां टपोरी थेंब आकाशातून धर्तीवर पडतील व त्या मुसळधार पावसानें सारी धरती जलमय होईल.

यानंतर कागदावर शाईनें एक दोन शब्द लिहिले जातात. तोच वादळी वाऱ्यानें सर्व ढग पिटाळून लावावेत. नि आकाशाच्या तेवढ्या जागेत एकाही ढगाने तेथें थांबू नये व पाऊस न पडतांच तो प्रदेश कोरडा रहावा तद्वतच माझ्या मनांतील विचार लुप्त होऊन मी कोरडा रहातो. कागदही कोराच रहातो. त्या प्रसंगी मला फारच वाईट वाटते. आणि मग देवा विषयींचे माझे शब्दबद्ध करून त्याला भावपुष्पांजली वहाण्याऐवजी हातांतील लेखणी तशीच ठेऊन मी दोन्ही हातांच्या ओंजळीनें त्याला प्रणाम करतो. व प्रार्थना करतो. कीं "देवा, तुज विषयींचे भावभक्तिचे विचार शब्दबद्ध करून तुजवरील कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी ही करांगुली जोडून मीच तुला प्रणाम करतो.त्याचा तूं स्वीकार कर. "

आणि मग त्या परमेश्वराला माझ्या देवाला मी कृतज्ञतेनें मी प्रणाम करतो.

**आभार :**

हाती सुमनांचा हार घेऊन प्रिये, मी तुझ्या दारी आलो. तो तुझे दार बंद झालेंले माझ्या दृष्टीपथांत आले. केवढा माझा विरस झाला त्यानें !

या पूर्वी मला वाटले होते. तुझे दार उघडे असलेले मला दिसेल. त्या दारांत उभा राहून माझीच मार्ग प्रतिक्षा करीत असलेली तूं मला दिसशील. मला पहाताच हंसत माझं स्वागत करून तूं माझ्या

सामोरी येशील. बरोबर आणलेला हार मी तुझ्या गळ्यात टाकेन आणि दीर्घ आलींगन देत मी तुझा स्वीकार करीन नि तूंही माझा स्वीकार करशील. यानंतर तूं नि मी व मी नि तूं एकरूप होऊन जाऊं एकजीव होऊन जाऊं.

परंतु छे : ! माझे विचार सार्थ झाले नाहीत. तुझे बंद दिसलेल्या दारानें माझ्या मनाला धक्का बसला. मला वाटले आतांच तुझ्या दर्शनाची अिच्छाही न करतांच परत जावे. आणि यापुढें तुझ्या दाराशीं कधीच फिरकूं नये–अगदी कधीच नव्हे.

परंतु थोडया वेळांत माझा राग पार मावळला धुकं निवळल्या प्रमाणे मन निर्मळ झालं. माझ्या मानसमंदिरी तुझी मूर्ति साकार झाली आणि मग मला कळलं. बंद झालेल्या दारांत ज्याची साकार आकृत्तीची आपण वाट बघत होतो. तीच आकृत्ती निराकार होऊन आपल्या अंतःकरणांत अधिष्टित झाली आहे. ती मूर्ति आपल्या पासून किंचितही दूर झालेली नाही. ती तर आपल्या समीप अगदी अंतःकरणांतच विराजिलेली आहे.

मला मोठा आनंद झाला. प्रियतमे, देवाच्या कृपेनेंच तूं माझ्या अगदीं समीप–अंतःकरणांतच अधिष्टित झालीस देवानें माझ्यावर ही केवढी कृपा केलीं? कृतज्ञतेनें देवा विषयींचा भक्तिभाव माझ्या मनांत दाटून आला. नयनातून अश्रूबिंदू ओघळले. मनांत भाव प्रगटला व मी त्याला धन्यवाद दिला.

प्रियेसाठीं आणलेला हार–प्रियातर माझ्याच अंतःकरणांत विराजिलेली आहे. यास्तव तिला– तिलाच असं समजून माझ्या गळचांत टाकला आणि त्याने रिकामे झालेले दोन्ही कर जोडून मी भक्ति भावाने त्या परमेश्वराचे आभार मानले.

**सीमा :**

माझ्या देवा, मला खूप पहावेसे वाटते. हसावेसे वाटतें. ऐकावेसे वाटते. विचार करावासा वाटतो. सुख भोगावेसे वाटते. तद्वत दुःखहि भोगावेसे वाटते. काम करावेसे वाटते.नि त्या सोबत विश्रांतिहि

घ्यावीशी वाटते.येणेप्रमाणे माझ्या मनाच्या अंतःकरणाच्या नि बुद्धीच्या सर्व उर्मि पार पाडून तुला सर्वस्वी शरण जावेसे वाटते. तुझे चरण घट्ट आवळून तुजवरील प्रेमातिशयाने डोळयांतून अश्रूधारा काढाव्याशा वाटतात.नि प्रार्थना करावीशी वाटते कीं," देवा,माझ्या म्हणून जेवढया सीमा असतील तेवढया संपव. आणि मला तुझ्या सीमाप्रत ने. तुझ्या सोबतीने तुझ्या प्रदेशाचे मार्गातिक्रमण करून मला तुझ्या स्थानाप्रत ने. माझ्या जीवनाचा वेणु तूं आपल्या हाती घे. आणि त्या वेणूंतून तूं आपले मधूर संगीत काढ. माझ्या जीवनाचा तारुं तूं आपल्या हाती घे व तो तारु वल्हवीत तूं मला तुझ्या किनाऱ्याप्रत ने.

माझी आशा, आकांक्षा, अिच्छा, वासना, तर्क विचार कल्पना, आचार, कर्म हें सारे संपव व या साऱ्यांचा तूं अधिष्टाता हो माझे आचार, विचार, कर्म अि. तूं स्वतः प्रगट हो. मला नाममात्र होऊं दे. याच्यातच मला कृतार्थता वाटेल.

माझ्या देवा, माझ्या सीमेच्या अखेरच्या पावलावर तूं मला नेऊन सोडलेस नि समोरील तुझ्या सीमेवरील प्रदेश तूं मला दाखविलास कीं, मला धन्यता वाटेंल. तुजविषयींच्या प्रेमातिशयाने माझ्या डोळयांत आनंदाश्रू उभे राहतील त्या सीमेवर उभे राहून मी मागे उलटून आतापर्यन्त आक्रमिलेल्या माझ्या मार्गाकडे डोळे भरून पाहीन. कमल नयनांतील अश्रू बिंदूंनी मी आक्रमिलेल्या मार्गाचा कृतज्ञतेने निरोप घेंईन. व मग तुझ्या सीमेकडे तोंड करून तुझ्या नव्या प्रदेशाकडे दृष्टिक्षेप करीन आपुलकीच्या भावनेने तेथील माती मी माझ्या कपाळीं लावीन व माझ्या नव्या प्रवासांत तूंच माझ्या सोबतीला आहेस. तुझी कृपाच माझ्या पाठीशी आहे. असं समजून मी तुझ्या दुर्गम नि नव्या प्रदेशाचें मार्गातिक्रमण करीन.

**एकरुपता :**

माझ्या डोळया आड तूं होतास त्या वेळीं, देवा तुझ्या दर्शनाची आस मला लागली. तूं कधीं बरे मला दर्शन देशील ? या जाणिवेनें मी कासावीस झालो.

तूं माझ्या दृष्टीच्या टप्यांत आलास त्यावेळीं मी तुला न्याहाळले. डोळे भरून तुला पाहिले. तुझं रुप माझ्या मनीं साठविले. साष्टांगभावे तुला मी वंदन केले. परंतु थोडयाच वेळांत तुझ्यांतील नि माझ्यांतील अंतर मला जाणवले. ते अंतर कमी करण्यासाठीं तूं माझ्या समीप येण्याची-तुझी माझ्यावर कृपा होण्याची मी बरीच वाट पाहिली. परंतु ज्या क्षणी मला दिसले कीं तुझे नि माझे अंतर एक तसुभरहि कमी झाले नाहीं थोडीसुद्धां तुझी कृपा माझ्यावर झाली नाहीं. तेव्हां मला फार वाईट वाटले. ते अंतर आपण आपले स्थान सोडून करावे त्या विचाराने मी माझे स्थान सोडले. व तुझ्याप्रत येंण्यासाठीं निघालो.

परंतु छे : ! माझे स्थान सोडून मी तुझ्याप्रत येण्यास निघालो व स्वतःची तुझ्याजवळ येण्याची गति मी वाढविली. तरी त्यानें माझ्यातील नि तुझ्यातील अंतर कमी होईना उलट ते अंतर वाढले. आपण आपल्या देवा पासून दूर चाललो कीं काय ह्या शंकेने मी व्यथित होई. शेंवटी माझ्या वाटचालीच्या शीघ्रगतीने मी व्यथित होई.

कांहीं दिवसांच्या माझ्या वाटचालीनंतर मी थकलो. माझं शरीर, हातपाय, नाक, कान, मन नि बुद्धी हीं सारी थकलीं, आणि मी प्रभो तुला शरण आलो व तुझी प्रार्थना केली. प्रभो, मी कितिही प्रयत्न केला तरी केवळ माझ्या प्रयत्नांनीं मी आपणा दोघांतील अंतर कमी करण्यास मी असमर्थ आहे. तुझ्या कृपेवाचून, तुझ्या आशीर्वादा वाचून आपल्यातील अंतर कमो होणार नाही यास्तव देवा, माझ्यावर कृपा कर तुझ्यातील नि माझ्यातील अंतर कमी कर. माझ्या समीप ये आणि मला दर्शन दे.''

मनोभावे केलेल्या या प्रार्थनेनंतर देवा,मला वाटले तूं माझ्या समीप येत आहेस. आणि खरोखरच तूं माझ्या समीप आलास. तुझ्या दर्शनाने मला आनंद झाला. माझे डोळे निघाले. अनेक दिवसांची तुझ्या दर्शनाची मनीषा पूर्ण झाली. त्या समाधानांत मी तुझें चरण धरिलें. घट्ट आवळून धरिले. भक्तिच्या उमाळयानं गंगा यमुना वाहूं लागल्या.

त्या अश्रूधारा मी तुझ्या चरणी ओतल्या. एका एकी माझ्या मनी शोक दाटला. त्या शोकावेगानें मी स्फूंदून स्फूंदून रडू लागलो. हे पाहून तूं एकदम चकित झालास आणि मला म्हणालास अरेवेडचा; मी तुझ्या दृष्टिआड होतो त्यावेळीं तूं माझ्या दर्शनासाठीं कासाविस झाला होतास. दर्शन दिले त्यावेळी समीप येण्याची तूं मला विनंति केलीस आणि आता समीप आलो असतां मला प्रेमानें आलिंगन देण्याअैवजी वेडचासारखा स्फुंदुन स्फुंदुन रडतो आहेस. काय म्हणावे आता तुला ? "

यावर देवा, मी माझी भावना मी तुजजवळ व्यक्त केली मी तुला म्हलालो, " प्रभो, तुझ्या दर्शनानें माझ्या डोळचांत अश्रू उभे राहिले. ते मी तुझ्या चरणी ओतले. परंतु तूं नि मी अद्याप एकरूप न झाल्यानें आपणा दोघांत अजूनहि अंतर आहे त्या जाणिवेने माझ्या जीवाला स्वस्थता मिळाली नाहीं. तूं नि मी यापुढे एकरुप, एकजीव होणार नाहीं कीं काय या शंकेने मी व्यथित झालो आहे. ते शल्य माझ्या मनाला काटचासारखे सलले व त्यांनं माझं मन दुखविलं गेले. मला रडूं कोसळलं माझ्या देवा, मला तुझ्यात समाऊन घें. मी तुझ्यात विलीन कर. मला तुझ्यात एकजीव कर. तूं नि मी अद्यापहि दोन आहोत हें द्वैत नष्ट करून तुझ्याशी पूर्णपणे विलीन होण्याची माझी मनीषा तूं पूर्ण कर."

या वर तूं 'तथास्तू' म्हणालास आणि मी तुझ्यात विलीन झालो.

## सारथि :

त्या दिवशीं मी आक्रमिलेला मार्ग मोठा बिकट होता. दुर्गम होता. खडचाखुडचाचा नि कांटचाकुटचाचा होता. घोडेहि तरुण आणि माजलेले होते. आणि त्यांना जुंपलेल्या रथावर मी आरुढ झालो होतो.

घोडचांचे लगाम हातून एकाएकी सुटलें नि घोडे चौखूर धावावयास लागले. खाड खाड असा रथाचा आवाज होत होता.

रथ दगडा धोंड्यातून, काट्याकुट्यातून, चढउतारावरून नि खड्या खड्यातून मार्ग आक्रमित होता. मध्येच आलेल्या दगडांनी नि खड्यांनी रथाचा मोठा आवाज होई तो ऐकून असे वाटे कीं या रथाचा या रस्त्यांनी चक्काचूर तर होणार नाही ना? रथाची चाकं तर मोडली जाणार नाहींत ना ? चौखूर धांवणारे हे घोडे या रथाचा काय ठिकाणा लावतील ? याचा पत्ता नव्हता. रस्त्यांतल्या एखाद्या वाकणांत असलेल्या दगडाशीं या घोड्यांची टक्कर होऊन हे घोडे नि जायबंदी तर होणार नाही ना ? नि रथाचाहि चुराडा तर होणार नाही ना ? घोड्याला मर्यादा घालायला लगाम माझ्याजवळ होंतेच कुठे ? आणि म्हणून तर ते एवढे बेफाम वेगाने धावत होते. व त्यांनी त्यांना स्वत:ला मला नि या रथाला संकटांत घातले होते. समोरील रस्त्याच्या शेवटीही दिसत नव्हता. घोडे बेफाम धावत होने. समोरील चाकें भरा भरा फिरत होती. समोरचा प्रदेश मागे टाकला जात होता नि आम्ही नविन येणाऱ्या संकटाच्या समीप येत होतो. समोरील रस्ताहि स्पष्ट न दिसल्यानें हे घोडे चुकीनें एखाद्या दरीत जाऊन तर पडणार नाही ना ? या शंकेने तर माझ्या अंगावर कांटा उभा राहिला.

घोडे चौखूर धावत सुटल्याने त्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहूं लागल्या होत्या माझ्या अंगावरहि घामाच्या धारा सुरू झाल्या होत्या. समोर भीषण भवितव्य दिसत होते. आता शेवट वाईटच होणार असं वाटत होतं या विचाराने तर माझ्या अंगाचा थरकाप झाला. भीषण काळ डोळ्यासमोर सरकला आणि मी सर्वभावे त्या परमेश्वराला शरण गेलो. तिथल्या तिथे हात जोंडले व प्रार्थना केली.

“ देवा दुर्गम अशा माझ्या मार्गावरील बेफाम घोड्याचा लगाम माझ्या हातून एकाएकी सुटला आहे. त्याचा फायदा घेऊन हे बेफाम माजलेले घोडे स्वातंत्र्य मिळाले असे समजून चौखूर धावताहेत. आणि मला त्यांनी संकटांत लोटले आहे. त्यांच्या ह्या कृतीनें ते स्वत: (घोडे) हा रथ नि रथारूढ मी असे आम्ही सर्वजण धोक्यांत आलो आहोत. आमच्या पुढे भीषण संकट उभे आहे. घोड्याच्या ह्या उन्मत्त

वृत्तींने पुढचा क्षण आम्हा करिता कसा येईल हे सांगवत नाही. त्यानें मी पूर्णपणे हताश झालो आहे.

" माझ्या प्रभो, माझ्यावर दया कर. माझ्याकडे कृपादृष्टि करून संकटाचे क्षणी मला धीर दे. माझ्या हातून सुटलेले लगाम माझे हातीं दे. या लगामाच्या साहचानें घोड्यांना वठणीवर आणण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी दे. या दुर्गम मार्गावर घोडे शिताफीने हांकण्याचे कौशल्य माझ्यांत आणून मांझा हा प्रवासाचा मार्ग सुकर होण्यास मला आशीर्वाद दे. "

## अंतर्ज्योति ;

महत्प्रयासाने पेटविलेली पणती घेऊन मी देवाच्या मन्दिरी निघालो तो वाटेत सोसाटचाच्या वाऱ्यानें तिची ज्योत विझली. तींतून धूर निघाला.ते पाहून मला फार वाईट वाटले,मी दुःखी नि कष्टी झालो मला वाटले, हे झालें तरी कसे ? दैवदुर्विलासच,दुसरे काय? मी त्यानें हताश झालो स्वतःला दूषणे दिली. आपल्या दैवाला दोष दिला. व स्वतःला शिव्या दिल्या आता ही पणतीं घेऊन मंदिरी जावे कसे? ह्या विचाराने मी तेथेच थबकलो. परंतु अर्ध्या वाटेवरून घरीं परत जावेसे वाटेना. ही उपासना अर्ध्यावर सोडावीं कशी ?

शेवटी मी निश्चय केला. कांहींही होवो. आता परत फिरणे नको. मार्गच आक्रमावयाचा व उपासना पार पाडावयाची आणि मग मी तशीच विझलेली पणती हातीं धरुनच स्वमार्ग सुधारला.

मन्दिराच्या पायथ्याशी येतांच मला दिसले कीं, पणतीच्या वातीने ज्योत धरिलीं आहे. मला वाटले, आपल्या अंतर्ज्योतिमुळेच तर या पणतीच्या वातीनें पेट घेतला नसेल ना ? या गोष्टीनें मला आनंद झाला, आपली उपासना फलद्रूप होईल. आपल्याला देव प्रसन्न होईल. आपल्याला दर्शन देईल नि आपला उद्धार करील या विचाराने आनं-दांतच मी भरां भरां मंदिराच्या पायऱ्या चढलो. आणि मंदिरांत पाय ठेऊन देवाच्या मूर्तिसमोर उभा ठाकलो.

देवाच्या मूर्तिचीं ती धीर गंभीर मूद्रा मला विलोभनीय वाटली. त्या मुद्रेने मी देवाकडे आकर्षिला गेलो. मनी भक्तिचा उमाळा

आला. आणि माझ्या हातांतील ती ज्योतीनं उजळलेली पणती मी देवाच्या चरणी वाहिली. पणतीच्या मंद नि सौम्य प्रकाशांतहि देवाचे चरण मला स्पष्ट दिसले ते मी माझ्या मस्तकीं लाविले. आणि त्याला सर्वस्वी शरण गेलो.

मला वाटले, देवाच्या चरणीं वाहिलेली नि सौम्य नि मंद प्रकाश देणारी ज्योत आपल्या अंतर्ज्योतींत मिसळून एकरूप झाली आहे. व ह्या दोन्ही एकरुप झालेल्या ज्योति देवाच्या महान ज्योतीशीं एक जीव झाल्या आहेत.

**नमस्कार :**

स्त्रीये, हे पवित्रतेच्या मूर्ते. तुला प्रणाम ।

तुझ्या सानिध्यांत मी माझे जीवन व्यतित केले आणि यापुढेही व्यतीत करीन. ह्या सानिध्यांत मला तुझ्या पवित्रपणाचाच साक्षात्कार झाला आहे.

आईच्या रुपांने तूं मला जन्म दिलास. मला दुग्धपान केलेस. तुझ्या दुधावर मी पोसला गेलो. तुझ्या रक्ताचा गुण माझ्या रक्तांत भिणला. लहानपणींच तुझ्या आचार विचारांचे दृढ ठसे माझ्या अंतः-करणांत उपटले गेले.

लहानाचा मी थोडा मोठा झाल्यावर बहिणीच्या रुपाने हे स्त्रिये, तूं माझं त्यावेळीं संगोपन केलसं. कडेवर घेऊन मला मिरव-लस. घराबाहेरचं विश्व मला दाखविलंस ते काऊ नि चिऊ नदी नि नाले, बाजार हे सारे मला दाखवलंस. माझं बोट आपल्या हाती धरुन मला चालायचं शिकविलंस, घरांतील नि घराबाहेरील विश्व दाखवून तूं मला बोलायचं शिकविलंस. बुजऱ्या पांखराप्रमाणें मी त्यावेळीं हे विश्व पाहिलं.

तरुणपणीं पत्नीच्या रुपानं हे स्त्रियें, तूं माझ्या सहवासाला आलीस. आश्रयाला आलीस. तरुणपणच्या साऱ्या भावना पत्नीकडून शमविल्या गेल्या. संसार सुखाचा नि आनंदाचा झाला. गृहस्थ धर्माची तिची सोबस सुखाची झाली वेल मांडवावर जावा तद्वत ती माझ्या

घरी आली. आणि फुलाफळांनी वेल सुशोभित दिसावी तद्वत तिच्यामुळें माझं घर मुलाबाळांनी समृद्ध झालं.

आणि शेवटी हे स्त्रिये, माझ्या मुलीच्या रूपानं ज्यावेळीं तूं माझ्या घरी जन्माला आलीस त्यावेळीं मी तुझं आनंदानं स्वागत केलं. माझ्या जीवनांतल्या कारकीर्दीतील स्त्री विषयक हा अंतिम अविष्कार होय. कन्येसाठीं करावीं लागणारी प्राप्त कर्तव्यें मी सुखाने नि आनंदाने करीत आहे व यापुढेही करीन. त्यावर थोडासुद्धां कमीपणा येऊ देणार नाही.

अशा रीतीने जननी भगिनी, भार्या नि कन्या या चार रुपानं हे स्त्रिये तूं माझ्या घराचे भूषण बनलीस या चार रुपानं. तूं मला दर्शन दिलंस. आणि या दर्शनानं तूं मला पवित्रेची देवता भासलीस.

पवित्रतेच्या देवी, तुला नमस्कार, एकदां, दोनदा, तीनदा नव्हे चारदा नमस्कार !

## अनुभुति :

माझ्या देवा, अखिल ब्रम्हांडांत मी तुझा शोध घेतला. तुझी प्राप्ति हेच माझ्या जीवनांतील अंतीम लक्ष्य मी मानले. या लक्ष्यांस्तव संबंध विश्व पालथे घालून देखील तूं मला लाभला नाहीस. जीवनांतींल एकेक प्रसंग नि काल मी तुझ्या प्राप्तिस्तव वेचले. परंतु तुझ्या वांचूंन जाणारे माझे आयुष्य मला व्यर्थ वाटूं लागले. नीरस वाटूं लागले. भकास वाटूं लागले. जीवनांतील सर्व गोष्टी मला अडसर वाटू लागल्या याच कारणास्तव मी निराश झालो. आयुष्याला कंटाळलो. आणि तुझ्या प्राप्तिवाचूंन जाणारे माझे आयुष्य आत्महत्या करून संपवावं असं मी ठरविलं.

एक दिवस आत्महत्या करणेस्तव मी आरण्याचा मार्ग धरला. अरण्यात खोलशी दरी पाहून त्या दरींत स्वत:ला लोटून द्यावं आणि जीवनाचा शेवट करावा असे मी ठरविले. आणि त्याप्रमाणे एक दिवस मी मार्गातिक्रमण केले.

तोच अर्ध्या वाटेतच कुणीतरी मला प्रश्न केला."बा मानवा, कुठें निघालास तूं ? " सहानूभूतीच्या त्या शब्दानें मी चमकलो. कुणी मला हा प्रश्न केला असं वाटून मी सभोवताली पाहिले परंतु छे : प्रश्न कर्ता मला दिसला नाहीं. मला वाटले, सहानुभूतीचे हे शब्द आलेत कुठून ? आणि मग माझे सर्वांग शहारलं. वाळवंटांत हिरवळ दिसावी तद्वत माझ्या मनाला भासले. वठलेंल्या वृक्षाला पालवी फुटावी, कोमजू लागलेल्या फुलावर पाण्याचे छिटकावे पाहून ते पुन: टवटवीत दिसावेत तसे माझ्या हृदयाचे झाले. पण अनुभूतिपर शब्द बोलणारा मला न दिसल्याने मी दु:खी झालो. माझ्या त्या विषण्ण मनांत एक शंका उद्–भवली. माझ्या परमेश्वराचेच ते शब्द तर नसतील ना ? कारण तोच आपला ईश्वरच आपल्या निकट आहे. त्याची भावनाच आपण आपल्या उराशी सदैव बाळगल्याआहेत, आपण आतां करीत असलेले हे कृत्य त्यास पसंत नसल्यानेंच त्याने आपल्याला प्रश्न केला असेल, "बा मानवा, कुठे निघालास तूं"?

वरील प्रश्न आपण जवळून ऐकला अगदी-जवळून आणि म्हणूनच हा प्रश्न त्याचाच असेल, आपल्या परमेश्वराचाच देवाचाच अशा विचाराने माझे मन पुलकित झाले. मला अननुभूत आनंद झाला परंतु देव अद्यापहि आपल्या समोर येत नाही. आपली चौकशी करून आपल्याला पोटाशी घेत नाहीं. या विचाराने मी पुन: दु:खी झालो. मनाच्या दु:खी अवस्थेत आत्महत्येसाठीं चालण्याची गनि मी पुन: वाढविली. तो आवाज जर त्या परमेश्वराचा होता तर मग तो आप–णास अद्याप दर्शन कां देत नाही? त्याचे चरण मला कां दिसत नाहींत? आणि जर ते दिसणार नसतील तर मी जगूं तरी कशासाठीं? त्या पेक्षा प्राणत्याग श्रेयस्कर होय. हा विचार माझ्या मनी प्रबल झाला.. आणि त्या सरशी मी पूनः माझ्या पायाची गति वाढविली.

बरेच अंतर आक्रमिल्यावर मला वाटले, कुणीतरी माझ्या पायाची गति कमी करीत आहे. माझ्या मार्गावरच मला कुणीतरी आडवीत आहे. दुर्दैवाचा खेळच वाटला. मला त्या दुर्दैवाच आपल्या

मार्गावर आडवा झाला आहे, परमेश्वर दर्शनावाचून माझे जीवन घाल-विण्याचा त्याचा हा डाव तर नसेल ना? माझ्या मनाने ही शंका प्रगट केली. आणि मग मला ह्या दुर्दैवाचा सर्वस्वी संताप आला.

परमेश्वर प्राप्ति हे माझ्या जीवनाचे अंतीम ध्येय ठरविले असल्याने त्या वाचून जगणे मला अशक्य आहे. त्यासाठीं पराकष्टेचा प्रयत्न करुनहि तो न मिळाल्यानें मी माझे जीवन संपूर्ण अयशस्वीं ठर-वले, शेवटी निराशेनें मी हा अंतीम मार्ग पत्करला. तो दुर्दैवच माझ्या मार्गापासून च्यूत करतोय. पण मी कसा च्यून होऊं.

मार्गावरच मी प्रथम निवांतपणे विश्रांति घेतली दुर्दैवाशी दोन हात करण्यासाठीं मनाची तयारी केली. हाव जोडून देवास विनंति केली. "माझ्या प्रभो, तूं मला सहाय्य कर. दुर्दैव माझ्या पाठीशी लागले आहे. तुझ्या नि माझ्या मार्गात ते ठाण मांडून बसले आहे. माझ्या प्रभो, तुझ्यावाचून मला पळभरहि रहावले जात नाहीं. व प्रयत्न करूनहि तुझी नि माझी या जन्मीं भेट होणार नाहीं. या जाणिवेने मी निराश होऊन आयुष्याला कंटाळून आत्महत्या करणेस्तव निघाली आहे. तुझ्या दृष्टीने हा कदाचित माझा बेडेपणा असेल परंतु तुझ्या वाचून मला अशक्य असल्याने यी आतमहत्या करीत आहे.

" प्रभो, मी आंधळा आहे मला दृष्टि दे. मी मुका आहे. मला वाणी दे. मी बहिरा आहे. मला श्रवण करण्याची शक्ति दे. मी अनभिज्ञ आहे. अज्ञानी आहे. मला तुजजवळ येंण्याचे योग्य असे ज्ञान नाहीं. मी तुला पाऊन घेण्याचीं कोणतीहि पूजाविधि मला अवगत नाहीं. मी माझ्या परीने तुझी प्रार्थना करतो. तूं प्राप्त होष्यांची अिच्छा बाळगतो. व अधीरपणाने तूं ताबडतोब मला पावत नाहीस म्हणून निराशमनाने आत्महत्येचे विचार करतो व ते तडका फडकीं अमलांत आणण्याचे असे आततायी कृत्य करतो.

"माझ्या देवा, यामुळें तूं मला हसत असशील नि कदाचित यामुळें तूं मला दुरावतहि असशील. परंतु देवा तुला भेटण्याची उर्मि मला स्वस्थ बसूं देत नाही. तुज वाचून जगऱ्याची एक पळहीं अिच्छा मला नाही. यामुळेच मला ह्या आत्महत्येच्या विचाराशिवाय दुसरा विचार सुचत नाहीं.

"माझ्या प्रभो, मला कांहीच सुचत नाहीं. कोणताच मार्ग दिसत नाहीं. आतां मी काय करुं ? कोणता विचार करुं? आणि वागूं तरी कसे? हे माझे कृत्य आपणास वावगे वाटत असेल तर तूं सांगशील तसा मी वागेन. माझे आचार नि विचार ठेवीन. व तुला प्राप्त करुन येईन."

मनोभावे मी वरीलप्रमाणे प्रार्थना करतांच पूर्वीसारखाच ध्वनि माझ्या कानी आला. " बा मानवा, निराशेनें आत्महत्याकरुन व्यर्थ जीवे मरू नकोस यानें या अशा कृत्यानें तूं कधींच माझ्याजवळ येणार नाहीस. जे प्राप्त परिस्थितीशी झगडून माझ्याप्रत येतात. त्यांना माझ्याजवळ स्थान आहे. प्राप्त परिस्थित येणाऱ्या संकटांशी झगड आणि माझे नांव घे हरिस्मरण कर. हळू हळू या माझ्या भक्तिनेंच तुला योग्य वेळीं योग्य मार्ग दिसेल आणि मग माझ्या आशीर्वादानें तूं मला प्राप्त होशील, पलायनवादाचा आश्रय करून दुर्दैवाचा बागुलबुवा तूं उभा करू नकोस. व माझ्या आर्गावरून च्युत होऊं नकोस. परत फिर नि आत्महत्येचा विचार मनांतून काढून टाक."

ह्या ध्वनीनें मला बोध झाला. मला जणूं गुरु मिळाला दुर्दैव ते दुर्दैव म्हणून मी जें म्हणत होतो.ते पार पळाले याणि मी उठलो. अखंड जागृतीत उठलो. आल्या मार्गानें परत गेलो. आत्महत्येच्या मार्गा-कडे पाठ फिरवून उन्नतीच्या देव मार्गाकडे परत गेलो.

## प्रकाश :

प्रकाश! अहो प्रकाश ! ! जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश! ! !

सर्व विश्वाच्या ठिकाणी हा प्रकाश पसरला आणि विरा-जमान झाला. आणि माझ्या अंतरात्म्याच्या ठायी तो ढवळून निघाला. ह्या प्रकाशाच्या मध्यभागी माझा परमेश्वर विराजमान झालेला मला दिसला. त्या परमेश्वराला मीं वंदन केले. सर्वभावे त्याला शरण जाऊन मी त्याचे चरण घट्ट आवळून धरिले. कृपेस्तव त्या परमेश्वराकडे तोंड वर करुन पाहिले तो तो प्रकाश एकदम लुप्त झाला. आणि चोहिकडे अंधारच अंधार पडला.

मी आजूबाजूला नि सभोवती पाहिले तो त्या काळचाकुट्ट आवरणाखाली पृथ्वीवरील एकहि वस्तु मला दिसेना. समोरचा परमेश्वरहि गुप्त झालेला आणि माझे स्वतःचे अस्तित्वहि यामुळे नष्ट झाल्यांसारखे मला भासले. या गोष्टीचा मला विषाद वाटला. हे झाले तरी कसे ? दुर्दैवच माझ्या पाठिशी लागले आहे कीं काय ? माझ्या दैवातच तो प्रकाश नि परमेश्वरर नाही कीं काय या शंकेने मी व्यथित झांलो. मला रडूं कोसळले. माझ्या डोळचांतून गंगा यमुना वाहूं लागल्या.

तोंस माझ्या मनांत ध्वनि उमटला. " बा मानवा, विषाद पावूं नकोस. तुझ्या दैवांत प्रकाच निश्चित आहे. म्हणूंनच तर त्यानें तुला दर्शन दिले. तो तुला कायमचा लाभावा यास्तव तो लुप्त झाला. आतां या लुप्त झालेच्या प्रकाशाचा शोध घे. अिच्छा तिथे मार्ग निश्चित आहे. यास्तव तूं स्वस्थ बसूं नकोस. प्रकाशाचा मार्गस्थ हो, या प्रकाशाच्या शोधास्तव सर्व प्रकारचो शारिरिक मानसिक नि बौद्धिक क्रिया तुला कराव्या लागतील. जागेपणीं, निद्रीस्तावस्थेत व स्वनप्नांतहि तुला तो प्रकाश शोधण्याचा ध्यास मनी बाळगावा लागेल. अनेक दिव्यातून पार पडल्यावर तो प्रकाश तुला सांपडेल. त्या प्रकाशांत तूं विराजमान होशींल–नव्हे प्रकाशमय होशील. बा मानवा डोळचातील अश्रूधारा पुस. उत्साहाने. ताजा तवाना हो प्रकाशाच्या दिशेने मार्गस्थ हो."

## निर्धार :

माझ्या देवा, माझ्या अंगणान तूं आलास त्यावेळीं मला कोण आनंद झाला ? त्या आनंदानच मी तुझं स्वागत केलं. आता तुझी प्राप्ती माझ्या दैवांत निश्चित आहे असं मी समजलो परंतु छे :! थोडचाच वेळांत तूं अंतर्धान पावलास. आणि माझ्या अंगणात तूं आला होतास याचे चिन्ह म्हणून तुझ्या पादुकाच तेवढचा माझ्याअंगणांत राहिल्या.

माझ्या देवा, त्या पादुका मी माझ्या हृदयाशी धरल्या, अगदी घट्ट आंवळून धरिल्या. तुझ्या अंतर्धाना नंतर कांहीं वेळानें ह्या

पादुकाहि अंतर्धान पावतील व तुझी कोणतीच आठवण माझ्या अंगणांत रहाणार नाही व या जन्मीहि तुझ्या पादुकावाचून मरण येईल. या भावनेंनं मी विव्हळ झालो. आणि या पादुकांवरच समाधान मानून देवा, मी तुझी चरण सेवा आरंभिली आहे. माझ्या घरांतल्या देवा घरांत त्याची प्रतिष्ठापना केली असून निशीदिनीं मी तुझी पूजा आरंभिली आहें. महदभाग्याने मला या तुझ्या पादुका लाभल्या. सात जन्मीच्या पुण्याईनें तुझे करणरज माझ्या कुटिराला लागले, ते रज मी माझ्या भाळीं लाविले आणि निर्धार केला, कीं तुझी चरणसेवा करीत करीत मी तुझ्याप्रत येणार माझ्या प्रभो, या निर्धाराप्रमाणे तुझी चरण सेवा मी अखंडपणे चालू ठेविली आहे,त्यासेंवेत मी कधीहि खंड पडू देणार नाहीं. माझ्या प्रभो, माझ्या या निर्धारा प्रमाणे माझ्या हातूंन तुझी सेवा निरंतर घडूं दे. तुझ्या प्रत येण्याची माझी मनीषा पूर्ण सिद्धीस ने.

## अतीत :

माझ्या देवा, तुझ्या भक्तिची ज्योत मी माझ्या मनीं पेटविली असून ती सदैव साठीं सतेज नि ताठ ठेविली आहे. ती कधीं मालविली जाणार नाहीं अगर अनुकंपीत होणार नाहीं. ती ज्योत तुझ्या महान ज्योतित विलीन करण्यासाठीं माझ्या जीवाची धडपड चालू आहे. माझ्या देवा ही धडपड फलद्रूप होऊ दे आणि शेवटी तुझ्या महान ज्योतित तिला विलीन कर.

एक काळ असा होता कीं, ती ज्योत पेट घेई. पुनः मालवे. फिरून ती पेट घेई. वाऱ्याच्या हलक्याशा झुळकीनच ती कंपायमान होई. तिचा प्रकाश कमी जास्त होई. नि अशा परिस्थितींत तिला वाटे 'कधीं माझ्या या प्रकाशात मला तुझे माझ्या प्रभूचे चरण दिसतील. तुझ्या चरण युगुलांचे दर्शन घडेल आणि या चरण युगुलांवर स्वतःला अर्पण करण्याचं भाग्य लाभेल. प्रभूच्या महान ज्योतींत आपली हलकीशी ज्योत विलीन होईल नि त्यानं आपण कृतकृत्य होऊं?' परंतु हे विचार साकार न झाल्याने ती ज्योत कष्टी होई नि त्या कष्टीपणांतच तिच्या आयुष्यांतले एकेक दिवस निघून जात.

आणि आज प्रभो, ती ज्योत कशी ताठ उभी आहे. कशी निष्कंप आहे. महान झंझावाताचा परिणाम तिच्यावर होत नाहीं.आणि तिचा सौम्य प्रकाश कसा स्वच्छ पडला आहे.

देवाच्या चरण युगलांच्या दर्शनाचीं आशा सदैव आपल्या मनीं बाळगून तिनं आपला मानसिक पल्ला अितका गाठला आहे कीं आतां या चरण युगुलाच दर्शन आतां फारकाळ दूर नाहीं.तुझ्यात मील-नाची-तुझ्या महान ज्योतीत स्वतः विलीन होण्याचा कालही आतां समीप आलेला आहे.

माझ्या देवा,आतां अधिक विलंब न लावतां त्या ज्योतीच्या जौम्य प्रकाशांत तुझे चरण प्रगट होंऊं देत. त्या चरण युगुलांवर मला माझे जीवन पुष्प मला वाहू दे–तुझ्या महान ज्योतीत ही माझी भक्ति ज्योत– जीवन ज्योत विलीन कर.

**मागणी :**

अरेरे, केवढा बरे मूर्ख मी ?

परमेश्वर माझ्या पाठीशीं उभा राहून सदैव मला म्हणतो, " बा मानवा, तुझ्या कर्मात मी मदतीला येऊं कां ? या प्रत्येक कर्मात मी तुला मदत करीन. माझ्यां मदतीनें तुझी ती कर्मे दिव्व होऊन जातील. तुझं आयुष्य सुखकारक होईल. कल्याणकारक होईल. या कर्माचा मी अधिष्ठाता होईन, तूं नाममात्र रहा. कर्माच्या फलांविषयींची आसक्ति सोड. निष्कामपणावे सर्व कर्मे कर आणि कर्मांविषयींची ही गुरुकिल्ली नीट ध्यानीं ठेवून तूं प्रपंचात वाग आणि यानेच तूं माझ्याप्रत येशील."

परंतु छेः त्याचे बोल तेवढे ऐकू येंतात परंतु प्रपंचात प्रत्यक्ष कर्म करताना या उलट माझीं कृती घडते. माझ्या कर्माचा मीच अधि–ष्ठाता आहे. असं मी समजतो. माझे कर्म स्वार्थी असते. जे काम प्रेरित असते. प्रत्येक कर्मापासून मी फलाची अपेक्षा बाळगतो. फळ मनासारखे झाले कीं मी आनंदतो. तेच फळ मनाविरूद्ध झाले कीं मी दुःखी निकष्टी होतो. त्यानें माझ्या जिवाला स्वस्थता मिळत नाहीं. एका कर्मा-

पासून दुसरे उदभवते. दुसऱ्यातून तिसरं कर्म घडते व तिसऱ्यातूने चौथे कर्म जन्माला येतं. येणेप्रमाणें कर्मामागून कर्में घडत गेल्यानें माझ्या कर्माचा हेतु विशुद्ध नि कामप्रेरित झाला आहे. प्रत्येक कर्मापासून मला दुःख होते आणि अशा या कर्मांच्या चक्रव्युहांत मी पूर्णपणें वेढला गेलो आहे, अडकला गेलो आहे.

माझ्या देवा, तुझे न ऐकता मूर्खपणानें मी कर्माच्या या जंजाळांत गुंतून गेलो आहे. एकदाचा तेथून मला कायमचा सोडीव. या विशुद्ध नि कामप्रेरित कर्मांनी मी माझ्या जीवनांत पूर्णपणें अपेशी झालो आहे. माझ्या मदतीला येंऊन ह्या माझ्या हातून होणाऱ्या कर्मांचा तूं अधिष्ठाता हो. ही सारीं माझी कर्मे मी तुला समर्पित करतो. या कर्माचा बरे वाईटाचा तूंच धनी हो. माझ्या हातून होणाऱ्या कर्माचा मो नाममात्र अधिकारी असून कर्ता करविता तूंच आहेस. असं समजून निष्काम नि फलरहित कर्मे करण्याची प्रेरणा तूं मला दे.

माझ्या प्रभो, तुज जवळ माझी एवढीच मागणी आहे.

## कोडे :

14938

माझ्या देवा, जेव्हां मी निद्रिस्त होतो तेव्हा पहाटे तूं माझ्या अंगणांत आलास व मला हांक मारलीस, भक्ता मी आलो आहे. "

परंतु मी त्यावेळीं निद्राधीन होतो. जड निद्रा माझ्यावर राज्य करीत होती. यामुळे तुझे ते शब्द मला नीटसे ऐकूं आले नाहींत. आणि नंतर सूर्योदयाचे बेळीं जेव्हां मला जाग आली मी माझें दार उघडले आणि घराबाहेर दृष्टि टाकली तो दारा समोरील माझ्या घरासमोरील अंगणांत देवा, तुझ्या चरणयुगुलांचे मला दर्शन झाले. मला वाटले देवाच्या या पादूका आपल्या अंगणांत निश्चित त्यानें आपल्या घरांत प्रवेश केलेला आहे ! एरव्हीं त्यांच्या पादुका येथे कशा दिसाव्यात ?

माझ्या मनाच्या विश्वात आनंदाचा सूर्योदय झाला, नि त्यानं माझ्या मनाचं अंतर्बाह्य विश्व उजळून गेलं. मला वाटले बहूता

दिवसांचे सुकृत फळा आलं नि माझ्या देवरायाचे चरण माझ्या घराला लागले. मी धावत जाऊन सारं घर धुंडाळलं ओसरीत, माज घरांत देव घरांत, न्हाणी घरांत, स्वयंपाक गृहांत नि शय्या गृहांत सर्व ठिकाणीं मी त्याचा शोध घेतला. घरांतला कोपरा नि कोपरा धुंडाळला. परंतु छें :! माझ्या घरांत कुठेंच तूं मला दिसला नाहीस. कष्टी नि विषण्ण मनांत मी माझे दारीं आलो. डबडबलेल्या अश्रूंनी माझ्या अंगणांतील तुझ्या त्या पदयुगुलांना-पादुकांना प्रणिपात करण्यासाठीं मी स्पर्श केला–तो काय ? त्या पादुकाच नव्हत्या. अंगणांतील रजावर देवा, तुझ्या पाऊ-लाचा ठसा होता. तो हाताच्या स्पर्शाने तो ठसा पुसला गेला. मातीला माती मिळाली आणि मातीवर उमटलेलीतीं तुझी पाऊलें नाहीशी झाली. त्यानें मी दु:खी झालो.

मला वाटले हे झाले तरी कसे ? जो जो आपण देवाच्या समीप येऊं पहातो तों तों तूं माझ्या पासून दूर कसा जातोस?

त्या दिवशीं झोपतेवेळीं रात्रभर देवा, मी तुझ्या ध्यानांत होतो. तुझ्या चिंतनात होतो. त्यामुळें मला झोपहि लवकर लागली नाहीं. सारी रात्र तळमळत काढली मी. तुझ्या दर्शनासाठीं माझ्या मनीं उत्कंठा होती. तुझे दर्शन होत नाहीं म्हणून माझ्या जिवाची तळमळ चालूं होती. रात्रभर या कुशीवरून त्या कुशीवर मी सारखा वळत होतों. नि परो-परी तुझी विनवणी करीत होतो. “ देवारे भेट दे मला. ”

पहाटे पहाटेला माझ्या डोळ्यांना डोळा लागला. नि मी झोपीं गेलो तोच कुणीतरी–नव्हे तूंच मला माझ्या दारी येऊन हाका मारल्या. मी ध्यानांत असतांना ज्याला आळवीत होतो तोच देव माझ्या विनवणीला साद देऊन मला हाक मारीत होता. असं मला भासलं. नव्हे–प्रत्यक्ष या माझ्या कानांनी मी तुझी ओझरती हांक ऐकली. परंतु त्या तुझ्या हांकेला–त्या सादेला “ओ” देण्याचं मला सुचलं नाहीं. आणि सकाळीं निद्रा संपल्यावर जेव्हां मी माझ्या घराचं दार उघडलं नि अंगणांतच तुझी चरणयुगुले माझ्या दृष्टिपथांत आली तेव्हांच माझी आणखी खात्री झालीं कीं माझ्या देवा, तूंच मला त्यावेळीं हांक मारींत होतास.

प्रभू दर्शनाची तळमळ माझ्या मनीं असतांना रात्री तूं मारलेल्या हांकेला 'ओ' देण्याचं मला कसं सुचलं नाहीं ? निद्रेचा त्याग करून तुझ्याकडे धावायचं काम माझ्याकडून कसं बर झालं नाही? तुझ्या दर्शनासाठीं तुझंच ध्यान मननं नि चिंतनांत असतांना रात्रीं आयत्या वेळीं तुझ्याकडे निघून येण्याचं काम कां बरे माझ्या कडून झाले नाहीं? मला हे काम दुर्घट कसे झाले? छे छे हे कोडे माझ्याकडून सुटत नाहीं. मी यावर जों जों विचार करतों. तो तो ते कोडे मला अवघड होऊन बसते नि मी मतिमूढ होतों.

माझ्या देवा हे माझे कोडे उलगड आणि मला भेट दे.

**याचना :**

माझ्या देवा, किती बरे मी तुझी याचना करावी ?

सकाळ झाली कीं, हातीं झोळी घेऊन मला तुझ्या मंदिरी यावे लागते. तुझ्या पुढे हात पसरवित मला याचना करावी लागते. "देवा मला हे दे" देवा मला ते दे "

सायंकाळ झाली कीं, तूं दिलेल्या वस्तूंची झोळी घरी आणावी लागते. तूं दिलेल्या या भिक्षेतल्या चिजवस्तूंनं मला माझे दिवस कंठावे लागते. येणें प्रमाणें तुझ्या भिक्षेवरच मला माझे जीवन घालावे लागत आहे. या भिकाऱ्याच्या धंद्याला मी आतां पूर्णपणें कंटाळली आहे. असं वाटते कीं ही झोळी फाडून टाकावी. तुझ्या मंदिरी भिक्षेस्तव या पुढे ही झोळी कधींच जाऊं नये आणि या भिक्षेकरीच्या धंद्याला कायमचा राम राम ठोकावा.

दिन प्रतिदिनी माझ्या मनीं तोच विचार येतो. रात्री झोपतांना विचार करतो उद्या भिक्षेकरीच्या धंद्याला तिलांजलि द्यायची परंतु छे ! दुसऱ्या दिवशी सकाळीं उठल्याबरोबर मी काखेत झोळीं मारतो व तुझ्या मंदिरींचा रस्ता धरितो. माझी झोळी कधीच माझ्यानें कधीच फाडली जात नाही नि देवा तुझ्या मंदिरी येण्याचा रस्ताहि माझ्याकडून कधीच चुकत नाहीं. हा भिक्षेकरींचा धंदाहि माझ्याकडून सुटतां सुटत नाही. आणि मग माझे मलाच आश्चर्य

वाटते. हां भिक्षेकरींचा धंदा आपल्या हाडीमाशीं अितका खिळला कसा?

माझ्या देवा, बराच वेळ विचार करूनहि माझ्या वरींल विचारांची अंमलबजावणी माझ्याकडून होत नाहीं. नि माझ्या आयुष्याचे असेच एकेक दिवस जाताहेत. मी दुर्बल आहे नि देवा, तूं सबल आहेस. तुझ्या भिक्षेवरच मीं जगावे यांतच मला भूषण आहे. असे विचारांती मला वाटूं लागले आहे. आणि म्हणूनच आता आहे. त्यातच–तुझ्या भिक्षेकरीच्या धंद्यातच मी समाधान मानून घेत आहे आणि तुझी मी याचना करतो आहे कीं, " देवा, तूंच सर्व समर्थ आहेस. तुझ्या समोरच झोळी पसरतिण्यात मला आनंद वाटतो. धन्यता वाटते. ही झोळी माझें कडून कधींच फाटली न जावो, भिक्षेसाठीं येण्याचा तुझ्या मंदिरीचा रस्ता मला कधीं न चूको व दाता म्हणूत तुझा हात कधी रीता न होवो. "

माझ्या देवा, हे राजें, महाराजे, सम्राट लक्ष्मीवंत नि सत्ताधारीं मला काय देणार आहेत ? त्यांच्याजवळ आहे तरी काय ? तूंच दाता असावा आणि मी याचक असावा आणि तुझीच मी याचना करावी.

हे परमात्मन मला शक्ति दे, मला विद्या दे, मला ज्ञान दे, मला प्रकाश दे–

"तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा अमृतंगमया "

**धावा :**

हे कोण धटिंगण माझ्या मार्गावर बसले आहेत बरें ?

माझ्या मार्गावर बसून ते मला मार्गस्थ होऊं देत नाहींत. मार्ग भ्रष्ट करून ते मला दरडावतात. " खबरदार, जर या मार्गानें तूं गेलास तर ? आम्ही तुला बडवून काढू. या मार्गानें जाऊं नकोस, " आणि ते मला आडवे होतात. माझ्यावर लत्ता प्रहार करतात. माझ्या खिशातील चीजवस्तू काढून ते मला दरिद्री करून सोडीत आहेत. आता मी माझा मार्ग कसा आक्रमावा बरें ?

अहो, दिवसा ढवळ्या ते चोर माझ्या घरांत घुसताहेत. मला माझ्या घराबाहेर घालवून देत मला ते बजावतात, " चल, निघ या आमच्या घरांतून हे घर आमचं आहे. तूं उपऱ्या आहेस. आमचं घर रिकामे करून तूं येथून चालता हो आणि खबरदार जर पुन्हां आमच्या घरांत पाय ठेवलांस तर?"

असं बोलून त्यांनी माझ्या घरावरचा ताबा घेतला. माझं घर असून मला त्यांनीं घराबाहेर घालविलं माझ्या घरांतील माझ्या प्रिय वस्तू ते निःशेष करीत आहेत. माझ्या घरांची पूर्ण मांडणीच बदलून आपल्या सोयीप्रमाणें ते मांडणी करीत आहेत. त्यांच्याशी युद्ध खेळून मी माझे घर कसें ताब्यांत घ्यावे बरे ?

तशांत माझ्या शरीरांतच भुताटकी शिरलीं आहे. ही भूते मला निवांत बसू देत नाहींत. विश्रांती घेऊ देत नाहींत. मन बुद्धी नि इंद्रियावर या भूतांनी आपले स्वामित्व गाजविले आहे. त्यामुळे ती भूते मला निट विचार करूं देस नाहींत. माझ्याकडून योग्य तो आचार होत नाहींत खाणें पिणें, झोपणें अि. क्रियांचेवेळीं ही भूते माझ्यासमोंर प्रगट होतात. माझ्याभोवती थैमान घालतात. त्यामुळे माझ्या जीवाला आराम नाहीं. सुख नाहीं. शांती नाही. माझे भवितव्य मला भिषण भासत आहे. माझी मलाच शाश्वति वाटत नाहीं. माझी पांचावर धारण बसली आहे, आतां काय करावे बरे मी ?

येणें प्रमाणें मला मार्ग नाहीं घर नाही. शरीरावर माझा अधिकार नाही मी मार्ग भ्रष्ट झालो आहे. बे घर झालो आहे.व शरीर विहीन झालो आहे. माझे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. जीवनांत माझा महान पराभव झाला आहे. आतां मी काय करू? कुणाची मदत घेऊं ? नि कुणाला शरण जाऊ ?

माझ्या परमेश्वरा, तुझ्या वाचून मला कुणी समर्थ दिसत नाही. तुझा आशीर्वाद माझ्या पाठीशी असूं दे त्यानें मला उत्साह येईल. अंगात शक्ति निर्माण होईल. मग माझ्या मार्गावरील या धटिंगणांना पिटाळून लावीन. मी निःशंकपणें मार्गस्त होईन. बलाढ्य चोरांना माझ्या घरांतून हुसकून लावीन व माझ्या घरांत निर्भय पणें

राहीन. तसेंच माझ्या शरीरांत घुसलेल्या या भूतांना हांकलून देईन. तुझ्या आशीर्वादानें प्रभो मी या धटिंगणांचा, चोरांचा नि भूतांचा असा समाचार घेईन कीं यापुढें ते कधींच माझ्या वाटेला येणार नाहींत, त्यांचा मी बीमोड करीन. आणि आयुष्यभर प्रभो, मी तुझी चरणसेवा करीन.

## दिक्षा :

प्राणप्रिये, माझ्या गृहांत रात्री तूं प्रवेश केलास त्यावेळी मी समीपदर्शनाचे लिखाण लिहत होतो. माझ्या समीप येऊन तूं माझ्या मागे उभी राहिलीस. परंतु माझ्या लिखाणात मी सर्वथैव मग्न असल्यानें माझे तुझ्याकडे लक्ष नव्हते. यामुळें क्रोधायमान होऊन तूं माझी लेखणी हिसकावून घेतलीस आणि मला म्हणालींस "पुरे झालं हे लिखाण,थोडे बाहेर फिरून येऊ या"

तुझ्या त्या अनपेक्षित सलगीच्या वागण्यानें व मधूर बोलानें मी प्रथम चकित झालो. नि आनंदलोहि, मला वाटले, उन्हाळयात थंडगार वाऱ्याची झुळूक आली आहे. कुठल्याशा बागेत मंद मधूर सुगंध दर-वळतो आहे. कुठलेशे श्रवणिय संगीत आपण श्रवण करतो आहोत,आणि प्रियतमे,तुझ्याकडे पाहून मला वाटले माझ्या समोर स्वर्गातील सौन्दर्य सम्राज्ञी अप्सराच अवतीर्ण झाली आहे.

तूं आपल्या करांत माझा कर घेतलास आणि मला उठवि-विलेस. तुझ्या सोबतीनें मी घरांतून ऊंबरठयात, ऊंबरठयातुन अंगणांत, नि फुगणांतुन बाहेरच्या विश्वांत आलो. गार वाऱ्याची झुळूक वहात होती. झऱ्याच्या खळखळ आवाज येत होता. अंबराईतील मोहोराचा नि फुलांचा मधूर वास येत होता. नि आकाशात चंद्र विराजमान झाला होता. त्याचे पिठासारखे शुभ्र चांदणे आपल्या अंग प्रत्यंगावर पडले होते.

तुझा तो सहवास सुखाचां भासला मला. तुझ्या स्पर्शानें माझ्या शरिरावर अनुनुभूत रोमांच उठले. तुझ्या त्या नेत्ररुपी शर शंधनानें मी घायाळ झालो. नि तुझ्या मधूर बोलानें मी जिंकला गेलो.

माझ्या या पराभवाने मला आनंद झाला. माझ्या मनांत परिवर्तन निर्माण झाले. मला तुझ्या विषयीं प्रेम वाटू लागले. तुजविषयीचे आकर्षण माझ्या मनांत निर्माण झाले. महत पुण्याईन माझ्या आयुष्यात आजचा दिवस साधला नि तुझी नि माझी भेट झाली आपण होऊंन तूं माझ्या घरांन प्रवेश करावास,नि आपुलकीन तूं मला या एकांतात आणावसं याचा मला अभिमान वाटला.यातूनच तुझं माझ्या मनीं तूज विषयींचीं प्रीतीची ज्योत निर्माण झालो नि मला एका वेगळचा विश्वात आणलस. या तुजवरील प्रीतीमुळेच कीं काय तेथील रान फुले गोळा केली. नि प्रेमानें तुझ्या केसांत खोविली. तुझा हात घट्ट धरला–अगदीं घट्ट कीं जो काळ पुरुषाकडूनहि सुटला जाणार नाहीं आणि मग माझं हृदगत माझ्या ओठा बाहेर आलं.

"माझ्या हृदये, माझं तुझ्यावर प्रेम बसलं आहे. या माझ्या प्रीतिची तूं संभावना करुं नकोस. माझं प्रेम अव्हेरुं नकोस. प्रेमाची भाषा मला आजपर्यन्त माहित नव्हती. ती प्रीती आज तूं जागविली आहेस हा तूंच फुलविलेला प्रीतीचा वेल तूं तोडूं नकोस. हृदयेश्वरी, माझ्या हृदयाच्या सिहासनावर मी तुला वसविलं आहे ते स्थान पवित्रतेच आंहे. त्या स्थानाचा भंग करूं नकोस. मग बोल तूं माझी सहचारिणी होतेस काय माझो जीवन संगीनी होतेस काय ? माझ्या गृहस्थ धर्माची सोबतीण होतेस काय ?

"मी श्रीराम तूं सीता, मी श्रीकृष्ण तूं रुख्मिणी मी विठ्ठल तूं रूखमाई, मी विष्णू तूं लक्ष्मी, मी शंकर तूं पार्वती, मी अर्जुन तूं द्रौपदी, मी नल तू दमयंती, मी सत्यवान तूं सावित्री, मीं हरिश्चंद्र तू तारामती येणें प्रमाणें आपले पती पत्नोचे नाते होईल.वैवाहिक जीवनाच्या पवित्र बंधनानें आपण जखडले जाऊं. जीवनाचे वस्त्र आपण आपल्या सोबतीनें विणूं नि या पवित्र गृहस्थ धर्माची दीक्षा घेंऊं प्राप्त कर्तव्यें उत्तमपणें बजावून आपण नवीन विश्व निर्माण करू. वंश विस्तार वाढवूं. वंश सातत्य टिकवूं नि आपलं घर स्वर्ग बनवूं."

या माझ्या बोलण्यानें तुला आनंद झाला. तुझ्या मनांतले विचार माझ्या ओठावर आल्यानें पडत्या फळाची आज्ञा तूं अबोल

राहून स्वीकारलीस. आतांपर्यन्त तुझ्या वागण्यातील मन मोकळेपणा कमी झाला. वाऱ्यानें भुरभुरणारे केस तूं सावरलेस नि चेहऱ्यावरील तुझं हंसतमुख भाव गंभीर झाला. खांद्यावर पडलेला पदर तूं आपल्या डोक्यावर घेतलास आणि विनम्र भावे तूं माझे चरण धरलेस.

तूं मला म्हणालीस " मी तुमच्या चरणाची दासी आहे "

माझ्या चरणाशी लागलेले तुझें करकमल आपल्या हातात घेत मी म्हणालो "नाही प्रियतमे,तुझ स्थान या माझ्या चरणाशी नाही ते माझ्या हृदयांत आहे. "

**प्रश्न :**

माझ्या प्रभो, लांबच्या प्रवांसाला मी निघालो त्यावेळीं मला वाटले माझ्या या दीर्घ प्रवासात तुझी सोबत मला सुखाची होईल. प्रवासही सार्थकी लागेल. यास्तव हा प्रवास तुझ्या सोबतीनंच करावा.

माझ्या मनींचा हा निश्चय ठरल्यावर देवा,मी तुझ्या मंदिरी गेलो.मला तेथे आढळून आले कीं तुझ्या प्रवासांत तूंच मला सोबत करण्याच्या विचारांत होतास. आणि त्यासाठींच माझी वांट बघत होतास. मी मंदिरीं येतांच तूं स्वतःच स्थान सोडून माझ्यासमोर उभा ठाकलास. माझं बोट धरून तूं मला म्हणालांस "सवंगडचा चल, माझ्या प्रवासांत तूं माझा सोबती हो."

तुझ्या त्या उदगारांनी मला नवल तर वाटले पण संतोषही वाटला. मला आनंद झाला तुझ्याबद्दल आतींव आदर वाटला. अभिमान वाटला. भक्तिभाव वृद्धिगत झाला. हातात हात घालून आपण प्रवासाला सुरूवात केली. प्रवासाचा बराच मोठा पल्ला आपण गांठला या प्रवासांत आपण दोघे पूर्वीपेक्षाहि अधिकाधिक जवळ आलो समीप- अगदी समीप आलो. एकमेकांच्या अंतरंगांची ओळख आपण पूर्णपणें करून घेतली.

या नंतर कांहीं वेळानें आपणांस भूक लागली. वाटेवर समोरच्या वहात्या नदीच्या पात्रांत आपण आलो. नदीच्या थंडगार पाण्यानें आपण तोंड नि हातपाय धुतले आणि किनाऱ्यावर असलेल्या अंबराईत आपण आपल्या शिदोऱ्या सोडल्या. माझ्या शिदोरीतींल एक

भाकरी मी वानगी दाखल तुला खावयास दिली, आणि तुझ्या शिदोरीतील दशमी तूं मला खावयास दिली. ती खात मीं म्हणालो, "किती रुचकर आहे तुझी दशमी ही " नि तूं मला म्हणालास, "किती गोड भाकरी आहे तुझी. "

पोट भरल्यावर आपण नदींत आलो. तोंड नि हात धुवून घटाघटा पाणी प्यालो. विश्रांतीस्तव गडद अंबराईत आलो. आता मध्यान्हीची वेळ झाली होती. सूर्य नारायण मध्यावर बेऊन तापत होता. आपल्याला वाटले थोडी वामकुक्षी करावी. विश्राती ध्यावी. सूर्य कलून उन हमक झालं कीं मग पुन्हा प्रवासाला सुरवात करावी.

वामकुक्षी झाल्यावर देवा, आपण ताजे तवानें झालो. सत्साहानें आपल पुढील प्रवासाला सुरवात केली. कांही अंतर चालून झाल्यावर मला समजले दुपार नंतरच्या प्रवासांत प्रत्यक्ष माझ्या सोबतीला तूं नाहीस. प्रत्यक्ष माझया डोळयांना तूं दिसत नाहीस. तरीही माझ्या या प्रवासांत तूं माझा संगाती आहेस. माझ्याबरोबर तूं चालतो आहेस. नि तुझी प्रेरणा माझे ठायी पूर्णपणें अवतरलीं आहे. माझे प्रवास पूर्वीपेक्षाहि दुप्पट वेगानें होतो आहे. त्यामुळे मला जेथे जावयाचे आहे ते स्थानहि पावलो पावली मला जवळ येत आहेसें वाटत आहे.

वस्तुतः तूं माझ्या सोबतीला प्रत्यक्ष नसतांनाही तूंच माझ्याबरोबर आहेस व म्हणूनच माझा हा प्रदीर्घ नि शुष्क प्रवास मी करीत आहे असें मला वाटते.

प्रभो, असे मला कां वाटत आहे हेच मला समजत नाहीं, या साऱ्या प्रश्नाचे उत्तर विचार करूनही मला मिळत नाहीं.

देवा, काय असेल बरे त्याचे उत्तर ?

## संवेदना :

मला वाटते, तूं माझ्यासमोर प्रगट होशील. मी तुला सर्वभावे वंदन करीन, जीवींचे हितगुज मी तुला सांगेन, हृदयीं साठविलेले सुखदुःख मी तुला निवेदन करीन, सुखाची भिक्षा वाढ, दुःखाचा

परिहार कर. माझा संसार सुखाचा कर नि जीवनाच्या अखेरीस मला मुक्ति दे. अशी मी तुजजवळ विनवणी करीन. या महत् आशेनें देवा, मी तुझ्या मंदीरी आलो. तुजसमोर बसून तुझ्या साक्षात् दर्शनासाठीं संबंध रात्र जागून काढली, तुझ्या आगमनाची प्रतिक्षा केली. संबंध रात्रभर मी तुझीच प्रार्थना करीत होतो. परंतु कठोरा, तूं माझ्या समोर प्रगट झाला नाहीस. आणि मला तूं दर्शन दिले नाहीस. तेणें करून, माझ्या सुखाचे संवर्धन, दुःखाचे परिमार्जन आणि मोक्षत्वाची माझी अिच्छा मनातल्या मनांत राहीली. मी निराशमनानें घरी परतलो.

घरी परतल्यावरहि माझ्या जिवाला स्वस्थता नव्हती. मला राहून राहून वाटे,कीं तूं माझ्यासमोर कां प्रगट झाला नाहीस? प्रगट कां होत नाहीस? तुला प्रसन्न करावयास मी कां असमर्थ आहे ? कीं माझी प्रार्थना सदोष आहे? मी त्यावर बराच विचार केला देव प्रसन्न न होण्यासंबंधीचे निरनिराळे संशय मनीं प्रगट केले परंतु. कारणच गवसेना.

मी माझं चारित्र्य धुंडाळलं माझं व्यक्तिगत जीवन शोधून पाहिलं आणि मग मला वाटलं माझा देवावरील भाव-त्या भावाशीं सुसंगत अशी माझी प्रार्थना होती कां ?

"देवा मला सुखी ठेव. माझ्या सुखाचे संवर्धन व दुःखाचा परिहार कर. जीवनातील प्राप्त कर्तव्यें माझ्याहातून नीट घडू देत. ही प्राप्त कर्तव्यें नीट बजावीत असतां माझा तुझ्या वरील भाव थोडा देखील ढळू देऊं नकोम आणि जीवनाच्या अखेरीस मला मोक्ष दे." अशी माझी प्रमाणिक प्रार्थना होती. दैनंदिन जीवनांत वरील माझ्या प्रार्थनेशीं सुसंगत असे माझे आचार विचार नि उच्चार घडत होते. मग माझ्या प्रार्थनेंत दोष तरी कोणता होता, ज्यायोगे देव मला दर्शन देत नव्हता ?

खूप विचार केल्यावरहि मला कारण गवसेना. कल्पनाशक्ति पलीकडे मी गेलो. सारखा एकच ध्यास मनीं ठेवला "देव मला दर्शन कां देत नाहीं?" "माझी प्रार्थना कां सदोश आहे ?"आणि त्यासाठीं डोळसपणाने मी माझे दैनंदिन जींवन शोधृ लागलो. तेव्हां मला

आढळून आले कीं आपण अद्याप आपल्या व्यक्तिगत भावनेंपलिकडे गेलो नाहीं, आपल्या व्यक्तिच्या बाहेरील एक जग आहे. त्या जगांतही आपल्या परमेश्वराचाच एक अंश आहे. आपल्याला सुखदुःख आहे. आपल्या व्यक्तिबाहेरील जगांतही सुखदुःख आहे. आपल्या सुखाचे संवर्धन व दुःखाचा परिहार ही आपली भावना तशी जगाबद्दलची आपली भावना नाहीं. याची मला जाणीव झाली आणि मग मला खंत वाटली. मी लाजेनें चूर झालो व शरमेनें माझी मान खाली पडली.

जगा विषयी विचार करतां करता मला दिसून आले कीं जगांत केवढे तरी दुःख भरले आहे. जगांत विषमता आहे. पिळवणूक आहे. उच्च नीचता शाहे. वर्णविद्वेष आहे. गुलामगिरी आहे. व्यक्ति व्यक्तिच्या मनांत एकमेकांबद्दल द्वेष आहे, राष्ट्रा राष्ट्रांच्यां मनांत एकमेकांबद्दल असूया आहे. यामुळे दुरता वाटत आहे. असहकार वाढीस लागत आहें. व जग चिरस्थायी शांततेपासून दूर पळत आहे.

यामुळेंच आज जगावर तिसऱ्या महायुद्धाचे भावी भीषण संकट कोसळले आहे. युद्धाची टांगती तलवार जगाच्या मानेवर उभी आहे. या युध्दाच्या खाईत एकदां लोटले कीं त्याची परिणती किती भयानक दुष्परिणामांत होणार आहे व मानवी संस्कृति यामुळेंच पूर्णपणें त्यांतच नष्ट होणार कीं काय अशी शंका आजच्या विचारवंतापुढें उभी आहे. अशा परिस्थितींत मी देवाजवळ माझ्या व्यक्तिच्या सुख संवर्धनाची, दुःख परिहाराची नि मोक्षत्वाची प्रार्थना करावी ना ? माझ्या सुखसंवर्धनाबरोबर जगाचे सुखसंवर्धन, माझ्या दुःखाच्या परिहार्याबरोबर जगाच्या दुःखाचा परिहार व स्वतःच्या मोक्षत्वा बरोबर जगांतील मोक्षत्वाबाबतची आपली प्रार्थना हवी हे मला त्यानंतर समजूम आले.

या समजूतीनंतर माझे मत बदललें. माझीं दृष्टि बदलली. या मताप्रमाणें माझे आचार विचार बनले. माझे हातून तद्वत कर्म घडत गेले. त्या कर्माने माझी व्यक्तिगत प्रार्थना संपली व मला परमेश्वर व्यापक दिसूं लागला.

**प्रवास :**

पृथ्वीवर मी जन्माला आलो त्यावेळीं मला कळले कीं आपला पृथ्वीवरील प्रवास निर्जन, एकांकी नि ओसाड आहे, येथील प्रदेश वालुकामय आहे. जिकडे तिकडें वाळुच वाळू आहे. थंडगार वाऱ्याची झुळुक नाहीं. रस्त्यावर गर्दशा झाडांची सांवली नाहीं. जागोजाग पाण्याची सरोवरें नाहींत. दुपारच्या प्रहरीं वाळूं तापून जाते. गरम वाफेची झुळकें वाहूं लागतात. जीव कोरडा पडतो. आणि प्रवासी पांथस्थ "पाणी" "पाणी" म्हणून ओरडतो, अशा या दुर्गम प्रदेशांत आपणांस प्रवास करावयाचा आहे. या जाणिवेनें माझ्या अंगावर कांटा उभा राहिला मला वाटलें, हा आपला अिहलोकींचा प्रवास असाच निर्जन, एकांकी नि ओसाड झाला तर मग जन्मून उपयोग तरी काय ? पृथ्वीवरील आपले हे आगमन हा मागील जन्मीचा शाप तर नसेल ना ?

या विचारानें मी हतबल झालो. या जीवन प्रवासांत देवाचा आशिर्वाद आपल्या हिताचा नि कल्याणाचा होईल व तो संपादन करण्याकरितां मी देवालाच शरण गेलो दोन्ही हात जोडून विनम्रभावे मी त्याची प्रार्थना केली, "माझ्या देवा, मी तुला सर्वस्वी शरण आलो आहे मला आशिर्वाद दे. पृथ्वीवरच्या माझ्या या जीवन प्रवासांत मला तुझ्या सहवासाची आंतरिक ओढ आहे.तुझ्या सहवासावाचून तुझ्या आशिर्वादा वाचून माझ्यानें हा दुर्गम प्रवास होणार नाहीं.

"तुझ्या कृपेनें मला मित्र लाभतील, सुहृद भेटतील. आई-वडिलांची ममता, बहिणभावाची माया,बायकामुलांचे प्रेम, मामा मावशी आत्या ई. जवळच्या नातलगांचा सुखद सहवास लाभेल. गुरूजनांचे मार्गदर्शन घडेल नि आधींच दुर्गम नि नीरस असलेला प्रवास सुकर, सुरस नि गोड होईल.

"देवा, तुझ्या आशिर्वादानें मी उल्हासित होईन, ज्ञानभक्ति नि कर्म यांतील गुह्य मी जाणून घेईन. तुजविषयींचं समग्र ज्ञान मी संपादन करीन. तुझी भक्ति मी आरंभींन. तुझ्याप्रत येण्याचं कर्म मी आचारीन ह्या मार्गाप्रत चालताना मी माझा प्रपंच कदापि सोडणार

नाहीं. स्वार्थ आणि परमार्थ हे माझ्या संसार रथांची दोन चाकें आहेत असे समजून परमार्थाला पूरक असलेला प्रपंच मी करीन.

"विद्यार्थी दशेत विद्या विभूषित होईन. त्या बरोबर अद्यांतर ज्ञानहि मिळवीन, राजकारण, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र तत्वज्ञान मानसशास्त्र, आधुनिक विज्ञान इत्यादी सर्व शास्त्रांचे समग्र ज्ञान मी मिळविन. विवेक पूर्णज्ञान संपादन करीन व ज्ञानीं होईन. केवळ गाढा पंडीत अथवा पढीक विद्वान होणार नाहीं. एकांडया शिलेदार बनणार नाहीं. दलितांची दु:खे जाणून डोळयांत आंसवे उभी राहतील अशी अनुकंपा माझ्या मनांत मी निर्माण करीन. परंतु केवळ अनुकंपेनें माझ्या जीवाला शांतत नि स्वस्थता मिळणार नाहीं. यास्तव हीं दु:खे दूर करण्याचा शोध घेंईन व तो शोध लागल्यावर त्याचप्रमाणें मी आचारण करीन.

गृहस्थाश्रमांत गार्हस्थय धर्माची कामें मी यथासांग करीन. घरच्या शेतींत खूप राबेन व शेतांचे नंदनवन करीन. मुला–बाळांना वाढविन, त्यांना लहानाचें मोठे करीन, त्यांचे शिक्षण नि आचरणां–कडे.जांतीनें लक्ष घालून त्यांचा शारिरिक, मानसिक नि बौद्धिक विकास घडवून आणिन. त्यांचे विवाह व उद्योग-धंद्या विषयक असलेलं पालकांचं कर्तव्य मी पूर्ण करीन. त्यांना बालपणांपासूनच नीतिमय जीवन जगण्याचा पाठ देईन नि अशाप्रकारे त्यांचं नि माझं जीवन सुखाचं नि कल्याणकारक होण्यासाठीं मी झटेन.

"माझ्या देवा, पृथ्वीवरील डोंगर, नि दऱ्या डोंगरांवरील सौंदर्य, ऊंचावरुन वाहणारे धबधबे, नाले, मी माझ्या डोळयांनी पाहीन अनंत आकाश, आकाशांतील हंसरा चंद्र, लुकलुकणारे तारे, सकाळचा सूर्योदय, नि सायंकाळचा सूर्यास्त नि धीरगंभीर सागर या सर्वाची शोभा माझ्या नयनांना संतोषप्रद होईल. शास्त्रोक्त संगीताचे स्वर, अरण्यांतील मोरांच्या केका, वसंताच्या आगमनाचें सूचक स्वर आळविणाऱ्या कोकिळांचे कूहु कूहे हे शब्द, धो धो वाहणाऱ्या नद्यांच्या प्रवाहाचे शब्द–जणू सृष्टीवरील जीवंत संगीत हे–हे सारे ऐकून कर्ण तृप्त होतील: भारत नाटयमं, मणिपूरी, तांडव, भांगडा इत्यादी, पौरात्य भारतीय

नृत्यें पाहुन होणारा आनंद अवर्णनीय आहे. तो आनंद मी मिळवीन. ललीत नि आध्यात्मिक वाचनानें मी वाङमयीन रुचि अनुभवीन अध्यात्मिक वाचनानें मी तुझे संम्यक ज्ञान मिळवीन. व तुझ्या समीप येईन सर्व धर्मांचे तत्वज्ञान जाणून घेईन सर्व धर्माचा आवास्तव अभिभान बाळगून पर धर्माचा मी व्देष करणार नाहीं. सहिष्णूतेनें सर्व धर्माशीं वागेन आपल्या राष्ट्रांचाहि पोकळ अभिमान बाळगून मी इतर राष्ट्रांकडे लोभी अगर क्रोधी दृष्टिनें पहाणार नाहीं. तर समभावनेने सर्व राष्ट्रांशी वर्तणूक ठेवीन. राष्ट्रसंकटांत असतांना प्रसंगी, पत्नी, मुले–बाळे अि.च्या संसारिक पाशांची पर्वा न करितां राष्ट्र संरक्षणार्थ मी हौतात्म्य पत्करीन.

"जीवनात प्रवाशाची भूमिका घेऊन निर निराळे देश, नि खंडे मी पाहीन. तेथील लोक, लोकांचे आचार विचार, त्यांची संस्कृति इतिहास, भौगोलीक परिस्थिती, त्यांचे राजकीय, आर्थिक नि धार्मिक व्यवस्था यांचा मी तौलनिक अभ्यास करीन, त्या लोकांशी मी समरस होईन. येणेप्रमाणें जीवनाचे बहुरंगी नि बहुढंगी असें सर्वांगीण दर्शन घेईन व माझ्या जीवनातील हा प्रवास मी सुखकारक करीन. आनंदमय करीन. कल्याणकारक करीन.

"माझ्या देवा, तुझ्या आशिर्वादावाचून हे कसे बरे शक्य आहे. आधिच वालुकामय, शुष्क नि निरस असा हा प्रदेश माझ्या जीवनांत मला आक्रमावा लागणार आहें. तो वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें प्रापंचिक नि पारमार्थिक दृष्ट्या सुखाचा नि कल्याणकारक होण्याचा मी प्रयत्न करीन. तो यशस्वी होण्यासाठीं माझ्या देवा, मला तुझी कृपा हवी आहे. तो आशिर्वाद माझ्या पाठींशी सदैव असू दे एवढेच माझे मागणें आहे."

**प्रसाद :**

माझ्या उपास्य देवतेच्या पुढे मी माझें हृदयकमल ठेविले वाक् नेत्र, कर्ण आदि पंचेद्रियांची सुमनमाला त्याला वाहिली. मन, बुद्धि नि चित्त त्याला वाहिली भावरुपी पुष्पांची ओंजळ–भावपुष्पांजलि त्याला सर्मपित केली. जीवनरुपि ग्रंथ त्यांच्या पायों वाहिला. आणि भक्तिभाव प्रगट केला. "माझ्या देवा, माझ्या या भेटीचा स्वीकार कर."

मला वाटलें होते, देव यावर संतुष्ट होईल, मूर्तितून साकार प्रगट होईल. प्रेमभरानें या भक्ताकडे–माझ्याकडे दृष्टीक्षेप करील. माझी सुमनमाला करांगुलींत घेईल. हृदयकुसूम आपल्या हृदयांशी कवटाळील. याझा जीवनग्रंथ उचलुन त्यावर प्रेमभरानें हात फिरवील. त्या ग्रंथांत मी प्रगट केलेले भाव तो वाचील. त्या भावांशी तो तद्रुप होईल. माझ्या विषयींच्या अनुकंपेनें त्याच्या मनांत प्रेम उचंबळून येईन आणि मग हें पाहुन माझें हृदयकमल, पंचेद्रियांची सुमनमाल, भावरुपी पुष्पांजलि, नि जीवनग्रंथ ताजेंतवानें होऊन प्रफूल्लित होतील.आणि मग देवाचा अनुग्रह झाल्यांनं त्याच्या कृपेने–आशिर्वादाने हा भक्त कृतकृत्य होईल, उद्धार होईल माझा नि त्यानें मीं मोक्षत्वाप्रत जाईल अशी माझी भाबडी आशा होती.

परंतु छे ! असं कांहीच झालं नाहीं - मी उपासना करीत असलेल्या माझ्या समोरच्या मूर्तितून तो साकार झाला नाहीं, ह्या गोष्टीनं मी निराश झालो. देवाच्या दर्शनासाठीं लागलेली माझ्या अंतरितील आस मला स्वस्थ बसूं देईना, यास्तव माझी उपासना मी अधिक वाढविली. देवाचं ध्यान आरंभले. तपस्या सुरुं केली. माझ्या मनीं एकच धोक होता आणि तो होता देवदर्शनाचा. या दर्शनासाठीं माझीं धडपड सुरुं होती. "देवा मला दर्शन दे.मला तुझ्यांतच समावून घे. माझा उद्धार कर " येणेकरुन माझी त्याजवळ अंतरिक प्रार्थना होती.

ध्यानांत असतां कांही वेळानंतर मी डोळे उघडले तो देवांच्या मूर्तितून त्याचे एकेक अवयव साकार होऊ लागलेले मला दिसले आणि त्यानें मला एकदम आनंद झाला मला वाटले एकेक अवयव साकार होत होतां देवाचे सर्व अवयव साकार होतील. आणि प्रत्यक्ष परब्रम्ह परमेश्वर आपल्यापुढे उभे ठाकतील, आभाळावरुन पुष्पांची वृष्टी होईल. देव आपणांस म्हणतील, "भक्ता, डोळे उघड, हा मी तुझ्यापुढे उभा आहे. तुला दर्शन देत आहे. काय मागावयाचे ते मागून घे. "

देवाचे हे शब्द ऐकतांच आपण पुलकित होउ आपल्या सर्वांगावर आनंदांचे रोमांच उभे राहतील. आपणांस अननुभूत आनंद होईल आणि आपण देवास म्हणू "देवा मला तुझ्या स्वरुपाप्रत नें माझा

उद्धार कर." आणि मग देव "तथास्तु" म्हणून अंतर्धान पावेल व आपला उद्धार होईल.

परंतु अरे रे, माझ्या डोळ्यांना दिसणाऱ्या देवाच्या मूर्तिचे अवयव पूर्णांशी साकार झाले नाहींत. आणि जे अवयव अर्धवट साकार झाले होते तेहि लुप्त पावले.देवाची पाषाण मूर्तिच तेवढी माझ्या दृष्टी-समोर मला दिसली.

या गोष्टीनं माझ्या मनाला मोठाच धक्का बसला. माझे मन कुठल्या कुठें भरकटत गेले. त्याचा मला पश्चाताप झाला. माझी उपासना असफल झाली आणि मला देवाचे दर्शन घडलें नाहीं. मला वाटलें कुणी तरी आपलें सत्व हरण केलें. आपल्यावर लत्ताप्रहार केला. आपली पूजा लाथाडली. देवाचे चरणीं वाहिलेला माझा जीवनग्रंथ भाव-पुष्पांजलि पंचेद्रियांची माला हृदयकमल यांना कुणीतरी लाथा मारल्या पायाखालीं त्या तुडविल्यात माझ्या भक्तीची अवहेलना केली. माझ्या आशा आकांक्षांचा चक्काचूर केला. माझ्या भावनांची उपेक्षा केली. आणि केवळ या मुळेंच निकट आलेल्या दुर्लभ आशा देवदर्शनाला आपण मुकलो.

क्षणकालानंतर मीच स्वतःला सांवरले स्वतःचे आसन सोडून समोरील उपास्य देवतेच्य मूर्तिपुढे मी गेलो. तिला प्रणिपात केला, साष्टांग भावें वंदन केलें आणि उपास्य देवतेची आळवणी केली, "माझ्या देवा, दैवानं जणू डाव साधला आणि त्यानं तुझ्या नि माझ्या दरम्यान भिंत उभा केली. त्या भिंतीनं तुझं दर्शन मला घडू शकलं नाहीं. तोंडाशी आलेला घास तोंडी न लागतां मातीत मिसळावा तसं माझं झालं. समीप असलेल्या तुझ्या दर्शनाला मी मुकलो, परंतु त्यानं मी निराश झालो नाही. उलट यापुढें दुप्पट उत्साहानं मी तुझ्या तपस्येला बसेंन आणि तुला प्राप्त करुन घेईन ही मी माझ्या मनीं पुर्ण निश्चय केला आहे.

"माझ्या देवा, तूं मला लाथाड, माझ्या भक्तिचा अव्हेर कर माझ्या उपासनेंची उपेक्षा कर. त्यानें मी नाउमेद होणार नाहीं. धीर सोडणार नाहीं. तुझी निस्सीम भक्ती मी आरंभीन. तुझे नाम क्षण कालहि सोडणार नाहीं. मला जणूं तुझं वेड लागलं आहे. तुझ्या दर्शनावाचून

तुझ्या प्राप्तीवांचून माझं हे वेड आतां जाणार नाहीं. माझी परीक्षा पाहण्यासाठीं तूं कसोटी पाहिलीस तरी त्या कसोटीत मी पूर्णपणें उतरेन आणि एक दिवस मी तुला प्राप्त करुन घेईन.

"तूं केलेल्या लत्ताप्रहारानं मी निराश झालों नाहीं. भगवान विष्णुप्रमाणें लत्ताप्रहार सहन करुन मी तुझी लाथ माझ्या हृदयीं ठसविली आहे. तिची प्रतिष्ठापना केली आहे. तो तुझ्या लत्ताप्रहार नसून तूं दिलेला तो प्रसाद आहें, असं समजून मी ती लाथ हृदयांशी बाळगिली आहे. आणि ज्या प्रसादानें तुला प्राप्त करुन घेण्यासाठींच मी अधिक प्रयत्नशील झालों आहे."

**शल्य :**

का कोणजाणें माझ्या जिवाला हूरहूर वाटतें कसल्या तरी विषादानें, माझ्या मनाला वेदना होतात. जन्मजन्मांतरीचे दुःख जें माझ्या हृदयींच्या एका कोपऱ्यांत दडलेले आहे ते मधूनमधून बाहेर येते. सबंध दिवसभर तें शल्यसारखे बोचते वेदना करते, पीडा देते.

हृदयींच्या वेदना, दुःखाचे शल्य, विषादाची पीडा मनांतून बाहेर काढण्याचा व मन प्रसन्न करण्याचा मी मानस्वी प्रयत्न करतो परंतू माझा हा सारा प्रयत्न विफल होतो. अशा परिस्थितींत दिवसामागून दिवस जातात. माझे कशांतचं चित नसते. ना खाण्यांत ना पिण्यांत, ना निद्रा घेण्यांत कीं कोणत्याही प्रकारचे कर्म करण्यांत. अशा रीतीनें एका मागून एक दिवस जातांत. आणि त्याने मी सदैव दुर्मुखलेला असतो.

माझ्या देवा, हे आहे तरी काय? असे कोणते दुःख माझ्या मनी घर करुन बसले आहे. ? जे मनांतून जातां जात नांही जिवाला त्रास देते हृदयाला वेदना करते. मनाला पीडा देते.

माझ्या जीवनेंश्वरा, यामुळंज कीं काय ? तूं मला तभे नाहीस? कीं तुझ्या नि माझ्या मार्गात हें शल्य आडवे आल्यानें तूं माझ्यापासून दूर गेला. आहेस ? आणि तुझी नि माझी यामुळें भेट होणार नाहीं कीं काय रे ?

माझ्या देवा, तुझ्या आशिर्वादाने या माझ्या दुःखाचा परिहार कर. माझ्या मनांतले हे दुःख काढून टाक. माझ्या जीविच्या

वेदना संपव. हृदयींच्या पीडा नाहीशा कर. मला भेट दे आणि माझा उद्धार कर.

**साध्य :**

देवा, तुला प्राप्त करून घेण्यासाठी मी फार प्रयास घेतले. फुलं, फळं नि गंधाक्षतांनी मी तुझे पूजन केलें. ग्रंथ वाचून स्वधर्माचे व तुझे ज्ञान मिळविले. संत समागम करून त्यांचे आचरण अवलंबिले. मनाचा मलीनपणा दूर केला. हरिनाम गांऊन वाणी पवित्र केली. दान धर्म करून पुण्य पदरी पाडून घेतले. जप जाप्य करून व तुझे ध्यान करून तुझे सानिध्य निकट आणण्याचा मी प्रयत्न केला. हरि किर्तन श्रवण केले. तीर्थ यात्रा केल्या. उपास तापास केले. या सर्वामागे माझी एकच ईच्छा होती आणि ती म्हणजे तुझा साक्षात्कार–तुझी प्राप्ती.

परंतु छे : ! इतकीं वर्षे परमेश्वर प्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असतांही मला तुझी प्राप्ती होईना ती प्राप्ती होवूं घातल्याचीं चिन्हें मला दिसेनांत. तुझे दर्शन डोळयांनी पाहण्याची, तुझे शब्द कानांनीं अैकण्याची ईच्छा या जन्मी तरी सफल होईल कीं नाहीं या विषयीं मी साशंक होई.आणि मग निराश होई. हा जन्मही तुझ्या प्राप्तीवाचूंन मला घालवावा लागत असल्यानें माझे मन विषण्ण होई. माझ्या मानसिक विश्वांत अंधारच अंधार पसरला आहे. असा मला भास होई. अमावास्येच्या गाढ अंधःकारांत आपण आपला हा जन्म घालवित आहोत असं वाटून मी स्वतःलाच दोष देई. आपल्या दुर्दैवामुळें आपणांस देव प्राप्ती होणार नाही असं मला वाटे.

अशा वेळीं एक विचार माझ्या मनांत डोकावून जाई–नव्हे ते मन मला बजावून सांगे " बा, हा मार्ग सोड. या मार्गाने तूं कितीही वाट चाल केलीस तरी तुला देव प्राप्तो होणार नाही. तुझ्या दैवांतच ती नाही. यापेक्षां हा मार्ग बदलून दुसरा मार्ग पत्कर. "

परंतु छे : । त्या देव मार्गाची मी इतकी वाटचाल केली होती कीं माझ्याकडून तो मार्ग बदलला गेला नाहीं. निराशेच्या गाढ अंधकारातही माझें ग्रंथ वाचन, संत समागम, फुलं, फळं गंधाक्षतांनी देवाचं पूजन, ध्यान धारणा, जपजाप्य, तीर्थ यात्रा, हरिनाम, हरिकथा श्रवण ईत्यादि कर्मे मी अखंड चालूं ठेंविली.

आणि आज मला समाधान लाभत आहे. स्वर्ग, मोक्ष, मुक्ति हे सारे माझ्या मार्गातच आहेत. देव मार्गाच्या अखंड वाटचालीत मला इश्वर भेटल्याचा आनंद मिळतो आहे,

**प्रवेश :**

मी माझ्या घरांतील आसनावर स्थानापन्न असतां माझ्या कानांवर शब्द आले " मी आंत येवूं कां " " मी आंत येवूं कां ? "

मला अत्यानंद झाला, मला वाटले आपण जिची प्रतिक्षा करीत आहोत तीच असावी ही. आपल्या घरी प्रवेशासाठी ती आपणांस हांक मारीत आहे.

मी समाधानानंच स्वतःच आसन सोडलं दाराची कडी खोलून दार उघडलं तो मला दाराबाहेर कुणींच दिसलें नाहीं.

मला वाटले, भास असेल हा, निराशमनाने दार लोटून मी पुनश्च माझ्या घरांतील आसनावर बसलो.

थोडयां वेळांतच एक शब्द माझ्या कानी आला. " मी आत येवूं कां ? " – " मी आत येवूं कां ? "

मला तो ध्वनी अैकून आनंद झाला. त्या आनंदातच मी माझे आसन सोडलें आणि दारा बाहेर डोकावले तों तेथे मला पूर्वीप्रमाणेंच कुणीही दिसले नाही. मला वाटले आपण वेडे तर नाहीं ना ? घडोघडीं वेडयासारखे आपण आपलें आसन सोडून दारा बाहेर डोकावतो आहोत.

दार उघडेच ठेवून मी माझ्या आसनावर पुन्हां स्थानापन्न झालो. कांहीं वेळानें पुन्हां तिसऱ्यांदा माझ्या कांनीं शब्द आलें " मी आत येवूं कां ? " – " मी आत येवूं कां ? "

परंतु आतां माझें त्या ध्वनीकडे लक्षच जात नाहीं. तो आवाज मोठमोठा होत चालला. " मी आंत येवूं कां ? " " मी आंत येवूं कां ? – "

उठून दार उघडावे व आंत येवूं कां ? असें म्हणणाऱ्याचे स्वागत करून त्याला आंत घ्यावे अशी ईच्छाच होत नाही. आता ज्या आसनावर बसून मी ठाण मांडून बसलो आहे ते आसन मी कधीच

सोडणार नाहीं व कुठेच धांव घेणार नाहीं. ध्वनि देणाऱ्यास मला एवढेच सांगावयाचे आहे कीं, " ध्वनिका, तूं यशोलक्ष्मी अस. राज्य लक्ष्मी अस कीं अन्य कुणीहि अस. तुझ्या आगमनासाठीं येणाऱ्या ध्वनीस मी भाळणार नाहीं. व माझे आसन सोडणार नाहीं. तुला जर यावयाचेच असेल तर व्यर्थ आवाज देऊन केवळ मला स्थानभ्रष्ट करण्याचा प्रयत्न करूं नकोस. निःशंक मनाने माझ्या घरांत प्रवेश कर. तुझ्या प्रवेशासाठीं माझ्या घराचं दार सदैव उघडे आहे. अन्यथा, मला तुझी आवश्यकता नाहीं. "

## मार्ग क्रमण :

अहो, अर्ध्या रात्रीं माझे मित्र माझ्या घरी आले. मी निद्रिस्त असतांहि मला त्यांनी उठविले आणि ते मला म्हणाले, " मित्रा, आपण सारे सोबतीनेच देवाच्या सेवेस जाऊं या. "

रात्र अंधारीची होती. मी अर्धवट झोपेतच होतो. माझा निद्रिस्तभाव अद्याप संपलेला नव्हता. म्हणून मी त्यांना म्हणालो, " मित्रांनो, रात्र अंधाराची आहे. मार्ग दिसत नाहीं. आतां थोडी झोंप घ्या उजाडल्यावर आपण सोबतीनं जाऊं या, म्हणजे दिवसा आपणांस भरभर मार्ग आक्रमिता येईल व आपणांस इष्ट स्थळ लवकर गांठता येईल. "

परंतु त्यांनी माझं म्हणणं अैकलं नाहीं. ते म्हणाले, " आतांच निघायचे आहे. " शेवटीं मी निर्धारात्मक स्वरांत त्यांना म्हणालो, " मित्रांनो, एवढ्या अंधाऱ्या रात्रीं मी येत नाहीं. अंधारामुळे आपणांस मार्गहि दिसणार नाहीं. उजाडेपर्यन्त झोंपहि पूर्ण होईल. आणि मग आपण सोबतीनेच बरोबर जावूं.

माझ्या त्या उद्‌गारानें ते माझ्यावर रागावले आणि मार्गस्त झाले. ते गेल्यावर मी निद्रिस्त झालो.

सकाळीं जेंव्हां मला जाग आली व मी डोळे उघडले तो पूर्वांचलावर सूर्यनारायण अवतीर्ण झालेला मला दिसला. अुद्यानांत फुलं फुललेली होतीं. त्यांचा मंदमधुर सुवास वातावरणांत दरवळला होता. पांखरांचा किलबिलाट कानीं येत होता. समोरील निर्झरिणीचा

अनुक्रम ............ दि. ..................

खळखळाटहि अैकूं येत होतो. अणू सृष्टीबालिका जागी होऊन पाळण्यातच आपले गोंडस हातपाय हलवीत असल्यासारखें वाटत होते. दूरच्या देवळांतील घंटेंचा आवाज माझ्या कर्णरंध्रात घुसला त्यासरशीं मी अंथरूण सोडले आणि आळस झाडला.

निद्रा संपून आतां मी जागृतावस्थेत आलो होतो. डोळ्यांवरील व शरीरावरील निद्रेचा भाव आतां पूर्णपणें मावळला होता व आता मी संपूर्णपणें जागृतींत आलो होतो शरीराबरोबर मन, बुद्धी चित्तहि उल्हसित झाले होते. रात्रींच्या माझ्या मित्रांची मला आठवण झाली. मी मनांत म्हणालो, " आपले मित्र आतांपर्यन्त कांहींसे दूर गेले असतील. आपणांसहि त्यांच्याच मार्गाने जावयाचे आहे व त्यांना पकडावयाचे आहे. आतां दिवसा प्रकाश असल्याने आपले मार्गक्रमण झपाटच्याने होईल. आपण त्यांना लवकर पकडूं व त्यांच्या सोबतीने कांहीं अंतरावरील देवालयांत देवीच्या पुजेस्तव जावूं त्यासाठीं प्रथम प्रातर्विधी आटोपून थंडगार पाण्याने स्नान करावे शुचिर्भूत व्हावे. घरासमोरील आपल्या अुद्यानांत फुललेलीं ओंजळभर फुलें घेवून आपल्या परमेश्वराची पूजा करावयास या मार्गोप्रत मार्गस्थ व्हावे. व्यर्थ वेळ दगडू नये.

आणि मग मी माझ्या तयारीस लागलों.

## प्रतिक्षा :

त्या दिवशीं रात्रीं तूं मला भेटलीस. त्याने मी आनंदीत झालों. आनंदाच्या भरात मी तुला मिठी मारली. नि तूंहि आनंदाने माझ्या बाहूपाशांत पडून होतीस. माझ्या जिवीचे हितगूज मी तुजजवळ नि तुझ्या जिवीचे हितगूज तूं माझ्याजवळ सांगितलेस यानें तूं नि मी व मी नि तूं एकमेकाच्या संन्निध आलों – हृदयांतरीं आलों. आपल्यांत आतां अंतर पडणार नाहीं. दोन्ही जीवांची ताटातूट होणार नाहीं व आपण एकजीव होवून जावूं. ही जाणीव दोघांच्या मनांत येतांच आपण दोघेही आनंदीत झालो.

सेकंदामागून सेकंद, मिनीटांमागून मिनीटं गेलीं. तासांमागून तास गेले परंतु आपले हितगूज संपेना. हा तुझा सहवास मला अमृताचा वाटला सकाळचे पांच वाजले. कोंबडा आरवला. पूर्व दिशा खुलूं लागली

नि त्यानंतर धरतीवरील एकेक पदार्थ दृष्टिक्षेपांत येऊ लागला परंतु आपण एकमेकांच्या सहवासांतच होतो. आपले बोलणे संपेना आणि आपली एकेक घटिका सोन्याने भरू लागली.

आणि अचानक प्रियतमे, तूं माझ्या बाहूपाशांतून आपली स्वतःची सुटका करून घेतलीस व माझ्या बाहूंपाशातून दूर झालीस मला तुझा राग आला. त्या रागांतच मी तुला बोललो. " निष्ठुरते, यासाठींच तू माझ्या सहवासांत आलीस काय ? त्यागच करायचा होता तर हें मीलन घडविलेस कशाला ? मला सोडून गेंलीस कीं मी या जगांत राहूं कशाला ? आत्महत्याच करीन मी कारण तुझ्या वाचून मला आतां जीवन कंठणे अशक्य झालं आहे.

माझं भाषण अैकून तुला आनंद झाला. माझं तुजविषयींचे असीम नि अतूट प्रेमानें तुला माझा अभिमान वाटला. माझ्या प्रगाढ भक्तीने तूं प्रमुदित झालीस. परंतु माझ्या आत्महत्येच्या वचनाने तूं विघ्द झालीस दुःखी बनलीस. तुझं अंतःकरण दुखविलं गेलं. नि तूं चिन्ताक्रान्त बनलीस.

तुझ्या चेहेऱ्यावरील भावना मी ओळखल्या. माझ्या तोंडावर हात ठेवून तूं मला म्हणालीस, " नका नका, असं अभद्र बोलूं नका. मी जरी आतां तुमच्यापासून दूर जात असले व आपला आतां विरह होत असला तरी तो कांहीं काळापुरताच – त्यानंतर मी आपणांस निश्चित भेटेन – कायमची भेटेन व आपण एकरुप होऊन जाऊं माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा. "

यानंतर तूं माझ्यापासून दूर झालीस व अंतर्धान पावलीस तुझी नि माझी भेट झाली नाहीं. या गोष्टीला आज कित्येक वर्षे झालीत.

" माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा. कांहीं काळानंतर मी तुम्हास निश्चित भेटेन. व आपण कायमचे एकरुप होऊन जाऊं. " या तुझ्या आश्वासनावर, शब्दांवर विश्वास ठेवून हे प्रियतमे, मी तुझी प्रतिक्षा करीत आहे. आणि त्या प्रतिक्षेत मी माझे जीवन कसें तरी कंठीत आहे.

" प्राणप्रिये, कधीं ग भेटशील तूं मला ? "

'उद्योगं [illegible]

वरमाला घेऊन प्रिये, तूं माझ्या दारीं आलीस आणि तूं माझ्या गळयांत टाकलीस. मला अलिंगन देत तूं मला म्हणालीस " माझा स्वीकार करा "

तुझ्या या कृतीनं मी वचनाने मी क्षणभर गांगरलो. मला वाटले थट्टा तर नसेल ना ही ? छे : छे : दुर्दैवाचा खेळच दिसतो हा. अेरवी तूं कशाला मला वरलं असतंस ?

क्षणभर वाटले, गळयातील माळ तोडून टाकावी आणि तुला झिटकारीत उत्तर द्यावं, " छे :, मला नाहीं पसंत हे ? "

आणि जेव्हां मी वरमाला तोडायला हात गळयापाशीं नेला तेव्हां वरमाला तोडण्याचं सामर्थ्य माझ्या हातात अुरले नव्हते. आणि तुला झिटकारून बोलण्याचे सामर्थ्य माझ्या जिव्हेत अुरले नव्हते

मी नम्रतेने तुला म्हणालो, " स्त्रीये, माझी चुकून तूं निवड केलीस. अजूनहि तूं आपला निर्णय परत घे. आणि आलीस त्या मार्गानें परत जा. मी सर्वस्वी तुला अपात्र आहे, म्हणून तर तुझ्या मनाप्रमाणें असलेला विचार मी मागें सारला आहे. "

त्यावर तूं खिन्न झालीस नि मला म्हणालीस, " नाहीं. माझी निवड कधीच चुकीची होणार नाहीं. तुम्ही मला सर्वस्वी पात्र आहात. म्हणूनच मी आपणांस वरिलें. तुम्ही नकार देऊ नका. आपणां दोघांना एकमेकांची सोबेत सुखकारक, आनंददायक, नि कल्याणकारक होईल म्हणून तुम्ही माझा स्वीकार करा. "

तुझ्या या वचनाने मी प्रभुदित झालो. तुला दीर्घ आलिंगन देत मी तुझे मुखकमल दोन्ही हातात घेऊन न्याहाळलं. माझ्या दृष्टीतं प्रेम होतं तसं तुझ्या दृष्टीतहि मला तेच प्रेम आढळलं.-एकमेकांना पूरक असलेलं, आणि मला तुझ्याबद्दलच्या मागील स्मृती आठवल्या, या मुखकमलाचं मी किती दिवस तरी दर्शन घेत होतो. त्या दर्शनानं मला तुझ्याबद्दल आकर्षण नि आकर्षणाचं रुपांनर प्रेमांत झालं होतं. माझं चोरटं प्रेम तुझ्यावर बसलं होतं. मला वाटे, हिची जर आपल्याला जन्माची सोबत मिळाली तर किती छान होईल. आपल्या आयुष्याचं सोनं होईल. आपण

सुखी नि आनंदी होऊ. या सुख[illegible] दुसरा विचार डोकावे. हिच्या योग्यतेत नि आपल्या योग्यतेत परंतु जमीनअस्मानाचे अंतर आहे. ती आपणांस वरणार नाहीं. अशक्य असलेल्या गोष्टीचा विचारच न केलेला बरा.

आणि प्रियतमे, त्यानंतर तो विचारच मीं मनांतून काढून टाकला होता. परंतु तरी देखील तुझा विचार मधूनमधून माझ्या मनांत येई. व मला बेचेन करी. माझे मन अस्वस्थ करी. तुझा विचार मनांत आला कीं शांत नि संथ पाण्यावर खडा पडताच ते पाणी जशे कंप पावते व त्यांत तरंग उमटतात त्याप्रमाणे माझ्या मनांत तरंग उमटत. आणि मग मला वाटे तुझी सोबत या जन्मी तरी मिळणार नाहीं आणि त्या जाणीवेने माझे मन दुःखी होई. आणि त्या दुःखी मनांतच मी माझे आयुष्य कसेतरी कंठीत होतो.

आणि आंतां जेव्हा तूं मला वरलंस. मला वरून माझी केलेली निवड तूं योग्य असल्याचं सांगितलंस आणि माझा स्वीकार करा अशी माझी याचना केलीस तेव्हां माझा मला प्रमाणिक अभिमान वाटला. समाधान वाटलं. तुझ्याबद्दल आदर नि प्रेम वाढलं. आणि त्या प्रेमांत तुझा स्वीकार करीत मी तुला दीर्घ आलिंगन दिलं.

## मीलन :

ज्यावेळी तूं माझ्या घरांत आलीस त्यावेळी मला कोण आनंद झाला, त्या आनंदांतच मी स्वतःचे स्थान सोडून तुला समोरा गेलो. आणि तुझं स्वागत करून मी तुला माझ्या हृदयाच्या उच्चासनावर विराजमान व्हायला सांगितलं. तूंहि हंसत माझ्या स्वागताचा स्वीकार करीत त्या आसनावर विराजमान झालीस.

आजपर्यन्त कुणाहि अतिथीला मी त्या उच्चासनावर बसविलं नव्हतं.

अनेक जन्मांपूर्वी जेव्हा तुझं नि माझं प्रथम दर्शन घडलं त्यावेळीं—त्या प्रथमदर्शनीच माझ्या मनावर तूं जबरदस्त मोहिनी घातलीस. मला तूं आकर्षित केलंस नि माझं प्रेम—निःसीम प्रेम-अतूट प्रेम तुझ्यावर बसले. त्याचक्षणीं मला वाटले तुझं नि माझं मीलन झाले तर—

...वन बहरून जाईल. माझं आयुष्य ...ला लागल नि माझं जीवन सफल झाल्यासारखं होईल असें मला वाटे. आणि हे विचार मनांत आले कीं मला अधिक जगण्याची अिच्छा निर्माण होई. या अिच्छेनंच मी माझा आयुष्याचा काल तुझ्या प्राप्तीसाठी घालवीत आणि अशांतच माझ्या हातून अमोल कर्मे घडत. माझ्या आयुष्यातील हास्य, सुखदुःख किंबहुना जीवनांतील सर्व उर्मी मी तुझ्या प्राप्तीखातर करी. माझ्या जीवनातील सर्व कर्मे मला न कळत तुझ्या प्राप्तीसाठी होत आहेत. असे भासल्यावर प्रियतमे, तूं दिनीं प्रतिदिनीं माझ्या समीप–अगदो समीप येत आहेसे मला वाटे.

आणि अशांतच आज तूं अचानक माझ्या दारांतच आलीस. आणि मी वर म्हटल्याप्रमाणे तूं माझ्या हृदयाच्या उच्चासनावर विराजमान झालीस.

मी तुला हळूच विचारले, " प्राणप्रिये, या माझ्या हृदयाच्या उच्चासनावर मी आजपर्यन्त कुणालाहि विराजमान व्हायला सांगितले नाहीं. आणि त्याप्रमाणें कुणीहि त्या आसनावर अद्याप विराजमान झाले नाही. आतां तूं बसली आहेस. तें परत त्या आसनापासून कधीहि न ढळण्यासाठी बसली आहेस ना ? "

माझ्या या बोलण्यावर तूं कांहीं बोलशील असं मला वाटलं होतं. परंतु छे : । यावर तूं एक अक्षरहि बोलली नाहींस. उलट माझ्या या बोलण्यानं तुला सुख झालं असावं, मनांत तू आनंदली असावीस असं मला वाटलं. कारण तुझा चेहेरा माझ्या या वचनानं प्रफुल्लित झालासा मला वाटला. खाली मान घालून तूं स्तब्ध होतीस व पायाखालची जमीन पाय नखानं उकरून आपण त्याच नादांत गुंग असल्याचं दाखवून माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याचं टाळीत होतीस.

बराच वेळ झाला तरी तूं कांहींच बोलली नाहींस आणि अप्रत्यक्ष नकार हाच स्त्रीयांचा होकार ही जाणीव मला झाली. मी विचारलेला प्रश्न तुला पसंत नसता तर तूं संतप्त झाली असतीस. माझा हात झिटकारला असतास. आणि कटु वाक्य बोलीत तूं माझ्या आसनाचा त्याग करीत मला सोडून गेली असतीस. परंतु तूं माझ्या प्रश्नाचं सुस्पष्ट उत्तर दिलं नव्हतंस. तूं मौन पाळीत होतीस. या मौनांतच मला होकार

मिळाल्यासारखं वाटलं आणि त्या ...
देत माझे ओंठ तुझ्या ओठावर टेकवले.

मग मला वाटले, एक जीवन दुसऱ्या जीवनाशी समर्पित झालं आहे. एक ज्योत दुसऱ्या ज्योतीत विलीन झाली आहे.

## अंतर्मीलन :

देवा, तूं माझ्या दारीं आलास त्यावेळीं मी माझ्या कार्यांत निमग्न होतो. तूं मला म्हणालास, "भक्ता, मी तुझ्याजवळ आलो आहे. मला आलिंगन दे."

परंतु अंगीकृत कार्य पूर्ण झाल्यावरच उठावे व तुला शरण जावें असे मी ठरविले. आपल्या कार्यातच परमेश्वर आहे. ते कर्म करीत असतानाच कर्मात तूं मला भेट द्यावी ही माझी ईच्छा होती. आणि त्यामुळेच ज्यावेळीं तूं माझ्या कार्यात भेट न देता एकदम माझ्या दारांत प्रगट झालास त्यावेळीं मी थोडा विस्मितच झालो. मला वाईटहि वाटले म्हणूनच मी आपला उद्योग सोडून—अंगीकृत कार्य सोडून एकदम तुझ्याकडे धांव घेतली नाहीं. उलट मी तुला म्हणालो, "देवा, आणखी थोडा वेळ थांब. माझे हे अंगीकृत कार्य पूर्ण झाल्यावर मी आपल्या दर्शनासाठीं येतो. तोंवर तूं थोडावेळ तिष्ठत रहा."

माझे काम पूर्ण झाल्यावर देवा, मी तुझ्याकडें धांव घेतली तो तूं तेथे तिष्ठत होतास कुठे ? तूं तर अंतर्धान पावला होतास, मला प्रथम थोडे वाईट वाटलें तें अशासाठीं कीं, आपण देवाची अवज्ञा तर केली नाहीं ना? निदान तुझी तशी समजूत तर झाली नाहीं ना? त्यामुळे तूं निराश होऊन अंतर्धान पावलास की काय या शंकेनं मी व्यथित झालो; परंतु देवा, मला माझ्या कार्यातच तुझे दर्शन घ्यावयाचे होते. कार्य-करता करता त्या कार्यातच समरुप होऊन त्या समरुपांत तूं मला हवा होतास. आपले मिलन त्यांत व्हावयास हवे होते. यासाठीं मी आतापर्यंत धडपड केली होती, आतां तूं मला लवकर दर्शन देणार नाहीस—तुझे नि माझे मीलन होणार नाही. आपल्याला यापुढे जपून कार्य करावे लागेल व प्रखर प्रयत्न करुन तुला प्रसन्न करुन घ्यावे लागणार हे मी समजून चुकलो. आणि त्याप्रमाणें देवा, मी माझ्या प्रयत्नास लागलो.

'उद्योगं पुरुषलक्षणम 'उद्योग हेच पुरुषाचे लक्षण हे तत्व माझ्या अंगी बाणले गेले. मी कार्यरत झालो. जी जी कामें करावयाची ती ती निर्विकारपणें, निरपेक्षपणें करायचे, ती बंधनकारक ठरु नयेत यास्तव मी काळजी घेत गेलो. कर्मे ही कोणाला उपद्रवकारक न होता-विधायक होतील हें मी बघत गेलो. व कार्यात मी कधींच खंड पडू दिला नाहीं ती कर्मे करता करता' कामक्रोध नि लोभ यांचा संसर्ग मी टाळला. कर्मातील राजस नि तामस भाव काढून त्यांतील सात्विक भाव मी कृतीनें प्रगट केला. सात्विक कर्मे करता करता ग.तेत सांगितलेली दैवी संपत्ती माझ्या कर्मातून प्रगट होऊ लागली.

माझी कर्मे सात्विक झाली.आणि सात्विक कर्मातूनच ती गुणातीत बनली तीं माझी कर्मे हे परमेश्वरा,मी तुला अर्पण केली. या सर्व कर्माचा कर्ता करविता मी नसून तूंच आहेस – परमेश्वर आहे असे समजून मी केवळ नाममात्र-निमित्त मात्र असें मी मानू लागलो

आणि माझे कित्येक दिवस गेले. मी कार्यरूप-देवरुप झालो. मला माझ्या कामांत तूं दिसूं लागलास आणि हा भाव माझ्या कामांत पूर्णपणें भिनला त्यावेळी हे देवा, मला तुझे दर्शन घडले. मला तूं जेथे हवा होतास तेथेच तूं मला मिळालास. मग मला जीवनांत जे सर्वोच्च म्हणून हवें होते तें तूं मिळालास. आणि त्यानें माझे समधान झाले.

माझ्यासमोर प्रगट होऊन तूं मला म्हणालास, "वत्सा, कार्यातच मला परमेश्वराचे दर्शन घडूं दे. ही तुझी अंतिम ईच्छा आज फलद्रुप झाली आहे. मागे तूं म्हटल्याप्रमाणें तुझ्या दारीं बराच वेळ निष्ठत राहुनहि तू लवकर माझ्याकडे परतला नाहींस या कारणानें तूं माझी अवज्ञा केलीस व यामुळेच मी अंतर्धान पावलो असं तू समजू नकोस तर कार्यरत होऊन तुझी कार्थसाधना जिद्दीनें पूर्ण करुन घेण्यासाठीं मी अंतर्धान पावलो. व आपण त्यावेळीं एकमेकांपासून विन्मुख झालो. परंतु माझ्या विन्मुखतेमूळेच तूं तुझी कार्यसाधना पूर्ण केलीस, त्यांत यशस्वी झालास म्हणूनच कर्मांतच मला परमेश्वराचे दर्शन घडूं दे ही तुझी अंतरींची ईच्छा आज पूर्ण झाली आहे. या तुझ्या कर्मांतच मला आपण होऊन तुझ्याकडे धांव घ्यावी लागली व आतां तुझे नि माझे मीलन-अक्षय मीलन झाले आहे आतां आपण एकमेकांपासून केव्हांहि दूर जाणार नाहीं आपली कधींच ताटातूट होणार नाहीं.

आणि देवा, यानंतर मला कळाले कीं तूं माझ्यांत विलीन झालास आपले अक्षय मीलन झालें.

**प्रयत्न :**

देवा, अर्ध्या रात्री तूं माझ्या स्वप्नात आलास आणि त्या स्वाप्नांत तूं मला दर्शन दिलेस, त्यावेळीं तूं मला निद्रेतून उठविलेस आणि मला म्हणालास, " वत्सा, झोपतोस कशाला? उठ जागा हो. 'आणि मी खाडकन उठलो. डोळे चोळले आणि तुला पाहिले. तुझं तें अव्दितीय तेज लखलखाटलं. त्या तेजानें नि तुझ्या मोहक रुपानं माझ्या डोळ्यातली झोप एकदम मोडली गेली नि मला उत्साह आला, नवीन दृष्टी आली.कांहींतरी दिव्य पाहिल्यासारखं नि अैकल्यासारखं झालं जणूं भारावल्यासारखा झोलो. मंत्रमुग्ध झालो. मला मोहिनी घातल्यासारखी झालीं. जन्मानुजन्मे नि युगानुयुगे आंपणास जें हवें होते पण मिळत नव्हते व ते मिळत नव्हते म्हणून जीव असंतृष्ट होता. जीव ज्याचा शोध करीत होता, परंतू कांही केल्या शोध लांगत नव्हता, त्याचेच आज दुर्लभ दर्शन घडत होतें. तें तुझें मोहक रुप मी माझ्या हृदयीं सांठव्न घेतले. तेणेकरुन माझ्या मनाला शांतता लाभली.

मी वेंड्यासारखा देवा, तुझ्याकडे पहात राहीलो. असा बराच काळ गेला. त्या काळाचे मला भानहि राहिले नाहीं. आणि यानंतर थोडयाच वेंळात तूं परत जाऊं लागलास ते पाहून मी तुझ्या चरणीं पडलो व ते चरण घटट् आवळींत मी तुला प्रार्थना केली, "देवा, आता तू मला सोडून परत जाऊं नकोस, युगानुयुगें नि जन्मानुजन्मे मी तुझा शोध घेत होतो. तुझ्या दर्शनासाठीं आसुसलेला होतो. परंतु आता तूं मला भेटलास. तुझे दुर्लभ दर्शन दिलेस यानें मी धन्य झालो. अनेक जन्मांची पुण्याई तुझ्या कृपेनें फळाला आली आणि परमेश्वरा माझ्या कुटिराला आज तुझे चरण लागलेत. आता हे तुझें चरण मी सोडेणर नाहीं. मला सोडून तू जाऊ नकोस. या उप्पर तूं जर आता अंतर्धान पावलास तर मी आत्महत्या करीन व हा देह ठेवणार नाहीं.

यावर तूं हंसलास. माझ्या डोक्यावर हात ठेवून तूं मला म्हणालास, "वत्सा, मी तुला स्वप्नांत भेट दिली, जागृतावस्थेत नव्हे. तुझा उद्धार करावयास अद्याप अवकाश आहे. तुझे नि माझे पूर्ण तादात्म्य

झालेले नाहीं. अजूनहि व्दैतभावना आहे.ही व्दैतभावना मनातूस समूळ नष्ट करुन तूं आपल्या हृदयीं मला पूर्णपणे पचवून घे.–माझ्याशी तादात्म्य पाव म्हणजे मी सुखाने तुझ्या अंतरी निवास करीन व तुझा उद्धार करीन माझी कृपादृष्टी तुझ्यावर आहे मला आपल्या हृदयीं पूर्णपणें पचविण्याची सर्व सिद्धता करुन त्याप्रमाणें प्रयत्न कर. त्या प्रयत्नांला मी यश देईन.

तरीहि मी त्याला सोडले नाही त्याचे चरण अधिक घटट् धरुन ठेविले, मी ते कांही केल्या सोडीना. डोळयांत आसवें आणून प्रभो, मी तुझी आळवणी केली, "परमेश्वरा, मी आभागी जीव याहें, कितीहि प्रयत्न केला तरी मला त्यांत यश येणार नाहीं, यास्तव मी तुला सोडीत नाहीं. आताच माझ्यावर कृपा कर आणि माझा उद्धार कर."

यावर तूं हंसलास आणि माझ्यावर कृपेचा कटाक्ष टाकीत मला म्हणालास, "भक्ता, माझ्या भक्ताच्या पाठीशों मी सदैव उभा असतो. तूं आपली व्दैत भावना नष्ट करण्याचा प्रयत्न कर. या प्रयत्नाला मी यश देईन, व माझ्याशी तादात्म्य पावून तुझा उद्धार मी निश्चित करीन."

देवा, या तुझ्या शेवटच्या आश्वासनपर शब्दांवर विश्वास ठेवून मी तुझे चरण सोडले व तूं अंतर्धान पावलास.

माझ्या परमेश्वरा, तुझ्याबद्दलची ओढ माझ्या मनीं लागली आहे. तुझा घ्यास मला लागला आहे. परंतु तू मला अद्याप भेटत नाहींस तुझें नि माझें तादात्म्य होत नाहीं. या जाणीवेनें मझ्या मनाला शांतता नाहीं. जिवाला समाधान नाहीं, शरीराला विश्रांती नाहीं. तूं म्हटल्या–प्रमाणे तुझ्यातील नि माझ्यातील व्दैतभावना लोप पावण्यासाठीं–आपले तादात्म्य होण्यासाठीं जेवढे म्हणून व जसे म्हणून मला प्रयत्न करता येणें शक्य आहे तेवढे मी करीत आहे. हे परमात्मन, असेच प्रयत्न माझ्या कडून होऊ देत. प्रयत्न हाच परमेश्वर या ब्रीद वाक्याप्रमाणें या प्रयत्ना-तूनच माझी व्दैतभावना नष्ट होऊन आपले जीवा–शिवाचे पूर्ण तादात्म्य होऊन हे देवा, आपले मीलन घडूं दें एवढीच माझी तुला प्रार्थना आहे.

## उद्धार :

देवा, मनाच्या एका विशिष्ट अवस्थेत जेव्हां मला तुझे दर्शन घडल्यासारखे वाटले त्यावेळी मला फार आनंद झाला. मला वाटले आपण पुनीत झालो. आपण धन्य झालो. आणि आपला उद्धार झाला. आणि त्या उन्मादयुक्त आनंदाने मी उद्गारलो, " अहो मी धन्य झालो. माझा उद्धार झाला. "

माझे हे उद्गार ऐकून मला लोकांनी वेडयात काढले. ते मला कुत्सित मनाने हंसले. त्यांतील कांहींनी माझी निर्भत्सना केली तर कांहीं जण मला खोंचून बोलले.

या घटनेने व लोकांच्या उद्गाराने मी विध्द झालो. माझे मन दुखविले गेले. आणि या दुःखी मनानेंच मी तुझ्या मंदिरी आलो. तुझे चरण धरले. डोळयांत पाणी आणून उद्वेगाने बोललो, " देवा, नको हा संसार, नको हा लौकांचा सहवास आणि नको त्यांचा उपहास, सहन होत नाहीं माझ्याने हे. "

तोच कुणीतरी मला म्हणाले, " भक्ता, मनाच्या एका विशिष्ट भाव अवस्थेत तूं हुरळून गेलास, आणि त्याने तूं स्वतःचे भान विसरलास. तुला उन्मादयुक्त आनंद झाला. आणि या आनंदयुक्त उद्गारांनी तुला लोकांनी वेडयांत काढले. याचे तुला वैषम्य वाटू देऊं नकोस. लोकांची मानसिक उंची तुझ्या विचारापर्यन्त – तुझ्या भावावस्थेपर्यन्त गेली नाहीं. म्हणून ते तुला समजू शकले नाहीत. व त्यांनी तुझा उपहास केला. तुझ्या उद्गारांची टवाळी केली. वेडया, केवळ या घटनेने तूं निरूत्साही होऊं नकोस. माझ्या भक्तीपासून चळूं नकोस. मला प्राप्त करून घेण्याचा अखंड प्रयत्न कर. भक्तीच्या मार्गांत येणाऱ्या सर्व गोष्टी तूं सहन करून मला प्राप्त करून घे. यावेळी तूं अति अधीर होतां कामा नये मनाची भावावस्था सम ठेवून हुरळूं नकोस. एक दिवस मी तुला प्राप्त होईन व तुझा उद्धार करीन. माझा आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहे. "

मी आवती भोवेती नि समोवती पाहिले. मला कोण मोलाचा उपदेश करतेय–मार्गदर्शन करतेय हे जाणून घेण्यासाठी मी बोलणाऱ्यास

शोधू लागलो. तो मला समजले देवा, तूं माझ्या अंतर्यामी प्रविष्ट होऊन, मौलाचे मार्गदर्शन करीत होतास.

**सर्वस्व :**

प्राथमिक अवस्थेत ज्यावेळी तुझी नि माझी भेट झाली त्यावेळी देवा, तुझ्याबद्दल मला आकर्षण निर्माण झाले. नि तूं मला हवासा वाटलास. तुला प्राप्त करून घेतले तर बरे होईल. हा विचार तत्क्षणी माझ्या मनांत डोकावला व तसा मी प्रथम प्रयत्न केला. परंतु तूं मला प्राप्त झाला नाहींस.

तुला प्राप्त करून घेण्यासाठी आपल्याला कांहींतरी द्यावे लागेल त्याशिवाय तूं सहजासहजीं आपलासा होणार नाही हे मला कळून चुकले व त्याप्रमाणे तू मी देवाणघेवाणाच्या हिशेबाने माझ्या जीवनातले हलके फुलके नि किरकोळ असे कांहींतरी तुला देण्यास तयार झालो. व त्याबदली तूं माझा हो अशी मी तुला विनंति केली.

माझ्याकडे पाहून हंसल्यासारखे केलेस तूं आणि आपला मार्ग सुधारलास. माझ्याकडे पाठ फिरविलीस. माझ्या विनंतीची अवज्ञा केलीस. ही गोष्ट माझ्या मनाला जाणवली. आणि मला रडूं कोसळले.

दिवसांमागून दिवस जात होते आणि तुझ्यावाचून मला हुरहूरल्यासारखे होई–तुला कसेहि करून आपलेसे करावे हा भाव मनी दृढ होई. आणि त्यामुळें तुझा मला जणू घ्यासच लागला. तुला प्राप्त करून घेणेस्तव मी माझ्यातले–माझ्या जीवनातले अर्धे द्यावयास तयार झालो. आतां या गोष्टीने तूं निश्चित तयार होशील असा दृढविश्वास मला वाटू लागला. आणि यामुळे माझी कळी खुलू लागली. माझं मन आनंदाने भरूं लागले आणि एक दिवस मी माझ्या जीवनातले अर्धे देऊन तुला आपलासा होण्याची याचना करताच तूं त्यावर जणू माझ्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखे केलेस व माझ्या याचनेची उपेक्षा केलीस. यावर माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तुझा मला तर रागहि आला आणि माझ्याबद्दल चीडहि आली.

असे कांहीं दिवस गेले. तुझ्याबद्दल विलक्षण ओढ मला वाटू लागली. या ओढीनेच तुझ्यावरील माझी निष्ठा वाढली, श्रद्धा वाढली.

भक्ती वाढली. या ओढीनेच मला जाणवले की माझ्या जीवनातले सार-सर्वस्वच तूं झाला आहेस. तुला प्राप्त करून घेतल्याशिवाय माझ्या जीवाला चैन पडणार नाही. मनाला शांतता लाभणार नाही. सदगति मिळणार नाहीं. आणि यामुळेच तुला प्राप्त करण्यासाठी माझ्या हातून मानसिक, बौद्धिक नि शारिरिक कर्मे घडू लागली.

कांहीं दिवसांनीं मनाच्या अशा एका अवस्थेतच मला कळून चुकले की आपलें सर्वस्व—म्हणजे आता आपल्याजवळ जे आहे ते सर्व मिथ्या आहे व खरे जे आहे ते तू आहेस—ज्यांची मला विलक्षण ओढ लागली आहे.

आणि मग मी माझे सारे विसरलो. मला न कळत माझें सर्वस्व तुझ्या प्राप्तीखातर मी वेचू लागलो आणि एक दिवस माझ्या परमेश्वरा, तूं आपण होऊन माझ्या दारी आलास आणि मला प्राप्त झालास.

## निरोप :

माझ्या देवा, तूं माझ्या उंबरठ्यावर प्रगट होशील त्यावेळीं तुझ्या समोर मी माझे घर शुद्ध नि स्वच्छ कसे करीत बसू ? त्या धांदलीत माझ्याकडून तुझं स्वागत ही नीटसे होणार नाहीं. या कारणास्तव माझे घर मी आधीच पवित्र नि स्वच्छ केले व तुझ्या मार्गावर डोळे लावून बसलो आहे. माझ्या आयुष्यांतले एकेक दिवस मी अशा तऱ्हेनें कंठात आहे. माझ्या देवा, कधी बरे तूं येशील ? तुझं माझ्याकडे आगमन होईल ? या माझ्या घराला – लहानशा कुटिराला तुझे पाय लागतील ?

देवा, आता माझा फार वेळ अंत पाहू नकोस. ज्या घरांत माझं बालपण नि तारुण्य मी कंठील त्या माझ्या घराबद्दल मी सदैव कृतज्ञ आहे. त्या घराची आठवण मी कसा बरे विसरेन ? त्यांशीं कृतज्ञ राहूनच वृद्धावस्थेचे दिवस कंठीत मी तुझ्या आगमनाची वाट बघत आहे. माझ्या देवा, लवकर ये. भेट दे आणि माझा उद्धार कर.

या घरांतल्या कोपऱ्या कोपऱ्यांत मी माझ्या आठवणी सांठवून ठेविल्या आहेत या गृहांत राहूनच देवा, मी तुझी उपासना आरंभिली.

तींत खंड पडू दिला नाहीं. ती माझी उपासनाच तुझ्या मीलनाची घटिका आता जवळ येत चालल्याचे तुझ्या आगमनाचा क्षण समीप येत चालल्याचे ती सूचित करीत आहे. यासाठीच देवा, तुझ्या स्वागतासाठी सज्ज राहून मी तुझ्या आगमनाकडे माझे लक्ष वेधून आहे.

तुझं आगमन झालं कीं, प्रथम तुला मी डोळे भरून पाहीन मान लववून वंदन करीन हातांतील सुमनमाळ मी तुझ्या गळचात टाकीन. पंचारतीनं तुला ओवाळीन. मागे वळून साश्रू नयनांनी माझ्या कुटीराला न्याहाळीन. घरातील अिंच नि अिंच जागा माझ्या दीर्घ परिचयाची आहे. त्याच्या आठवणीनं सारं घर बोलकं होईल माझ्यावर आनंत ऋण असलेल्या त्या माझ्या घराला नि घरातील स्मृतींना मी वंदन करोत. त्या गृहाला म्हणेन, " माझ्या गृहा, मनोभावे तुला वंदन, तुझ्या अनंत रुणांचे ओझें सदैव डोक्यावर ठेवून मी तुझा निरोप घेत आहे. कृतज्ञतेने मी तुला अंतिम अभिवादन करतो. जेथून मी तुझ्याजवळ आलो तेथेच मी परत चाललो आहे मला सुखाने आशिर्वाद दे. "

कृतज्ञतेने त्या घराचा मी निरोप घेत अुंबरठ्यावर असलेल्या तुला—माझ्या परमेश्वरा, शरण जाईन. व या गृहाचा त्याग करीन.

## समीप दर्शन :

माझ्या देवा, तुझ्या अुद्यानात हे सारस्वताचं फुलझाड तूच लाविलंस. ते जोपासलंस, त्याची मशागत ठेवून तें वाढविलंस. तें झाड आतां मोठं झालं. त्याला टपोरी रंगीबेरंगी नि सुगंधी फुलं आली, त्या प्रफुल्लित फुलांनी मला मोहिनी घातली. मला आकर्षून घेतलं. आनंदित केलं. मला वाटलं याच फुलानी तुझी चरणसेवा केली तर—

या विचारासरशी हार्षित मनानें मी त्या झाडाजवळ गेलो. ते झाड गदगदां हलविलं. त्या झाडाखाली गेंदेदार पुष्पांचा सडा पडला. त्यांतून ओंजळभर पुष्पांनी मी माझी करांजलि—ओंजळ भरली आणि तुजजवळ येऊन मोठ्या भक्तीभावाने मी ती तुझ्या चरणी वाहिली.

माझ्या परमेश्वरा, या समीपदर्शनानें " मी तुझी चरणसेवा केली आहे. तिचा तूं स्वीकार करशील ना ?

**पसायदान :**

संपला "भावपुष्पांजलि चा भाग १ ला. समीपदर्शनाची उर्मी संपली. हरवलेल्या देवाचा शोध घेण्याचा–त्याला धुंडाळण्याचा प्रयत्न करीत असताच ह्यातील एकेक प्रकरणाचा जन्म झाला. हा शोध घेता घेता हृदयावर भावपुष्पांजलिचे लेणे खोदले गेले. मराठी सारस्वताचे हे लेणे मी वाचकांसमोर ठेविले आहे. या लेण्यात माझ्या प्रभूच्या मूर्तिच तेवढ्या दिसतील. त्या प्रभूविषयींच्या वेगवेगळ्या भावना, कल्पना, विचार, तर्क हे सारे मी प्रस्तुत ग्रंथात प्रगट केले. देवी शारदेच्या कृपाप्रसादाने मी ते विचार लेखणीने शब्दबद्ध करूं शकलो. हे तिचे म्या पामरांवर महद उपकार झाले आहेत. ते फेडता न येण्यासारखे आहेत.

हे माझे लिखाण कुठपर्यन्त यशस्वी झाले आहे हे मला माहीत नाही तो विचारहि मी करीत नाही. परंतु एवढे खरे कीं, अंतर्धान पावलेला परमेश्वर कांहीं अंशी या लिखाणाने मला भेटला. त्याचे मला समीपदर्शन घडले. आणि दिवसेंदिवस तो माझ्या समीप येत आहे. असा मला प्रत्यय येत चालला आहे. आणि कांही दिवसांनी तो मला सर्वस्वी भेटणार आहे, त्याचे नि माझे मीलन लवकर घडणार आहे असा मला विश्वास वाटत आहे.

माझ्या परमेश्वराला मी फिरून फिरून वंदन करतो. व श्री ज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान त्याचे जवळ मागून भावपुष्पांजलिचे हे लिखाण मी पूर्ण करतो.

"आतां विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनी मज द्यावे । पसायदान हे ।
जो खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूता परस्परां पडो । मैत्र जीवाचे ।
दूरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
ईश्वर वांछिल तो तें लाहोळ प्राणीजात ।
वर्षत सकळ मंगळी । जो जे निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडली । भेट तू भूतां ।
चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिन्तामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषांचे ।
चंद्रमे जे अलांछन । मार्तृन्ड जे तापहीन ।
ते सर्वांहि सदा सज्जन । सोयरे होतु ।
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्ही लोकीं ।
मजि जो आदिपुरुषी अखंडित ।

भावार्थ :– आता यावर विश्वरूपच सद्‌गुरु यांनी माझ्या वाक्‌यज्ञे करून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा की दुष्टांचा टिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो व जीवमात्रांची एकमेकांवर मैत्री वाढो. या सर्व विश्वांमधील पापरुपी अंधकार नाहीसे होऊन स्वधर्मरूपी सुर्य उगवून त्याचा प्रकाश होवो, आणि प्राणीमात्राच्या ज्या ज्या ईच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत. ह्या भूतलावर अखिल मंगलाचा वर्षाव करणाऱ्या भगवद्‌भक्तांच्या समुदायांची सर्वभूतांना सदभावे करून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत तर चालते बोलते कल्पतरूंचे बाग, जिवंत चिन्तामणीचे गांव, किंबहुना अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र संसाररुपी अंधःकार दूर करून – शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवद्‌भक्त हे सकल जनांना प्रिय होवोत. फार काय सांगावे सर्व त्रैलोक्य सुखाने परिपूर्ण होऊन णीमात्राला हरीचे अखंड भजन करण्याची ईच्छा होवो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 15138
REFBK-0015134
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
8023 दि. 1ब।4
15138